महाराष्ट्राचे शिल्पकार

# नारायण मेघाजी लोखंडे

लेखक

प्राचार्य डॉ. मा. गो. माळी





महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

भारतीय कामगार चळवळीचे आद्य जनक

# रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे (जे. पी.)

## जीवन कार्य

● लेखक ●

**प्राचार्य डॉ. मा. गो. माळी**

एम.ए., एम.एड., पीएच.डी.

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

वाय १४२-१

▸▸ **रा. ब. नारायण मेघाजी लोखंडे (जे. पी.)**

▸▸ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे कला अकादमी आवार,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

▸▸ © प्रकाशकाधीन

▸▸ **मुद्रण :**

व्यवस्थापक,
शाासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

▸▸ प्रथमावृत्ती २०१२

▸▸ **किंमत : ७२/-**

## अर्पणपत्रिका



महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री,
अखिल भारतीय समता परिषदेचे शिल्पकार व नेते,
उपेक्षित समाजाचे कैवारी,
म. फुले, राजर्षी शाहू महाराज व
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांचे अनुयायी आणि आमचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान
आदरणीय **ना. छगनरावजी भुजबळ**
यांना सदर अर्पण !

# निवेदन

भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांचे जीवनचरित्र आज महाराष्ट्रातील वाचकासमोर मंडळातर्फे सादर करताना मला आनंद होत आहे. महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा इतिहास अलौकिक स्वरूपाचा आहे. संघर्ष आणि सत्याग्रह यांची ती गाथा आहे. नारायण मेघाजी लोखंडे यांच्यापासून प्रेरणा घेऊन कॉ. श्रीपाद डांगे यांच्यासारखे कामगार नेते विसाव्या शतकातील महाराष्ट्राला उपलब्ध झाले व त्यांनी महाराष्ट्रातील कामकरी वर्गाला प्रतिकूल परिस्थितीतून चांगले दिवस प्राप्त करून दिले. विशेषतः मुंबईतील गिरणी कामगार वर्गाला स्वतःच्या हक्काची जाणीव करून देवून त्यांच्या श्रमाचे यथायोग्य मूल्य त्यांना मिळावे, यासाठी त्यांना संघर्षप्रवण करणे हे नारायण मेघाजी लोखंडे यांचे त्या काळातील मोठेच कार्य होय. श्रमिकांसाठी आयुष्य वेचणाऱ्या नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र डॉ. मा. गो. माळी यांनी मंडळासाठी लिहून दिले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

(मधु मंगेश कर्णिक)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई

स्थळ : मुंबई
दिनांक : ऑगस्ट, २०१३

# मनोगत . . .

' सत्यशोधकांचा चरित्रकोश ' संपादित करताना सत्यशोधकांनी प्रसिद्ध केलेले १९ व्या व २० व्या शतकातील प्रकाशित व अप्रकाशित साहित्य मिळविण्याचा आणि त्याचा अभ्यास करण्याचा योग आला. हे दुर्मीळ परंतु उपेक्षित साहित्य त्या दृष्टीने मी पाखडण्याचा प्रयत्न केला असता रा. ब. नारायण मेघाजी लोखंडे (जे.पी.) या भारतीय कामगार चळवळीच्या आद्य जनकाच्या पायाभूत व ऐतिहासिक कार्याचे अल्पसे दर्शन प्रकर्षाने झाले. स्वतःच्या चांगल्या नोकरीला लाथ मारून आपले सर्व कुटुंब उपासमारीने होरपळणार आहे हे स्पष्ट दिसत असताना, देशातील लक्षावधी स्त्री-पुरुष कामगारांचे संसार फुलविण्याचे असिधारा व्रत हयातभर स्वीकारले. गिरणी मालकांच्या दृष्टीने स्वामिद्रोह किंवा ब्रिटिश सरकारच्या दृष्टीने राजद्रोह म्हणून केव्हाही काहीही घडण्याची शक्यता असताना श्री. लोखंडे यांनी सत्यशोधक समाजाच्या कावड झेंड्याखाली कामगारांना एकत्र आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. महात्मा जोतीराव फुले यांची प्रेरणा घेऊन त्यांनी मुंबईमध्ये 'बॉम्बे मिलहॅन्डस् असोसिएशन' ही कामगारांची भारतातील पहिली संघटना स्थापन करून संघटनेच्या बळावर १० जून, १८९० रोजी देशातील कामगारांना प्रथमच साप्ताहिक सुटी गिरणी मालकांच्याकडून मंजूर करून घेतली. हा दिवस म्हणजे भारतातील कामगार चळवळीच्या इतिहासातील एक सुवर्णदिन होय. 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी स्त्री-पुरुष मजुरांची शंभर वर्षापूर्वीची स्थिती होती. मालकाची लहर फिरेल तशी वागणूक आणि तसा कायदा. मरेतोपर्यंत गिरणीत काम करावे आणि अल्पसा मोबदला मिळेल तेव्हा घ्यावा आणि मुकाट्याने वाटेला लागावे, अशी स्थिती होती. तथापि, श्री. लोखंडे यांनी अनेक संकटांना धैर्याने सामोरे जाऊन कामगार स्त्री-पुरुषांची शक्ती संघटित केली आणि मालकांच्या मक्तेदारीला सुरुंग लावला. यामुळे मालकांना आणि ब्रिटिश सरकारला जाग येऊन त्यांनी हळूहळू कामगारांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले. रावबहादूर लोखंडे यांनी सादर केलेल्या तक्रारी व निवेदने यावर विचार होऊन काही चांगले निर्णय

बाहेर पडू लागले. थोडक्यात रा. ब. लोखंडे यांच्या या पायाभूत कार्यामुळे कामगारांना चांगले दिवस प्राप्त झाले. आज कामगारांना ज्या सोयी-सवलती व सरंक्षण मिळत आहे, त्यामागे त्यागाचा मोठा इतिहास आहे, पण पायाकडे पाहतो कोण ? कळसाकडेच पाहण्याची समाजाची रीत आहे.

श्री. लोखंडे हे एक हुषार, कर्तृत्ववान व दूरदृष्टीचे सत्यशोधक होते. महात्मा फुले यांचे ते निकटवर्ती व निष्ठावान सहकारी होते. फुल्यांच्या बऱ्याच महत्त्वाच्या कार्यात त्यांचा सहभाग प्रामुख्याने असलेला आढळतो. त्यांनी मुंबई या आपल्या कर्मभूमीत कामगार कल्याणाचे जे कार्य केले ते क्रांतिकारक, पथदर्शक व पायाभूत असे आहे. याशिवाय 'दीनबंधू' पत्राचे एक अष्टपैलू संपादक, झुंजार पत्रकार, सत्यशोधक साहित्यिक आणि दीन-दलितांचे कैवारी म्हणून त्यांनी बजावलेली सेवा अतिशय मौलिक स्वरूपाची अशी आहे.

रा. ब. लोखंडे यांच्या कार्याची मौलिकता व क्रांतिकारकता विचारात घेता खालील ओळी आठवतात.

**यज्ञी ज्यांनी देऊनी निजशिर घडीले मानवतेचे मंदिर**
**परी जयाच्या दफनभूमीवर नाही चिरा नाही पणती ।।**

या काव्यपंक्तीतील आशय रा. ब. लोखंडे यांना तंतोतंत लागू पडतो. या थोर व्यक्तीची त्यांच्या मुंबई या कर्मभूमीत अगर अन्यत्र नावनिशाणीसुद्धा नसावी हे पाहून मनाला वेदना होतात आणि म्हणावेसे वाटते --

**दिव्यत्वाची जेथे प्रचिती ।**
**तेथे कर माझे जुळती ।।**

या पुस्तकात रा. लोखंडे यांचे खालील साहित्य समाविष्ट केले आहे.

(१) पंचदर्पण (१८७६)

(२) सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान - भाग १ ला (१८८६)
(किंमत ३ आणे)

(३) सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान - भाग २ रा (१८८७)

(किंमत १।। आणा)

वरील साहित्य पुस्तिकेच्या स्वरूपात प्रसिद्ध करण्यात आले आहे. सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान-भाग १ ही पुस्तिका माला या स्वरूपात सत्यशोधकांचे हितास्तव दीनबंधू छापखान्यात छापून प्रसिद्ध केली, असे मुखपृष्ठावर लिहिले आहे. ही पुस्तिका माहे सप्टेंबर, सन १८८६ मध्ये प्रसिद्ध केलेली आहे. यानंतर लागलीच दुसऱ्या वर्षी मुखपृष्ठावर असाच मजकूर लिहून माहे मे सन १८८७ मध्ये भाग-२ ही पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. हे साहित्य पुष्कळ प्रयत्न करून मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयामधून मिळविण्यात आले आहे. यासाठी मुंबई विद्यापीठाचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

पंचदर्पण हे रावबहादूर लोखंडे यांचे पुस्तक जातीच्या आदर्श नियमनासाठी लिहिले असून त्यामध्ये स्त्रीशिक्षण, लग्नाचे वय, पुर्नविवाह, विधवाविवाह, लग्नातली उधळपट्टी, व्यसने, घटस्फोट, सहकार, बचत यासंबंधीचे मार्गदर्शक विचार फारच महत्त्वाचे असे आहेत. कारण समाजसुधारणेच्या दृष्टीने आजही ते समाजाला मार्गदर्शक असे आहेत. सत्यशोधक निबंधमाला भाग १ व २ या माला पुस्तकातील नावाप्रमाणे हिंदू धर्माचे खरे ज्ञान ब्राम्हणेतरांना व्हावे या उद्देशाने लिहिलेल्या आहेत.

आजवर ब्राम्हणांनी हिंदू धर्माचे खरे ज्ञान ब्राम्हणेतरांना आपल्या राक्षसी स्वार्थासाठी होऊ दिले नाही. त्यानी विद्या शिकण्यास प्रतिबंध केला आणि वेद वगैरे ग्रंथांना स्पर्शही करू दिला नाही. यामुळे आपला देश मागास राहिला. त्याची प्रगती होऊ शकली नाही, हे दाखवून दिले आहे. यासंबंधीचे विवेचन मी या ग्रंथात एका स्वतंत्र प्रकरणात केले आहे.

'भारतीय कामगार चळवळीचे आद्य जनक रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे (जे. पी.)' या नावाचे छोटे पुस्तक मी लिहून, ३ जानेवारी, १९९० मध्ये आशा प्रकाशन, गारगोटी यांनी प्रसिद्ध केले होते. त्यामध्ये नवीन माहितीची भर घातली आहे. या अगोदर या विचारवंत, कृतिवीर त्यागी सत्यशोधकाची कोणी दखल घेतल्याचे माहीत नाही. श्री. मेहेर यांनी टाटा विज्ञान संस्थेला एक प्रबंध सादर केला होता. तथापि तो प्रकाशित

झालेला नाही, असो. सदरचा ग्रंथ लिहिण्याचे माझे प्रयोजन हे आहे की, इंग्रजी राजवटीत रा. लोखंडेसारख्या माणसाने म. फुले यांचे एक अनुयायी म्हणून केलेले डोंगराएवढे समाजकार्य आजही समाजाला मार्गदर्शक असल्याने असे समग्र साहित्य प्रकाशात आणावे हे आहे. या पुस्तकाची योजना साकार करताना मला अनेक अडचणींवर मात करावी लागली. तथापि एका महान समाजसेवकाचे कार्य यामुळे प्रकाशित करण्यात मला यश मिळाले यातच मला खरे समाधान आहे. या कार्यात श्री. मनोहर कदम, महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक श्री. द. श्री. चव्हाण, मुंबई विद्यापीठातील डे. रजिस्ट्रार श्री. सूर्यवंशी, श्री. पांडुरंग सुतार यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा. मधु मंगेश कर्णिक आणि मंडळाने मला हे पुस्तक लिहिण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

**गारगोटी** **डॉ. मा. गो. माळी**

## भारतीय कामगार चळवळीचे आद्य जनक

# रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे (जे. पी.)

"आई ! आई !! मेलो ! मेलो !! साहेब, दया करा. मला मारु नका. तुमच्या पाया पडतो." या आर्त किंकाळ्या एका गरीब व सततच्या कामाने थकलेल्या गिरणी मजुराच्या. जमिनीवर पाडून एक मुजोर गोरा अधिकारी एका क्षुल्लक चुकीबद्दल त्या हतबल व दीन-दुबळ्या मजुराला निर्दयपणे बुटांच्या लाथा घालत होता. थकलेला मजूर चोळामोळा होऊन जमिनीवर पडून त्या साहेबांकडे दयेची अपेक्षा करत होता. तथापि, तो परकीय गोरा साहेब, त्याला दया येण्याचा प्रश्नच नव्हता. हे हृदयद्रावक दृश्य पाहून त्या गिरणीतील एका तडफदार तरुणाला राहवेना. आपल्या डोळ्यांसमोर चाललेला हा घोर अन्याय व जुलूम-जबरदस्ती पाहून तो पेटून उठला. त्याच क्षणी त्याने आपल्या मनाशी दृढ निश्चय केला. आता नोकरीला राम राम. आपल्या संसारावर तुळशीपत्र ठेवावे लागले तरी बेहत्तर. परंतु मुंबईतील गिरणीमध्ये काम करणाऱ्या दीन-दलित, स्त्री-पुरुष कामगारांवर दिवसाढवळ्या जे अत्याचार होत होते, त्यांचे क्रूर शोषण होत होते आणि अहोरात्र काम करवून घेऊन त्यांचे रक्त शोषले जात होते, त्यांना संरक्षण देणे आणि त्यांच्यावर होणारे अन्याय दूर करणे या लोककार्याला हयातभर वाहून घेण्याची या तरुणाने प्रतिज्ञा केली. नारायण मेघाजी लोखंडे हे या तरुणाचे नाव. भारतातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि आर्थिक क्रांतीचे आद्य जनक महात्मा जोतीराम फुले यांचे ते एक निष्ठावान, हुषार, तडफदार व कर्तृत्ववान सहकारी, दीनबंधू पत्राचे एक यशस्वी व समर्थ

संपादक, एक झुंझार पत्रकार. स्वत:चा संसार गरिबीने होरपळणार आहे हे स्पष्ट दिसत असतानाही मुंबईतील हजारो गिरणी कामगार स्त्री-पुरुष व लहान बालके यांच्यावर होणाऱ्या अनेकविध अन्याय निवारणार्थ; अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानासुद्धा स्वत:ला झोकून देणारा, निर्धारी व कर्तृत्ववान तरुण म्हणजे नारायण मेघाजी लोखंडे. ज्या कालात देशासाठी व समाजाच्या कल्याणासाठी थोडा जरी प्रयत्न केला तरी तो राजद्रोह किंवा स्वामिद्रोह ठरावा अशा १०० वर्षांपूर्वीच्या पारतंत्र्याच्या कालखंडात म. फुले यांच्या प्रेरणेने व त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईतील कामगार चळवळीला वाहून घेण्याचे असिधारा व्रत स्वीकारणे म्हणजे मोठे दिव्य होते. स्वत:च्या उभ्या संसाराची यामध्ये राखरांगोळी होणार होती. गिरणीमालक, भांडवलदार यांच्या नाराजीला, धाकधपटशहाला व प्रसंगी जिवावर बेतणाऱ्या प्रसंगाला सामोरे जावे लागणारे होते. परंतु थोर माणसे मळलेल्या वाटेने कधीही जात नाहीत, हेच खरे. जोतीबा फुले यांच्या दिव्य ज्योतीने प्रज्वलित झालेली ही दुसरी एक दिव्य ज्योत होती. या दिव्य ज्योतीने स्वत:च्या संसारापेक्षा हजारो गिरणी कामगारांचे होरपळणारे संसार सावरण्याचा, किंबहुना उभे करण्याचा निर्धार केला आणि त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांना संघटित होण्याची हाक दिली. माणुसकीला काळिमा फासणारे, बालक व प्रौढ स्त्री-पुरुष गिरणी मजुरांचे निर्दयपणे होणारे शोषण थांबविण्याचा त्यांनी दृढ निश्चय केला.

**लोखंडे - जन्म व शिक्षण :**

नारायण मेघाजी लोखंडे यांचा जन्म ठाणे येथे सन १८४८ मध्ये झाला. काहींच्या मते त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील सासवड येथे झाला असावा. थोर चरित्रलेखक कै. धनंजय कीर आणि इतर जाणकारांची मते विचारात घेता, श्री. लोखंडे यांचे जन्मठिकाण हेच होय. त्यांचे शिक्षणही ठाणे येथेच झाले. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यानंतर उदरनिर्वाहासाठी मुंबई येथे भायखळा भागात आगमन व वास्तव्य. भारतीय कामगार चळवळीचे जनकत्व ज्या नारायण मेघाजी लोखंडे यांचेकडे जाते व गिरणीमजुरांच्या कल्याणासाठी व त्यांच्या न्याय्य हक्कांच्या संरक्षणासाठी ज्यांनी

तन, मन व धन अर्पण करुन हयातभर झुंज दिली, त्या थोर सत्यशोधकाची वैयक्तिक माहिती, त्यानी स्वत: किंवा अन्य कुणी लिहून ठेवलेली नाही. म. जोतीराव फुले घ्या किंवा त्यांचे अनेक ज्येष्ठ सत्यशोधक सहकारी घ्या, यापैकी कुणीही आपले स्वत:चे चरित्र किंवा वैयक्तिक माहिती क्वचितच लिहून ठेवलेली आढळते. किंबहुना हे सर्व सत्यशोधक सर्वसामान्यपणे प्रसिद्धीपासून, जाणीवपूर्वक दूर राहिल्याचे आढळून येते. बरे, ज्यांच्याकडे विद्येची मक्तेदारी होती, त्यांनीही जोतीरावासह सरसकट सगळ्या सत्यशोधकांची उपेक्षा केली. त्यांची अवहेलना करण्याचा सातत्याने उद्योग केला. याचे अगदी अलीकडचे उदाहरण म्हणजे 'आधुनिक भारत' या लौकिकपात्र ग्रंथाचे लेखक व महाराष्ट्रातील विचारवंत भीष्माचार्य आचार्य शं. द. जावडेकर यांचे देता येईल. त्यांचा हा प्रमाण ग्रंथ वाचताना त्यांची समतोल विचारसरणी महात्मा फुले यांच्या कार्याला आपल्या लेखनात न्याय देऊ शकली नाही. प्रभाकर वैद्य यांनी 'म. फुले आणि त्यांची परंपरा' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे, आचार्य जावडेकर यांनी नाईलाज म्हणून फुल्यांच्या कार्याची जाता जाता बोळवण केली आहे. हा फुल्यांचा पराभव म्हणण्यापेक्षा आचार्यांच्या उदार व समतोल विचारशक्तीचा पराभव मानावा लागतो. थोडक्यात, गोरगरीब गिरणी कामगारांच्या सेवेला वाहिलेल्या या थोर कामगार नेत्याची किमान माहितीही उपलब्ध नसावी ही दुर्दैवाची गोष्ट होय.

हजारो गिरणीकामगारांचे संसार फुलविण्याचे असिधारा व्रत ज्यांनी हयातभर स्वीकारले ते लोखंडे एका माळी कुटुंबात जन्माला आले आणि त्यांनी हे कार्य सर्वस्व पणाला लावून पूर्ण केले. आजचे व त्यावेळचे कामगार जीवन विचारात घेतले तर महदांतर दिसून येईल. गिरण्यांतील व इतर क्षेत्रातील कामगारांना आज जे चांगले दिवस आलेले दिसतात त्यामागे किती मोठा इतिहास आहे. म. फुले, नारायण मेघाजी लोखंडे, डॉ. घोले आदी सत्यशोधकांचा किती मोठा त्याग आहे, हे समजून घेण्याची गरज आहे. मानवी स्वभावाप्रमाणे मानवाचे किंवा मानवी समाजाचे लक्ष भव्य देवालयाच्या शिखराकडेच वेधते. ज्या पायावर देवालयाची प्रचंड वास्तू उभी असते, त्याकडे फारसे कोणी लक्ष देत नाही. हीच रीत श्री. लोखंडे यांच्या बाबतीत दिसून येते.

श्री. लोखंडे यांनी मुंबईत आल्यानंतर प्रथम रेल्वेत नोकरी धरली. ती नोकरी सोडून पुढे त्यांनी पोस्टात नोकरी धरली. तीही नोकरी सोडून त्यांनी शेवटी मांडवी भागात एका गिरणीत कोठी-कारकून (Store Keeper) म्हणून नोकरी धरली. त्यांची ही शेवटची नोकरी होय. येथेच त्यांच्या भावी गिरणीकामगार चळवळीचा उगम व विकास झाला.

**देशातील गिरण्यांचा थोडा पूर्वेतिहास :**

श्री. कासवजी दावर यांनी मुंबई प्रांतात 'स्पिनिंग ॲन्ड विव्हिंग कंपनी' या नावाची पहिली गिरणी ७ जुलै, १८५४ रोजी सुरु केली. 'महात्मा जोतीबा फुले' या चरित्रग्रंथात कै. धनंजय कीर यानी याबाबत माहिती दिली आहे. श्री. दावर हे एक ३९ वर्षाचे तरुण व्यापारी होते. श्री. माणकजी पेटीट यांनी काही आठवड्यानंतर दुसरी गिरणी चालू केली. या अगोदर डॉ. भाऊ दाजी लाड या विचारवंत व दूरदृष्टीच्या सत्यशोधकाने १८५० सालात आपल्या देशात, विशेषत: मुंबईसारख्या शहरात गिरण्यांचा धंदा सुरु करण्याची कल्पना मांडली होती व त्यांची गरजही स्पष्ट केली होती. यावरुन देशातील गिरण्यांची मूळ कल्पना एका थोर सत्यशोधकाने मांडली आहे याची विशेष नोंद घेण्याची गरज आहे. 'कॉटन मिल्स इन इंडिया' या इंग्रजी ग्रंथात पान ७ वर ही नोंद आढळते. तथापि, या देशात प्रथम गिरण्यांची कल्पना व गरज प्रतिपादन करणाऱ्या डॉ. भाऊ दाजी लाड यांचे भान कुणाला आहे ? जी उपेक्षा इतर सत्यशोधकांची तीच उपेक्षा या कल्पक व दूरदृष्टीच्या सत्यशोधकाची झाली, असो.

सन १८७५ मधील देशातील विविध ठिकाणच्या गिरण्यांची संख्या विचारात घेता त्यावेळी मुंबईत ४१, कलकत्ता ५, मद्रास २, कानपूर ३ आणि हैद्राबाद, इंदूर व नागपूर येथे प्रत्येकी एक अशा एकूण ५४ गिरण्या चालू झालेल्या होत्या.

त्यावेळच्या मुंबई इलाख्यातील गिरण्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली. १८९५ च्या 'दीनबंधू' च्या अंकातील छापील माहितीप्रमाणे त्या सालात मुंबई ६७, अहमदाबाद १४, बडोच ३, सुरत ३, ठाणे २ आणि खेडा, जळगांव, नासिक, पुणे, सोलापूर, बेळगाव व धारवाड या ठिकाणी प्रत्येकी एक अशा एकूण ९६ सुताच्या व कापडाच्या गिरण्या होत्या असे आढळून येते.

'दीनबंधू' च्या १८९५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अंकात श्री. लोखंडे यांनी गिरण्यात काम करणाऱ्या स्त्रिया आणि बालकामगार यांची संख्या देऊन त्यांचेकडून रोज किती तास काम करून घेतले जाते याचीही तपशीलवार माहिती दिली आहे, ती पुढीलप्रमाणे--

**कोष्टक क्र. १**

**गिरण्यात काम करणाऱ्या बायका (स्त्रिया) १८९५**

| | |
|---|---|
| (१) एकूण कामगार बायका | २६,३३४ |
| (२) गिरण्यात काम करणाऱ्या बायका | २५,६८८ |

**कोष्टक क्र. २**

**बायकांकडून रोज करून घेतले जाणारे काम (१८९५)**

| | |
|---|---|
| (१) ठाणे, बडोच व अहमदाबाद | १० तास |
| (२) बेळगाव | ९ तास |
| (३) पुणे व धारवाड | १० तास |
| (४) खेडा | १०-१/२ तास |
| (५) सुरत | ९-१/२ तास |

**कोष्टक क्र. ३**

**बालकामगारांची संख्या**

| | |
|---|---|
| (१) बालकामगार (मुले) | ४,९६० |
| (२) बालकामगार (मुली) | १,४६४ |
| एकूण | ६,४२४ |

या बालकामगारांकडून रोज किमान ७ तास काम करून घेतले जात असे.

वरील सर्व तपशिलावरून हे स्पष्ट होते की, गिरणी मालक आणि त्यांनी गिरण्यात नेमलेले मोठे अधिकारी यांच्या इच्छेवर किंवा लहरीवर पुरुष, स्त्रिया व बालकामगार यांच्याकडून रोज किती तास काम करून घ्यावयाचे आणि त्यांचे शोषण कितपत करावयाचे या सर्व गोष्टी अवलंबून असत. प्रत्येक गिरणीत कामाच्या

वेळा ठरविल्या जात नसत. कामासंबंधीचे समान धोरण किंवा पगारासंबंधीचे काही निश्चित धोरण ठरविले जात होते असे दिसून येत नाही. यामुळे कामगारांचे मुक्तपणे शोषण होणे अपरिहार्य होते.

**गिरणीकामगारांची तत्कालीन दयनीय स्थिती :**

'मुकी बिचारी कुणी हाका' अशी गिरणी कामगारांची त्यावेळी दयनीय स्थिती होती. दिवसरात्र जनावरासारखे गिरणीत काम करावे; श्रीमंत मालक जेवढा देईल तेवढा मोबदला मुकाट्याने घ्यावा. दिला जाणारा अल्पसा मोबदला वेळेवर द्यावा; यासाठी मालकाची विनवणी करावी किंवा प्रसंगी पाय धरावे; त्यातून कोणी थोडी जरी कुरकुर किंवा तक्रार करु लागला तर त्यास लाथा घालून हाकलून द्यावे. मजूर स्त्रिया आणि बालके यांची अवस्था तर याहून भयाण-भीषण अशी होती. त्यांचे होणारे अघोरी शोषण आणि त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार ही नित्याची गोष्ट होऊन बसली होती. दर दिवशी किमान १४ तास कोंदट जागेत व कोंदट हवेत मरमर काम करावे; त्यातून थोडा वेळ जरी मोकळ्या हवेत जाण्याचा कुणी प्रयत्न केला तर त्यास चार आणे दंड केला जाई. चार आण्याची किंमत त्यावेळी मिळणाऱ्या पगाराच्या मानाने किती मोठी असणार याची आपण कल्पना करु शकतो. कोंडलेल्या अवस्थेत, कापसाचे बारीक धागे नाकातोंडात जाण्यामुळे आणि स्वच्छ हवेच्या अभावी कित्येक मजूर क्षय, दमा व इतर आजारांना बळी पडत. लहानमोठ्या अपघातात होणाऱ्या मनुष्यहानीसाठी किंवा दुखापतीवरील उपचारांसाठी कोणत्याही प्रकारचा मोबदला अगर नुकसानभरपाई मिळण्याची कोणतीच सोय नव्हती. त्यामुळे अपघातात सापडलेल्या व अधू झालेल्यांना नोकरीला मुकावे लागे. त्यांचे संसार उघड्यावर पडत असत. भयंकर अपघातामुळे मृत्यू पावलेल्या मजुरांच्या कुटुंबीयांची अवस्था काय होत असेल याची आपण कल्पना करु शकतो. ना कायद्याचे, ना मालकांचे, ना सरकारचे संरक्षण. गिरणी मालकांची लहर लागेल तशी वागणूक आणि मनाला येईल तसा कारभार, असा तो काळ होता.

ही दयनीय स्थिती दूर होऊन गिरणी कामगारांना संरक्षण व स्वास्थ्य मिळावे यासाठी लोखंडे यांनी अहोरात्र प्रयत्न केले. सन १८९५ मध्ये त्यांनी 'दीनबंधू'त प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीवरुन त्या काळात दुखापत झालेल्या, स्त्री-पुरुष कामगारांची

संख्या १०४५ आणि ठार झालेल्या कामगारांची संख्या १० होती, असे त्यांनी दाखवून दिले आहे. गिरणी मालक व त्यांचे बडे अधिकारी यांच्या मनमानी कारभारास आणि माणुसकीहीन प्रवृत्तीस आळा बसावा म्हणून फॅक्टरी इन्स्पेक्टरची नियुक्ती करावी असा आग्रह त्यांनी धरला. या फॅक्टरी इन्स्पेक्टरनी वारंवार गिरण्यांना भेट देऊन गिरणी मालकांनी कामगारांसाठी ज्या सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या असतात त्यांची पाहणी करावी आणि कामगारांच्या हितरक्षणाची बाजू घ्यावी अशी अपेक्षा होती. तथापि, भांडवलदार गिरणी मालक हे पैशांच्या आणि अधिकाऱ्यांच्या बुद्धीच्या बळावर फॅक्टरी इन्स्पेक्टरला वश करीत किंवा विकत घेत. पाणी, हवा, औषधोपचार, सुट्ट्या, कामाचे तास आणि इतर सुखसोयी याबाबत फॅक्टरी इन्स्पेक्टरने कटाक्षाने नजर ठेवून कामगार कल्याणाची काळजी घ्यावी, ही अपेक्षा यामुळे फोल ठरत असे. लोखंडे यांनी १४ जुलै, १८९५ च्या अंकात दिलेल्या माहितीप्रमाणे फॅक्टरी इन्स्पेक्टरनी त्या वर्षात २७२ कारखान्यांपैकी २११ कारखाने ३ पेक्षा जास्त वेळा, २८ कारखाने तीनदा, २१ दोनदा आणि १२एकदाच तपासले. खानदेशातील एकही कारखाना तपासण्यात आला नाही.

अर्थात ही तपासणी बहुतांशी एक फार्सच ठरे. कारण वर सांगितल्याप्रमाणे फॅक्टरी इन्स्पेक्टर बहुधा गिरणी मालकांच्या आमिषांना बळी पडत. या एकूण दयनीय व संतापजनक परिस्थितीबद्दल लोखंडे यांनी भांडवलदार गिरणीमालक व त्यांचे लठ्ठ पगाराचे वरिष्ठ अधिकारी आणि इंग्रजी सरकार यांचा खरपूस समाचार घेऊन; गोरगरीब गिरणीमजूर आणि इतर संबंधित सर्वांनाच धोक्याचा लाल कंदील दाखवून सावधगिरीचा इशारा दिला आहे. हे पुढील तपशिलावरुन स्पष्ट होईल.

### इंडियन फॅक्टरी ॲक्टन्वये सन १८९४ सालचा मुंबई इलाख्यातील कारखान्याचा रिपोर्ट :

'यातील कामगारहिताच्या बाबी धाब्यावर बसविल्या जातात, त्यामुळे याची अंमलबजावणी संतोषजनक झाली असे म्हणणे मोठ्या चुकीचे आहे.' असे लोखंडे यांनी ७ जुलै, १८९५ च्या दीनबंधू अंकात स्पष्ट केले आहे.' 'गिरण्यांची व्यवस्था लबाड लोकांच्या लबाड्या चालू देण्यास चांगल्या बंदोबस्ताची आहे. फॅक्टरी इन्स्पेक्टर येत आहे असे समजले की, जिकडे तिकडे ३-४ मिनिटात बंदोबस्त अशा तपासणीचे

नाटक निरुपयोगी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. त्यापेक्षा हा धाब्यावर बसविला जाणारा फॅक्टरी ॲक्ट रद्द केला तर बरे." असा आशावादी अभिप्रायही दिला आहे.

रजेच्या दिवशी कामगारास कामावर बोलवू नये. बोलविल्यास नंतर त्यास तेवढी रजा द्यावी. यास कोणी नकार दिल्यास त्याच्यावर अन्याय होत असे. कोणी बडतर्फ होई तर कुणाचा पगार कापला जाई. खरोखर हा कायदा अमलात आणावयाचा असल्यास विलायतेप्रमाणे एकंदर व्यवस्था ठेवावी.

## 'इंग्रजी सरकारचे राज्यात मोंगलाई' -- दीनबंधू १-४-१८९४ :

या शीर्षकाखाली अग्रलेख लिहिला असून त्यात श्री. लोखंडे यांनी 'पोटापुरते मिळविण्यास रक्ताचे पाणी करुन घ्यावे लागते' असे म्हटले आहे. सरकारी यंत्रणा भांडवलदार गिरणीमालकांची बाजू घेऊन मजुरांवर दोघे मिळून अन्याय करतात. अज्ञान व गरिबीमुळे मालकापुढे मजुरांचा टिकाव लागत नाही. दिवसाढवळ्या गरीब मजुरांवर पाहिजे तसा अन्याय केला जातो. त्यावेळचे सुपारी बागेनजीकचे जेकब मिलमधील उदाहरण दिले आहे. सुमारे ४०० मजूर बायका कामाच्या मानाप्रमाणे मजुरी मिळावी म्हणून काम सोडून उभ्या राहिल्या. त्यांना दाद मिळण्याचे राहिलेच परंतु त्यातील २९ बायकांवर धांदल केल्याचा आरोप ठेवून दंड बसविला. ९-१० रुपयांचे काम करुन ५-६ रुपये हाती पडत असत. या अग्रलेखात संतापाने श्री. लोखंडे म्हणतात, 'गरीब बिचारे पोटार्थी मजूर-लोकांवर जुलूम केल्याने ईश्वराचे गुन्हेगार व्हावे लागते, हे व्यवस्थापकांनी पक्के लक्षात ठेवले पाहिजे. कारण या सर्व कृत्यांचा झाडा यापुढे द्यावा लागेल.'

'कमी तास मजुरी यातच फायदा आहे' या दीनबंधू ३ जून , १८९४ मधील अग्रलेखात ते म्हणतात, "पश्चिमात्य देशात मजुरास अधिक मोल देऊन व त्याजकडून कमी तास मजुरी घेऊन आणि चांगला माल उत्पन्न करिता येऊन जर त्या देशातील व्यापारास तेजी येते, तर तीच योजना आमच्या देशात आणली असता फायदा होणार नाही कशावरुन ? पण बाबा आदमच्या वेळेपासून वंशपरंपरेने चालत आलेल्या चालींचे मेंढराप्रमाणे अनुकरण करणाऱ्या आमच्या श्रीमान गिरणीवाल्यांचे व कारखानदारांचे ह्या बाबतीसंबंधी डोळे उघडतील तेव्हा ना ? 'इंग्रजी सरकारच्या

राज्यात असली बेकायदा कृत्ये करणाऱ्यास तुरुंगाच्या शिक्षा होत असून हे लुटारू लोक मात्र राजरोस आपला धंदा चालवित असत. तिकडे कोणीच ढुंकून पाहत नाहीत. हे नवल नव्हे काय ?' (दीनबंधू १८-११-१९९४) यावरून लोखंडे यांचा गाढ्या अभ्यासाबरोबर, परंपरावादी भांडवलदार गिरणीमालकाबद्दलचा रास्त रोषही स्पष्ट होतो.

### गिरणमालकांची झोटिंगशाही :

'गरीब व अज्ञात लोक जेव्हा पोटासाठी खपतात तेव्हा ते आपल्या धन्याचा जुलूम त्यास सहन होईपर्यंत सोसतात. परंतु जो जुलूम जेव्हा मर्यादेबाहेर जातो तेव्हा त्यांच्या डोक्यात येईल तसा प्रकार करण्यास ते प्रवृत्त होतात.' (रा. ब. लोखंडे - दीनबंधू दि. ११-८-१८८५)

मुंबई येथे अमदाबाद गिरण्यातील संपाच्या निमित्ताने दडपशाही चालू झाली. आठवड्यास होणारा पगार १५ दिवसांनी करण्याचा मालकांनी निर्णय घेतला. हा निर्णय मजुरांना अंधारात ठेवून घेतला गेला. श्रीमंत व उन्मत्त गिरणीमालक अधिकारी व इतर यंत्रणा वेठीस धरून मन मानेल तसा कारभार करत. नीतिनियम व व्यवहार यांचा विचारच होत नसे.

उदाहरण म्हणून लोखंडे यांनी परेल येथील वाडीया मिलचे दिले आहे. त्यावेळी ही गिरणी पहाटे ५ वाजता चालू होई व सायंकाळी ५ वाजता बंद होत असे. एखादा कामगार ५-१० मिनिटे उशिरा आला तर त्याला दंड केला जात असे. आजारी पडणे हा भाग माणसाच्या हाती नसतो. तथापि, आजारी माणसाला रजा मंजूर न करता त्याचा पगार कापला जात असे. आजार किरकोळ असेल तर ठीक. दीर्घ आजारात पगार नाही म्हणून वाणी धान्य व किराणा अशा वस्तू देत नाही. दिल्या तरी पुढील व्याज लावूनच देतो. याप्रकारे कामगाराचे शोषण सर्वांकडून सातत्याने होई आणि प्रसंगी अन्यायाची परिसीमा गाठली जाई. अशा प्रकारच्या जुलमामुळे भरडून निघणारे गिरणी मजूर जर विघातक मार्गाकडे वळले तर नवल वाटण्याचे कारण नाही. म्हणून लोखंडे यांनी 'आमच्या इंग्रज सरकारचे राज्यात गिरण्यांच्या मालकांची झोटिंगशाही' या शीर्षकाखाली दीनबंधू दि. ११-८-१८८५ च्या अंकात अग्रलेख लिहून कोरडे ओढले आहेत.

## महात्मा फुले यांची प्रेरणा :

आधुनिक भारतातील समाजक्रांतीचे, शेतकरी व मजुरांच्या चळवळीचे आद्य जनक महात्मा जोतीराव फुले यांची प्रेरणा श्री. लोखंडे यांना लाभली आहे हे स्पष्ट आहे. सत्यशोधक समाजाच्या कामाच्या निमित्ताने फुले वरचेवर मुंबईस जात येत होते. गिरणीत काम करणाऱ्या स्त्री-पुरुष कामगारांची आणि बालमजूर यांची हीन-दीन अवस्था त्यांच्या नजरेतून सुटणे शक्य नव्हते. फुल्यांच्या एकूण कार्याचा विचार केल्यास जवळजवळ सर्वच क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य हे शाश्वत तत्त्वावर आधारित व सर्वसमावेशक असे आहे. थोर विचारवंत श्री. प्रभाकर वैद्य यांनी 'महात्मा फुले आणि त्यांची परंपरा' या ग्रंथात म्हटले आहे, 'महात्मा फुले हे त्यांच्या समकालीन विचारवंत नेत्यापेक्षा ऐतिहासिकदृष्ट्या, गुणात्मकदृष्ट्या आणि प्रत्यक्ष टिकाऊ प्रभावाच्या दृष्टीनेसुद्धा अगदी वेगळे वाटतात. असे म्हणण्यात आज शंभर वर्षांनी मागे वळून पाहता यत्किंचितही अतिशयोक्ती नाही. फुल्यांनी दिलेल्या प्रेरणा अजूनही स्फूर्तिदायक ठरतील. त्यांनी पेटविलेल्या ज्योती अजूनही प्रभावी मार्गदर्शन करू शकतील. हे भाग्य, ही महत्ता महाराष्ट्रातील दुसऱ्या कोणत्या विचारवंताला - नेत्याला लाभली असेल, असे म्हणता येणार नाही.'

श्री. वैद्य यांच्या या मताचा विचार करता म. फुले यांच्या क्रांतिकार्याची थोरवी सहज लक्षात येते. त्यांच्या चौफेर व सर्वसमावेशक चळवळीमध्ये मुंबईतील पिळला जाणारा, शोषला जाणारा स्त्री-पुरुष व बालकामगार सुटणे शक्य नव्हते. त्यात श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांच्यासारखा तडफदार, ध्येयनिष्ठ, सचोटी व बुद्धिमान सत्यशोधक सहकारी लाभल्याने दुधात साखर पडल्यासारखे झाले. गिरणीकामगारांची हीन-दीन अवस्था पाहून म. फुले आणि लोखंडे यांनी या शोषणमुक्तीच्या कार्यास आरंभ केला. उच्चवर्णीयांकडून प्रदीर्घ काल शोषला जाणारा दीन-दलित समाज आता नव्याने गिरणीमालक म्हणून निर्माण झालेल्या श्रीमंतांकडून बेछूटपणे शोषला जात होता. त्यासाठी या भांडवलदार वर्गाने शोषणाची अनेक नवी तंत्रे व युक्त्या-प्रयुक्त्या शोधून काढल्या होत्या. त्यामुळे शूद्र-अतिशूद्र, गोरगरीब व समाजातील श्रमजीवींच्या गळ्याला पूर्वी लावलेला फास पुढे नव्या स्वरुपात कायमचा राहिला.

## सत्यशोधक चळवळ हीच कामगार चळवळीची गंगोत्री :

सुरुवातीला सत्यशोधक चळवळीचा एक भाग म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांच्या कल्याणाचे आणि त्यांच्या किमान हक्क - संरक्षणाचे कार्य चालू करण्यात आले. म. फुले यांच्यापासून श्री. लोखंडे यांनी प्रेरणा घेतली आणि त्यांनी गिरणीकामगार चळवळीत स्वत:ला झोकून दिले. गिरणीकामगारांची तत्कालीन हृदयद्रावक स्थिती पाहून लोखंडे यांच्यासारखा तेजस्वी तरुण पेटून उठला. त्यांनी आपल्या संसारावर तुळशीपत्र ठेवून हयातभर गिरणी-कामगारांचेच संसार फुलविण्याचे कंकण हाती बांधले. श्री. लोखंडे हे जोतीराव फुले यांचे एक विश्वासू निकटवर्ती व कर्तृत्वसंपन्न सत्यशोधक सहकारी होते. त्यामुळे शंभर वर्षापूर्वी पारतंत्र्याच्या कालखंडात गिरणीमालक भांडवलदारांच्या सर्व प्रकारच्या विरोधाला अगर धाक-धमक्यांना न जुमानता त्यांनी गिरणीकामगारांना सत्यशोधक समाजाच्या कावड झेंड्याखाली आणण्याचा प्रयत्न चालू केला. 'कामगारांनो एक व्हा' अशी त्यांनी हाक दिली. सुरुवातीला मालकांच्या भीतीमुळे फारसे कामगार एकत्र येण्यास धजेनात. तथापि, लोखंडे यांनी परिस्थितीचा अभ्यास करून दूरदृष्टीने आपले संघटना बांधणीचे कार्य अव्याहतपणे व कौशल्याने चालूच ठेवले. हळूहळू कामगारांचा प्रतिसाद मिळू लागला. या कार्यात श्री. लोखंडे यांना मुंबईतील खोजा समाजातील एक थोर समाजसेवक भाई हजरतभाई नानसी तसेच श्री. सोराबजी शापूरजी बंगाली व इतर काही सत्यशोधक कार्यकर्त्यांचे चांगले सहकार्य लाभले. यापूर्वी कामगारांची गाऱ्हाणी वेशीवर टांगणारी एकही संघटना अस्तित्वात नव्हती.

दरम्यान मार्च, १८७५ मध्ये त्यावेळच्या ब्रिटिश सरकारने गिरणी कामगारांची चौकशी करुन त्यांच्या काही प्रश्नांचे निवारण करता येईल का याचा अभ्यास करण्यासाठी एक मंडळ नियुक्त केले. त्यावेळी मुंबई व इतर ठिकाणच्या गिरण्यांची एकूण संख्या ५४ झालेली होती. त्यामुळे गिरणी कामगारांची संख्याही वाढली होती व वाढत होती. त्यांचे प्रश्नही वाढत होते. त्यांना दिलासा देण्याची नितांत गरज होती. तथापि, बेरक्या गिरणी मालकांनी वेगळीच कलाटणी दिली. गिरण्यांचा धंदा हा नव्यानेच सुरु झालेला असल्याने तो जर नीट चालावयाचा असेल तर नजीकच्या भविष्यकाळात या धंद्यावर कोणत्याही प्रकारची बंधने असू नयेत. तसेच गिरणीतील बरेच काम कंत्राटी पद्धतीने दिले जात असल्यामुळे ते काम गिरणी मजुरांच्या

अंगावर दिल्यासारखे असते. तेव्हा गिरणी कामगारांना संरक्षण किंवा सोईसवलती देणे किंवा त्यांच्या इतर कल्याणकारी प्रश्नांचा विचार करणे या बाबी गैरलागू ठरतात. या ना त्या क्लुप्त्या ठरविण्यात भांडवलदार वर्ग नेहमीच अग्रेसर असतो. त्यानुसार हे निवेदन होते हे स्पष्ट आहे. तथापि श्री. लोखंडे यांच्यासारख्या कल्पक ध्येयवादी आणि दूरदृष्टीचा सच्चा सत्यशोधक या भूलथापांना बळी पडणे शक्य नव्हते. त्यांनी सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून गिरणी कामगारांना संघटित करुन न्याय मिळवून देण्याचे कार्य चालूच ठेवले. एक विलक्षण योगायोग म्हणजे म. फुले यांचे विचार व आचार मार्क्सच्या विचार-आचारांशी मिळतेजुळते असे आढळून येतात. गिरणीकामगारांच्या बाबतीत मुंबई येथे फुले यांच्या मार्गदर्शनाखाली जी कामगार चळवळ उदयाला आली व विकास पावली त्या पाठीमागची भूमिका समजून घेण्यासारखी आहे.

**फुले आणि मार्क्स तत्त्वज्ञानातील विलक्षण साम्य :**

महात्मा फुले यांच्या तत्त्वज्ञानाची आणि त्याप्रमाणे वृत्तीची व्यापकता, सर्वसमावेशकता आणि क्रांतिकारकता पूर्णपणे समजण्यासाठी आजवर झालेला फुल्यांचा अभ्यास अपुरा वाटतो. कदाचित प्रतिकूल परिस्थितीमुळे मार्क्स किंवा त्याचा कम्युनिस्ट मेनिफेस्टो फुल्यांना वाचण्यास मिळाल्या नसण्याची शक्यता आहे. तथापि, आपल्या देशातील 'गुलामगिरी' बरोबर अमेरिकेतील निग्रोंच्या गुलामगिरीची त्यांना चिंता वाटते हे विशेष होय. इतका विश्वव्यापक कल्याणकारी विचार तत्कालीन अन्य भारतीयामध्ये आढळत नाही म्हणून प्रभाकर वैद्य यांनी 'म. फुले आणि त्यांची परंपरा' या ग्रंथात (पा. ५२) म्हटले आहे, 'पण कम्युनिस्ट मेनिफेस्टोची श्रमिक-दलित जनतेसंबंधी मूळ प्रेरणा आणि फुल्यांच्या स्त्री-शूद्र-अतिशूद्रांची प्रेरणा ही एकमेकांपासून फारशी भिन्न नाहीत. वेगळ्या परिस्थितीत, वेगळ्या परिभाषेत फुले बोलत होते एवढेच म्हणता येईल. उच्चवर्णीय-उच्चवर्गीय, मूठभर शोषक-शासक यांच्याविरुध्द, त्यांच्या सर्वंकष सत्तेच्या मक्तेदारीविरुद्ध दलित-शोषित-श्रमिक यांचे आव्हान, त्यांचा उठाव हाच फुल्यांना अंतिमत: अभिप्रेत होता.'

यावरुन फुले यांच्या शाश्वत मूल्यावर आधारित अशा तत्त्वज्ञानाचा पल्ला किती दूरवर पोचतो आणि त्याची मूलगामी प्रेरणा भारतीय कामगार चळवळीची

गंगोत्री कशी ठरते, हे स्पष्ट होते. श्री. वैद्य यांनी आपल्या वरील पुस्तकात (पा ४९) वर म्हटल्याप्रमाणे हा देश कोणाचा याविषयी लिहिले आहे, 'वर्षासाठी नाताळच्या सुट्टीमध्ये जमणाऱ्या राजनिष्ठ उच्चवर्णीय व उच्चवर्गीय शेठ सावकरांचा, जमीनदार-सरंजामदारांचा, बॅरिस्टर-डॉक्टरांचा, विद्वानांचा, सर-सरदारांचा वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचा आणि काही गोऱ्या प्रतिष्ठितांचा ? की शूद्र-अतिशूद्रांचा, गोरगरीब शेतकऱ्यांचा, शेतमजुरांचा, उघड्या-नागड्या लंगोटीवाल्यांचा, असंस्कृत अक्षरशत्रूंचा, मागास जातिजमातींचा, अस्पृश्यांचा, अर्धपोटी दुष्काळग्रस्तांचा ? शहरात राहून बग्गीतून फिरणाऱ्या श्रीमंतांचा की खेडोपाडी थंडीवाऱ्यात, अनवाणी, अर्धपोटी राबणाऱ्या नागड्या-उघड्या जनतेचा ? हा सवाल फुल्यांनी प्रथम उठविला आणि नंतर जन्मभर मिळेल तेव्हा जमेल तेथे ते उठवत राहिले.

यावरुन जोतीराव फुले या महात्म्याचे माहात्म्य आणि दीन-दलित समाजाच्या सर्वांगीण उद्धाराची संकल्पना स्पष्ट होते. भारतीय कामगार चळवळीची मूळ व्यापक प्रेरणा म. फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज चळवळीची आहे हे स्पष्ट होते. ही प्रेरणा अनेक मान्यवरांनी स्वीकारुन कामगार व शेतकरी यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ते प्रवृत्त झाले. त्यामध्ये लो. टिळक, केशवराव मेघे, दिनकरराव जवळकर, शंकरराव मोरे वगैरेंचा समावेश होतो. श्री. लोखंडे यांच्यानंतर सत्यशोधक श्री. दिनकरराव जवळकर यानी मुंबईत कामगारवर्गात केलेले कार्य उल्लेखनीय आहे. लो. टिळक शेतकरी कामकऱ्यांच्या प्रश्नांकडे वळले ते या प्रेरणेतून असे काही विचारवंतांचे जे मत आहे ते बरोबर आहे. पुढे 'दाभाडी प्रबंधा' ची जी रचना झाली त्यातील धागे-दोरे फुले तत्त्वज्ञानाशी निगडित असे आहेत. तेव्हा सन १८१८ मध्ये मार्क्सचा तर सन १८२७ मध्ये जोतीरावांचा जन्म झालेला असला आणि उभयतांचा प्रत्यक्ष असा संबंध आलेला नसला तरी दोघांच्या प्रेरणेत विलक्षण साम्य आहे. म्हणून फुल्यांना अनेक लेखकांनी 'महाराष्ट्राचा मार्क्स' असे म्हटले आहे ते याच अर्थाने.

### भारतीय कामगार चळवळीची वाटचाल :

भारतीय कामगार चळवळीची मूळ प्रेरणा फुल्यांची असून तिचा उगम मुंबईत झालेला आहे हे आता स्पष्ट आहेच. ही प्रेरणा घेऊन श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी आपल्या संघटना कौशल्याचा, कल्पकतेचा व दूरदृष्टीचा वापर करुन गिरणी-

कामगारांची संघटना बांधण्याचे कार्य जिद्दीने चालू केले. हळूहळू गिरणीकामगार संघटित होऊ लागले. श्री. लोखंडे यांच्या नेतृत्त्वाखाली गिरणीकामगारांच्या प्रश्नावर मागण्यांची निवेदने गिरणी मालकांना व ब्रिटिश सरकारला देण्यात येऊ लागली. अगदी सुरुवातीला १८७५ मध्ये सरकारने कामगारांची चौकशी करुन शिफारशी करण्यासाठी एक मंडळ नेमले होते. परंतु गिरणी मालकांनी हुषारीने अनेक लंगड्या सबबी पुढे करुन कामगारांच्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता दाखविल्या, याची माहिती दिलीच आहे. तरीसुद्धा श्री. लोखंडे यांनी कामगारांच्या मागण्यांचा सातत्याने पाठपुरावा चालूच ठेवला.

१८८१ मध्ये गिरणीकामगारांच्या हितासाठी एक कायदा करण्यात आला, परंतु तोही कागदावरच राहिला. तथापि, हा कायदा व्यर्थ गेला नाही. ब्रिटिश सरकारने मँचेस्टर येथील कापड गिरण्यातील मिडकिंग नावाच्या कारखाना तपासनिसाची निरीक्षक म्हणून नियुक्ती केली. १८८१ च्या कायद्याप्रमाणे कामकाज चालले आहे किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी श्री. मिडकिंग यांच्यावर सोपविण्यात आली. त्याने मुंबईस येऊन गिरण्यांची पाहणी केली आणि आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यात ते म्हणतात, 'आठ वर्षातील मुलांना कारखान्यात कामास ठेवू नये. मुलींना आणि स्त्रियांना सकाळी सहाच्या पूर्वी किंवा सायंकाळी सहानंतर काम करावयास लावू नये. कामाच्या वेळात विश्रांतीसाठी सुटी असावी.' (म. जोतीराव फुले - ले. धनंजय कीर, पा. २२२)

श्री. मिडकिंग यांनी सरकारला सादर केलेल्या अहवालाचा सरकारवर चांगला परिणाम झाला, त्यामुळे पुढील चांगल्या घटना घडल्या.

(१) मुंबईचे जिल्हाधिकारी डब्ल्यू. बी. मुळक यांचे अध्यक्षतेखाली १८८४ साली नवे चौकशी मंडळ नेमण्यात आले. त्यात एम. बी. जिजीभाई मॅजेरजी एन. बानाजी, सोराबजी एस. बंगाली, मंचेरजी मुरबान, डॉ. थॉमस लॅने आणि जी. कॉटन हे सभासद होते.

(२) डॉक्टरांची एक खास समिती नेमून गिरणी कामगारांची आरोग्यरक्षण व्यवस्था कशी काय आहे याचा अहवाल देण्यास सांगण्यात आले.

(३) श्री. नारायण मेघाजी लोखंडे व इतर पस्तीस जाणकारांच्या चौकशी मंडळापुढे परिणामकारक अशा महत्त्वाच्या साक्षी झाल्या.

यानंतर सरकारने काही हितकारक निर्णय घेतले ते पुढीलप्रमाणे :

१) कारखान्यात कामास जाणाऱ्या मुलाचे वय किमान सात ऐवजी नऊ करण्यात आले.

२) मुलाने सकाळी ७ ते सायंकाळी ५ पर्यंत काम करावे.

३) जेवण व विश्रांतीसाठी मध्ये एक तास सुट्टी देण्यात यावी.

४) मुलींना व स्त्रियांना महिन्यातून चार सुट्या देण्यात याव्यात.

५) गिरणी कामगारांसाठी आरोग्यविषयक सुविधांचा समावेश करावा.

तथापि १८८१ मध्ये ब्रिटिश सरकारने जो पहिला कारखाना कायदा केला तो कामगारांचे अनेक प्रश्न प्रदीर्घ काल दुर्लक्षित राहिले होते ही स्थिती विचारात घेता फारच अपुरा, असमाधानकारक आणि महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत कामगारांच्या प्रश्नांना वाटाण्याच्या अक्षता लावणारा ठरला.

श्री. लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली संघटनेची शक्ती दिवसेंदिवस वाढतच होती. छोट्या-मोठ्या सभा घेऊन कामगार जागृतीचे आणि संघटनाशक्ती वाढविण्याचे प्रयत्न जारीने व सातत्याने चालूच होते. १८८४ मध्ये सप्टेंबर २३ आणि २६ तारखांना श्री. लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या प्रचंड सभा झाल्या. संघटना शक्ती चांगली वाढल्याचे स्पष्ट झाले. कामगारांमध्येही आत्मविश्वास वाढत चालला. पूर्वीच्या कामगारविषयक कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी सरकारने 'इंडियन फॅक्टरी कमिशन' नियुक्त केले. साडेपाच हजार कामगारांच्या सह्यांचे मागणी निवेदन श्री. लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली कमिशनला सादर करण्यात आले. त्यामधील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत्या. --

१) कामाचे तास कमी करावेत.

२) सर्व कामगारांना आठवड्यातून एक सुट्टी मिळावी.

३) जेवणासाठी किमान अर्ध्या तासाची सर्व कामगारांना सुट्टी मिळावी.

४) कामगारांचा पगार वेळेवर व्हावा. किमानपक्षी मागील महिन्याचा पगार पुढील महिन्याच्या १५ तारखेच्या आत व्हावा.

५) अपघातात सापडलेला कामगाराला नुकसानभरपाई व रजेचा पगार मिळावा.

त्या काळाचा विचार करता आजच्याप्रमाणे संघटनांच्या मागण्यांचा तितक्या तत्परतेने विचार होण्याची शक्यता नव्हती. सरकार भांडवलदार धार्जिणे, भांडवलदारांची प्रचंड आर्थिक शक्ती आणि आजच्या परिस्थितीत किती फरक आहे याची आपण कल्पना करु शकतो. तथापि श्री. लोखंडे यांच्या कुशल व समर्थ नेतृत्वाखाली प्रयत्नांची पराकाष्ठा चालू राहिली. प्रतिगामी शक्तीशी सातत्याने प्रखर झुंज चालू ठेवण्यात आली. २४ एप्रिल, १८८९ रोजी श्री. लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली १७,००० कामगारांचे सह्यांचे निवेदन गव्हर्नर जनरल यांना सादर करण्यात आले. 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' कडेही १०,००० कामगारांच्या सह्यांचा मागणी अर्ज देण्यात आला. त्यामध्ये कामगारांच्या प्रमुख मागण्यांचा समावेश होता. तसेच या सर्व मागण्या लवकरात लवकर मंजूर कराव्यात असा आग्रह धरण्यात आला. विशेष म्हणजे या निवेदनामध्ये सह्या करणाऱ्यात स्त्रियांची संख्याही खूप मोठी होती.

### १० जून, १८९० चा सुवर्णदिन :

कामगार संघटनाशक्तीचा रेटा आणि संघटना शक्तीचे वाढते बळ विचारात घेऊन मनात असो वा नसो 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशनने' १० जून,१८९० रोजी सर्व कामगारांना साप्ताहिक सुट्टी मंजूर केली. कामगार संघटनेचे नेते श्री. नारायणराव लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली साकार झालेल्या व चांगले बाळसे धारण केलेल्या संघटनाशक्तीचा हा पहिला मोठा विजय होता. हा अखिल भारतातील श्रमिकांचा पहिला जय होता. संघटनाशक्तीची ही पहिली राष्ट्रीय निशाणी होती. सुवर्णाक्षरांनी कोरुन ठेवावा असा हा सुवर्णदिन होता. संघटनाशक्तीच्या विजयाची ही पताका होती. या विजयामुळे स्त्री-पुरुष कामगारांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यांच्या आनंदाला उधाण आले. श्री. लोखंडे आणि म. फुले यांचा जयजयकार गगनात दुमदुमू लागला. सर्व श्रमिकांमध्ये एक प्रकारचा नवा जोम, नवा जोश निर्माण झाला. सर्वांना नवी स्फूर्ती मिळाली.

### भारतातील पहिल्या कामगार संघटनेची स्थापना :

थोर सत्यशोधक श्री. लोखंडे यांच्या समर्थ नेतृत्वाखाली **'बॉम्बे मिलहॅन्डस् असोसिएशन'** ही भारतातील पहिली संघटना स्थापन करण्यात आली. कामगार-विश्वात ही एक अपूर्वाईची व अभूतपूर्व अशी क्रांतिकारक घटना होती. कामगार चळवळीला मिळालेली ही नवी सांघिक शक्ती होती. हजारो कामगारांच्या

आशा-आकांक्षांचे एक प्रतीक होते. कामगार चळवळीच्या इतिहासातील हे एक सुवर्णपान ठरले. या पहिल्यावाहिल्या कामगार संघटनेचे अध्यक्ष म्हणून श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांची तर चिटणीस म्हणून श्री. डी. सी. अथेड यांची निवड करण्यात आली. यामुळे भारतातील कामगार क्षेत्रात एका नव्या पर्वाचा आरंभ झाला. कामगार संघशक्तीचे नवे दर्शन घडू लागले. श्री. नारायण लोखंडे यांच्या अष्टपैलू नेतृत्वाखाली या नव्या संघटनेने एक नवी दिशा दाखविली. कामगार एकजुटीच्या व संघशक्तीच्या भारतीय इतिहासाचे नवे पान उघडले गेले.

**कामगार चळवळीच्या जनकाच्या कार्याची घोडदौड :**

'बॉम्बे मिलहॅन्डस् असोसिएशन' या पहिल्या भारतीय कामगार संघटनेचे पहिले अध्यक्ष म्हणून नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार जागृती आणि कामगार कल्याणाच्या दृष्टीने अहोरात्र प्रयत्न पुढे चालू ठेवले. या संघटनाशक्तीचा त्यावेळच्या सरकारवर व गिरणीमालकावर चांगला परिणाम झाला. सरकारी व गिरणीमालक पातळीवर कामगार मागण्यांचा विचार करण्यासाठी अनेक उपाययोजना होऊ लागल्या.

१८९० मध्ये सरकारने **'फॅक्टरी कमिशन'** नियुक्त केले. कामगार संघटनेमार्फत सादर करण्यात आलेल्या मागण्यांचा सखोल विचार करुन शिफारशी करण्यास या कमिशनला सांगण्यात आले होते. या कमिशनने मुंबई व अहमदाबाद या मोठ्या शहरातील कामगार प्रश्नांचा विचार करण्यासाठी श्री. लोखंडे यांना सहकारी सदस्य म्हणून पाचारण करण्यात आले होते. या सन्मानपूर्वक निमंत्रणामुळे श्री. लोखंडे यांचे कामगार चळवळीतील श्रेष्ठ स्थान आणि त्यांचा अधिकार यावर एक प्रकारे शिक्कामोर्तब झाले. कमिशनने सरकारला सादर केलेल्या अहवालात श्री. लोखंडे यांच्या कार्याचा खास उल्लेख केला आहे.

१८९१ मध्ये कामगार हिताच्या दृष्टीने जो **'फॅक्टरी ॲक्ट'** सरकारने मंजूर केला त्यामध्ये लोखंडे यांनी सादर केलेल्या कामगारांच्या व कामगार संघटनेच्या तक्रारींची विशेष नोंद घेण्यात आली आहे. यावरून लोखंडे यांचे कामगार क्षेत्रातील कार्य किती मान्यता पावले होते याची कल्पना येऊ शकते. याच सालात म्हणजे १८९१ मध्ये ब्रिटिश सरकारचे **'शाही कमिशन'** स्थापन करण्यात आले. या कमिशनसमोर लोखंडे यांनी भारतातील मजुरांची दयनीय अवस्था प्रभावीपणे मांडली. कमिशनला त्यांच्या सूचनांचा गंभीरपणे विचार करावा लागला आणि त्यानुसार काही निर्णय घ्यावे लागले.

**'दीनबंधू'ची कामगिरी :**

म. जोतीराव फुले यांचे एक प्रमुख सत्यशोधक सहकारी आणि थोर विचारवंत श्री. कृष्णराव भालेकर यांनी त्यांचे बंधू रामचंद्रराव भालेकर, मुंबईतील पुरोगामी विचाराचे एक गृहस्थ श्री. मुक्ताजी आप्पाजी कांबळे व इतर कार्यकर्त्यांच्या सहकार्याने जानेवारी, १८७७ मध्ये 'दीनबंधू' हे पत्र शिळा प्रेसवर चालू केले. दीनबंधूच्या जागृतीसाठी, सत्यशोधक समाजकार्याच्या प्रसारार्थ आणि कल्याणासाठी या पत्राचे प्रयोजन होते. श्री. भालेकर आणि म. जोतीराव फुले यांच्यामध्ये या विषयावर छापखान्याच्या बाबतीत काही मतभेद होते असे काही घटनांवरुन स्पष्ट होते. तथापि, या तपशिलात येथे जाण्याची आवश्यकता नाही. एवढे मात्र खरे की, अनेक अडचणी व आर्थिक संकटे दूर करून हे पत्र भालेकरांनी चालविले. त्यामध्ये भालेकरांना घर, जमीन व दागदागिने विकावे लागले. तरीसुद्धा अडचणी येतच राहिल्या.

दि. ९ मे, १८८० रोजी श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'दीनबंधू' स्वत: चालविण्यास घेतला. श्री. लोखंडे यांनी संपादक या नात्याने लिहिले 'फुकटदेखील पत्रे वाचण्याची गोडी व ईर्षा नाही...बाहेरगावचे राहणारे नामांकित गृहस्थास टपालहशील भरुन जात असत. त्याच्याकडून पैसे येण्याची मारामार. तेव्हा अर्थातच रा. रा. रामचंद्रराव व कृष्णराव पांडुरंग भालेकर यांस हातपाय गाळणे भाग पडले. या उभय बंधूंनी आपल्या मानवीपणाचे कर्तव्यकर्म या सव्वातीन वर्षात उत्तम प्रकारे बजाविले, त्याबद्दल त्यांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच. दीनबंधू बंद होऊ नये म्हणून मुंबईतील बरेच मंडळींच्या मनात येऊन त्यांनी हे पत्र पुण्याहून मुंबईस येऊन सुरु ठेविले आहे व ह्यापुढे ते सदोदित चालावे अशी व्यवस्था आमचे मुंबईतील व बाहेरगावचे ब्राह्मणाखेरीज करुन इतर जातीतील सुज्ञ व विद्वान लोकांकडून होईल अशी पूर्ण आशा आहे.' (शेतकऱ्यांचा 'कैवारी' दि. १६-११-१८९३ दीनबंधू मधील उतारा)

हे अवतरण देण्याचा हेतू हा की, हे सत्यशोधकी पत्र चालविण्यासाठी भालेकर बंधूंना कोणते दिव्य करावे लागले व किती त्याग करावा लागला याची कल्पना करता येते. तसेच दीनांच्या सेवेसाठी 'दीनबंधू' ने कशी काटेरी वाटचाल केली याचीही कल्पना येते.

श्री. लोखंडे यांनी 'दीनबंधू' चालविण्यास घेतला. परंतु पूर्वीच्याच अडचणी त्यांच्यापुढे आ वासून उभ्या राहिल्या. डॉ. संतूजी रामजी लाड या सधन व उदार

अंत:करणाच्या सत्यशोधकाने 'दीनबंधू' चालविण्यास आर्थिक मदत तर केलीच, शिवाय श्री. लोखंडे यांचा प्रपंचही चालविला. डॉ. लाड यांनी आपली स्वकष्टार्जित सर्व संपत्ती यासाठी खर्ची घातली.

श्री. लोखंडे हे जसे समर्थ कामगार नेते होते तसेच ते एक अष्टपैलू बुद्धिमान, कल्पक पत्रकार म्हणून मान्यता पावले होते. त्यांनी सत्यशोधक समाजाची शिकवण 'दीनबंधू' मधून समर्थपणे दिली. स्त्री-पुरुष शूद्र, शेतकरी, कामगार यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य अतिशय प्रभावीपणे केले. मानवतेचा, मानवी समतेचा पुरस्कार व प्रसार सातत्याने चालू ठेवला.

१८८४ मध्ये जुन्नर (पुणे) येथे पुरोहितांनी दांडगावा चालू केला. मोठी दक्षिणा जबरदस्तीने घेणे व गोरगरीब शेतकऱ्यांकडून कर जबरीने वसूल करण्याचा धूमधडाका लावला. म. जोतीराव फुले हे तेथे धावून गेले. त्यांच्या नेतृत्वाखाली या अन्यायाविरुद्ध शेतकऱ्यांचा मोठा उठाव झाला. श्री. लोखंडे मुंबईहून धावून गेले. 'दीनबंधू' ची सर्व शक्ती कामगारांच्या कल्याणासाठी, त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय निवारणासाठी आणि त्यांच्या संरक्षणासाठी खर्ची घातली. औद्योगिक क्षेत्रातील सर्व स्त्री-पुरुष कामगारांच्या संरक्षणासाठी आणि कल्याणासाठी 'दीनबंधू' शेवटपर्यंत झगडला. कामगारांसाठी घरे, त्यांचे आरोग्य, वेतन, रजा, नुकसानभरपाई इत्यादी सर्व प्रश्न पोटतिडकीने धसास लावले.

एक सत्यशोधक प्रमुख म्हणून त्यांनी सामाजिक व कामगार क्षेत्रात ज्या जिद्दीने चौफेर असे कार्य केले होते ते सनातन्यांना आवडणे शक्य नव्हते. त्यांनी त्यांच्याविरुद्ध खूप जळफळाट केला. बाटगे, नास्तिक, धर्मद्रोही व सरकारचे बगलबच्चे असे अहेर त्यांना मिळू लागले. तथापि, श्री. लोखंडे यांनी तेवढ्याच दमदारपणे त्यावेळी उत्तर दिले. तशाच खरमरीत भाषेत उत्तर देण्यास त्यांनी जराही कुचराई केली नाही.

**तत्कालीन इतर नेत्यांचे कार्य :**

गिरणी कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी रावबहादूर लोखंडे यांना इतरही कामगार नेत्यांचे सहकार्य त्यावेळी लाभले. त्यामध्ये रा. रा. विश्राम लक्ष्मण कोरगांवकर आणि कै. रा. रा. कृष्णराव अर्जुनजी केळुसकर हे प्रमुख

कामगार कार्यकर्ते होते. यांनीही कामगारांच्या कल्याणासाठी आणि संघटनात्मक उभारणीसाठी खूपच प्रयत्न केल्याचे दिसून येते. दीनबंधूच्या ८ व १५ जानेवारी, १८९३ च्या अंकात या उभयतांचे विचार देण्यात आले आहेत, ते पुढीलप्रमाणे --

कै. रा. रा. विश्राम लक्ष्मण कोरगांवकर हे एक आघाडीवरील कामगारांचे नेते होते. असे अनेक संदर्भावरुन कळून येते. ते मजूर सभेचे सेक्रेटरी होते. दीनबंधूच्या ८ जानेवारी, १८९३ च्या अंकातील अग्रलेखात श्री. कोरगावकर यांचे विचार देण्यात आले आहेत. ते म्हणतात, गिरणीतील कामगार लोकांनी असे समजू नये की, त्यांच्या अडचणी व फायद्याविषयी कोणीही दाद घेणार नाही. म्हण आहे की, 'हिंमत मर्दा और मदत खुदा', जर तुम्ही हिम्मत ठेवून आपल्या दुःखाच्या व अडीअडचणीच्या फिर्यादी आपल्या उपरी अधिकाऱ्याकडे करुन नेटाने वागाल तर तुम्हास यश आल्याशिवाय राहणार नाही. यावरुन श्री. कोरगावकर यांचे नेतृत्व किती बोलके व कार्यक्षम होते हे स्पष्ट होते. त्यानी दर्शविलेल्या कामगारांच्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे --

(१) छोट्या जागेत हजार दोन हजार कामगारांना काम करावे लागे. खिडक्या उघडण्यास परवानगी नसे. त्यामुळे हवा दूषित होत असे. अपुरे संडास, पिण्याच्या पाण्याची गैरसोय अशी परिस्थिती होती.

(२) संरक्षण देणाऱ्या कायद्यांची पायमल्ली गिरणीमालकाकडून होत असे.

(३) कामगार आणि मालक यांची भेट होऊ नये अशी व्यवस्थापक योजना करत.

रा. रा. कृष्णराव अर्जुनजी केळुसकर हे एक प्रमुख कामगार कार्यकर्ते होते. गिरण्यातील कामगार अक्षरशून्य असल्याने कोणाकडे दाद मागावी हे त्यांना कळत नसे. श्री. केळुसकर यांनी म्हटले आहे, 'इंग्रज सरकारच्या राज्यात कोणासही आपली दुःखे व आपल्या अडचणी दूर व्हाव्यात म्हणून इच्छा असेल त्यांनी कायदेशीर रीतीने अर्ज केले पाहिजेत नाहीतर त्याकडे कोणीही पाहायचे नाही. अशा प्रकारची कायदेशीर चळवळ आम्ही इंग्रजांच्या सहवासाने करावयास शिकलो आहोत.' यावरुन राजवटीच्या कायद्याच्या राज्याची प्रचिती येते.

१) विलायतेत ज्याप्रमाणे ट्रेड युनियन्स आहेत त्याप्रमाणे हिंदुस्थानात अशा युनियन्स स्थापन करुन त्या देशात ज्याप्रमाणे मासिक वर्गणी जमा करुन संघटनेचे कार्य चालविले जाते, त्याप्रमाणे होण्याची गरज स्पष्ट केली आहे.

२) मुकादम व मालक लोक धाकदडपशाही करुन व प्रसंगी मारहाण करुन कामगारांना कामावर ओढून नेत असत. त्यांना जनावराप्रमाणे वागविले जाई.

३) लवाद (तंटा मिटण्यासाठी) नेमण्याचे नाव नसे.

४) संघटनेचे सभासद व्हावे. दरसाल अर्धा आणा तरी वर्गणी द्यावी व सुसंघटित होऊन सर्वांनी आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घ्यावी असा उपदेश.

५) कामगार कल्याणासाठी स्वतंत्र फंड उभा करण्यासाठी आवाहन. दरमहा किमान अर्धा किंवा एक आणा द्यावा. काही काळाने साठवलेली पुंजी अडी-अडचणीच्या वेळी उपयोगी ठरेल. ही मौलिक शिकवण तसेच यामुळे संघशक्ती वाढेल व गाऱ्हाण्यांची दाद लागेल (दीनबंधू १५-१-१८९३).

**त्यागी लोकनेत्याचा आदर्श :**

लोखंडे यांनी १९ व्या शतकात गोरगरीब गिरणीमजूर, देशातील शेतकरीवर्ग आणि इतर दीनदलित यांची अतिशय त्यागी वृत्तीने जी सेवा केली तो खरोखरच एक आदर्श मानावा लागेल. त्या काळाचा विचार करता चांगले शिक्षण मिळालेल्या माणसाने चांगल्या नोकरीला राम राम ठोकून, आपल्या संसारावर तुळशीपत्र ठेऊन, गोरगरीब मजुरांचा कैवार घेऊन अहोरात्र झगडत राहावे ही घटना त्यावेळी आणि आजही अतिशय दुर्मीळ अशीच होय. उदाहरण म्हणून ५ फेब्रुवारी, १८९३ च्या अंकातील अग्रलेखात लोखंडे यांनी सांगितलेली आठवण लक्षात घेण्यासारखी आहे. ते म्हणतात, ‘एके दिवशी या हद्दीतील पोलीस सुप्रिटेंडेंट मि. नोलन मला म्हणाले की, गिरणीतील मजूर लोकांचे संपास तुम्हीच कारण आहात असे कित्येक लोक बोलत आहेत व प्रत्येक मजुराकडून ४ आणे दरमहा तुम्हांस मिळतात. जर असा प्रकार असता तर आजला ६०,००० लोक गिरण्यात काम करीत आहेत तेव्हा प्रत्येकी चार आणे म्हणजे दरमहा १५,००० रुपये होतात. एवढे मोठे उत्पन्न असते तर हल्लीच्या स्थितीत मी नसतो.’ यावरुन श्री. लोखंडे यांची त्यागी कामगार सेवा लक्षात येते. तसेच,

दीनबंधू, १२ फेब्रुवारी, १८९३ च्या अंकात (अग्रलेखात) त्यांनी कामगार कल्याणाच्या काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या आहेत. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे--

(१) 'जे काही करणे असेल ते कायदेशीर रीतीने करा', असा लोखंडे यांचा कामगारांना उपदेश.

(२) विलायतेप्रमाणे गिरणीमजुरांना रोज फक्त ८ तास काम असावे. रोज १३ ते १४ तास काम करणे हे धोक्याचे आहे.

(३) एजंटांचे कमिशन कमी करावे व मजुरांच्या माना मुरगळण्यास पाहतील तर त्यास (गिरणीमालकास) खास तोंडघशी पडावे लागेल.

**अग्रलेख :**

'येथील स्मॉल कॉज कोर्ट, गिरण्यातील मजूर लोकांचे दावे तपासण्यात निरुपयोगी आहे.' लोखंडे म्हणतात, 'मुंबई शहराच्या स्मॉल कॉज कोर्टात जर कोणास न्याय मिळत असेल तर तो मारवाडी व लुच्चे लोकांस मिळतो. प्रामाणिकपणे चालणाऱ्या लोकांस मुळीच न्याय मिळत नाही. गिरण्यातील मजूर लोकांच्या दाव्यांचा न्याय करण्यास हे कोर्ट तर काहीच कामाचे नाही. कारण न्याय मिळविण्याची ताकत मजुरात नसते. या उलट मालक समर्थ असतात. (दीनबंधू ३१ मे, १८९६) रा. ब. लोखंडे व त्यांचे सहकारी यांच्या चौफेर माऱ्याची विलायत सरकारला दखल घ्यावी लागेल. परिणाम म्हणून विलायत सरकारने सर ह्यार्माल्टन फ्रियर स्मिथ यांच्या अध्यक्षतेखाली 'इंडियन फॅक्टरी लेबर कमिटी' स्थापन केली होती. कमिटीने ज्या महत्त्वाच्या सूचना केल्या त्या पुढीलप्रमाणे --

(१) गिरण्यातून काम करणाऱ्या लोकांची घरे व आजूबाजूच्या जागेची सुधारणा करावी.

(२) सर्व हिंदुस्थानभर सारखाच फॅक्टरी ॲक्ट लागू करावा.

(३) तपासणीसाठी पुरेसे इन्स्पेक्टर असावेत.

(४) डॉक्टर्सच्या नेमणुका करून औषधोपचारासाठी सोय करावी.

(५) अर्धा दिवस काम करणाऱ्या मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी कारखानदारांच्या खर्चाने व जागेत व्यवस्था होण्याबद्दलचा विचार व्हावा.

(६) स्त्रियांकडून रात्रपाळीचे काम करून घेऊ नये.

(७) चांगली हवा मिळेल अशी तरतूद करावी.

(८) दर २५ माणसांस स्वतंत्र संडास असावा. मुतारीची स्वतंत्र सोय असावी.

(९) मोठ्या माणसास केव्हाही १२ तासांपेक्षा अधिक काम पडू नये. यापैकी दुपारी अर्धा तास सुट्टी असावी.

यामुळे कामकरी लोकांच्या अल्पशा का असेना सुखसोयीकडे सरकारची नजर गेली हे चांगलेच झाले. (दीनबंधू जून, १९०७)

**सरकारी मानसन्मान :**

लोखंडे यांनी औद्योगिक कामगारांच्या सर्वांगीण कल्याणाच्या दृष्टीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पथदर्शक व पायाभूत कार्य केले, त्याचा मुंबईत व देशात बोलबाला झाला. राजकीयदृष्ट्या पारतंत्र्याचा व सामाजिकदृष्ट्या गुलामगिरीचा काल असताना, शंभर वर्षांपूर्वी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणे त्यांची संघटना बांधणे; धनिक गिरणी मालकांच्या आणि ब्रिटिश सरकारच्या रोषाची पर्वा न करता निधड्या छातीने मागण्यांचा पाठपुरावा करणे, हे फार धाडसाचे, सचोटीचे आणि जोखमीचे कार्य होते. स्वामिद्रोह आणि देशद्रोह ठरुन अनेक संकटे व हालपेष्टांना सामोरे जाण्याचा हा प्रकार होता. तथापि, कुणाच्या रागालोभाची किंवा स्वत:च्या भविष्याची पर्वा न करता लोखंडे यांनी; ज्या निष्ठेने, तडफेने व कुशलतेने कामगार क्षेत्रात मौलिक व पायाभूत कार्य केले, ते कामगार चळवळीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे झाले आहे. तसेच 'दीनबंधू' चे संपादक म्हणून त्यांनी स्त्री-पुरुष, शूद्र-अतिशूद्र, शेतकरी, कामकरी यांच्या जागृतीसाठी आणि उद्धारासाठी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत जे अविरत प्रयत्न केले, त्याचेही मोल फार आहे. या सर्वंकष मौलिक कार्याची त्यावेळेच्या ब्रिटिश सरकारने नोंद घेऊन १८९० मध्ये त्यांना 'जस्टीस ऑफ पीस' (जे. पी.) ही पदवी बहाल केली. तसेच १८९५ मध्ये त्यांना रावबहादूर हा बहुमानाचा किताब सरकारने बहाल केला. असे करण्याने श्री. लोखंडे यांच्या मौलिक कार्यावर सरकारी शिक्कामोर्तब करण्यात आले.

विशेषत: १८९३ साली मुंबईमध्ये जातिजमातीमध्ये भयंकर तेढ व एकमेकांबद्दल चीड निर्माण होऊन संपूर्ण शहराची शांतता भंग पावली. अशा बिकट प्रसंगी शांतता निर्माण करण्यासाठी लोखंडे यांनी भगीरथ प्रयत्न केले. मोठ्या धैर्याने जाहीर सभा घेऊन उभय पक्षांची क्षुब्ध झालेली मने शांत करण्यात यश मिळविले. हे कार्य म्हणजे अतिशय जोखमीचे, धैर्याचे, कल्पकतेचे आणि कौशल्यसंपन्नतेचे एक दुर्मीळ उदाहरण होय. या अवघड कार्यात त्यांचे मित्र कै. विठ्ठलराव कृष्णाजी वडेकर आणि इतर काही सहकाऱ्यांनी त्यांना चांगल्या प्रकारे साथ दिली. विशेषत: त्यावेळच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना त्यांच्या या मौलिक कार्याचे महत्त्व विशेषच वाटणे स्वाभाविक होते.

लोखंडे यांच्या सन्मानार्थ जो सत्कार-समारंभ झाला त्याचा वृत्तांत 'दीनबंधू' च्या दि. २६ एप्रिल, १८९६ च्या अंकात विस्ताराने प्रसिद्ध झाला आहे. त्याचबरोबर त्यांना दिलेल्या मानपत्राचे मराठी भाषांतरही प्रसिद्ध करण्यात आले होते. तेही येथे देण्यात येत आहे. विशेषत: सत्कारास उत्तर म्हणून केलेल्या भाषणावरून लोखंडे यांच्या ठिकाणी असलेल्या विशेष गुणांचे आणि त्यांच्या एकूण जीवनकार्याचे चांगल्या प्रकारे दर्शन घडते.

**सन्मान समारंभाची हकीकत :**

श्री. नारायण मेघाजी लोखंडे (जे. पी.) यांस हिंदुस्थान सरकारकडून रावबहादूर हा किताब मिळाल्यामुळे त्यांचा मित्र व चाहणाऱ्या मराठे आदिकरून मंडळीकडून जाहीर रीतीने सन्मान व्हावा म्हणून प्रथमत: ता. १९ जानेवारी रोजी डोंगरी येथील सरकारी शाळेत निवडक गृहस्थांची सभा झाली. या प्रसंगी अध्यक्षस्थानी रावबहादूर लक्ष्मणसिंग हे होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी मि. आर. एच. व्हिन्सेन्ट हे मुंबईचे पोलीस कमिशनर होते. परंतु काम पार पाडण्यास मदतनीस म्हणून दिवाण बहादूर मणीभाई जसभाई हे होते. ते म्हणाले, 'रा. ब. लोखंडे यांची कळकळ, त्यांची लोकसेवा करण्याची प्रबळ इच्छा व त्यांचा साधा स्वभाव ज्यास माहीत आहे, त्यास त्यांच्याविषयी अभिमान वाटतो व ते आजच्या जमलेल्या मंडळींच्या हजेरीवरून पूर्ण व्यक्त होत आहे. रा. ब. लोखंडे हे स्वकर्तृत्वाने हल्लीच्या स्थितीस पोहोचले आहेत. जे कोणी मन:पूर्वक देशसेवा करतील त्यांचा सन्मान करण्यास आमचे मायाळू सरकार कधीही प श्चात पडत नाही. त्याचा प्रत्यक्ष पुरावा आहे'

रा. रा. विठ्ठलराव कृष्णाजी वडेकर यांनी इंग्रजीत छापलेले मानपत्र रा. ब. लोखंडे याजपुढे वाचले. त्याचे भाषांतर पुढे दिल्याप्रमाणे आहे.

**लोखंडे यांना दिलेले मानपत्र (मराठी भाषांतर) :**

'रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे (जे. पी.) मिल, हॅन्डस् असोसिएशन मुंबई, सत्यशोधक समाज व भायखळा स्पेशियल क्लब या तीन संस्थांचे अध्यक्ष व दीनबंधू पत्राचे चालक व मालक यांस,

महाशय,

आम्ही आपले मित्र व चाहते मंडळीत गणले जाण्यास भूषण मानणारे मराठे आणि दुसरे प्रमुख गृहस्थ, आजच्या आनंददायी प्रसंगी जमून सरकारने नुकतीच आपणास 'रावबहादूर' ही बहुमानाची पदवी दिली आहे, त्यामुळे आम्हास जो आनंद व उत्साह झाला आहे, त्याचे प्रेमपुरस्सर अभिनंदन करण्याविषयी आपली परवानगी घेतो.

आपणास मिळालेल्या पदवीदानाचा लाभ अभिनंदनावाचून दडविणे आम्हास योग्य वाटत नाही. कारण येणेकरुन गुणज्ञ आणि दयाळू सरकारने आपल्या सद्‌गुणाचा गौरव करून केवळ आपल्यासच बक्षीस दिले असे नाही, तर ज्या जातीत आपला उदय झाला व जिचे आपण प्रतिनिधी म्हणविता त्या जातीचाही मोठा गौरव केला आहे, असे आम्ही समजतो.

पुरातन राजनिष्ठ आणि कसोटीस उतरलेल्या सरकारी नोकरांनी किंवा धनाढ्य लोकांत वजन असणाऱ्या पुढारी लोकांनी सरकारची एखादी कामगिरी प्रामाणिकपणे आणि हुशारीने बजावली असता सरकार त्यास बक्षीस दिल्यावाचून क्वचित राहते. ही गोष्ट जरी खरी असली तरी सरकार दरबारात कमी वापरलेल्या आणि आपले काम निमूटपणे करीत असलेल्या कामकरी लोकांपैकी एखाद्याने सरकारची कामगिरी एकनिष्ठेने केली असता त्यासही पारितोषिक देण्याची सरकारची तीव्र व न्याय दृष्टी कधी चुकत नाही. असे अनुभवास आल्याचा एक प्रसंग आहे. ह्यावरुन मागासलेल्या वर्गातील मनुष्याला उच्च पदवीस चढण्यास हल्लीचे उदार आणि राजकर्ते फारच उत्कंठित आहेत हे दाखविणारे एक ढळढळीत उदाहरण आहे.

सरकारने सदरहू मान देण्याचे कामी जी आपली निवड केली ती योग्य केली, हे आपला वर्तनक्रम आरंभापासून ज्यास माहीत आहे त्या सर्वांना सहज कळणारे आहे. आपण इ. स. १८७० ह्या वर्षी पोस्ट खात्यात नोकर होता तेव्हापासून अशिक्षित लोकसमूहाची धर्मबंधने सामाजिक गोष्टींच्या बाबतीत सुधारणा होण्याविषयी कळकळीने लेख लिहिण्याची जी सुरुवात केली तो आपला क्रम आपल्या मित्राच्या आणि सहकाऱ्यांच्या मदतीने अनेक अडचणीस न जुमानता आपण आजवर तसाच चालविला आहे व जेणेकरुन मागासलेल्या लोकांच्या उणिवा व अडचणी सरकारच्या लक्षात येऊन त्यांची सुधारणा होत चालली आहे. सत्यशोधक समाजाच्या संबंधाने

आपण चालविलेल्या चळवळीपासून धर्मसंबंधाने धूर्त लोकांनी नाडलेल्या अशिक्षित लोकसमूहाचे कल्याण होत आहे व बहुजन समाजाला शिक्षण देण्याविषयी चळवळ चालविणारे लोक ही गोष्ट जाणून आहेत. दीनबंधू पत्राचे कर्ते आणि मालक या नात्यानेही केवळ कामकरी लोकांच्या सुधारणेकरिता चालू असलेले आपले प्रयत्न तर सर्वश्रुत आहेत.

आपण गिरण्यातील कामकरी लोकामध्ये काही दिवस घालविले असल्यामुळे त्या लोकांची सर्व सुखदु:खे आपणास ज्ञात झाल्यामुळे त्या लोकांचे बरेच कल्याण झाले आहे. गिरण्यातील कामकरी लोकांना ज्या अडचणी व दु:खे भोगावी लागतात ती यथावकाश निवारण होण्यासाठी सन १८८४ साली फॅक्टरी कमिशन बसले होते त्याचे आपण उत्पादकच आहात. जवळजवळ पंचवीस वर्षे त्यांच्या सुधारण्याविषयी आपले अव्याहत प्रयत्न सुरु आहेत. सदरहू कमिशनात आपली साक्ष झाली. त्यावेळी आपण स्पष्टपणे व धैर्याने त्यांच्या गरजा कमिशनपुढे मांडल्या आणि जरी त्याप्रसंगी त्याचा हवा तसा उपयोग झाला नाही, तरी त्यामुळे सन १८९० सालच्या कमिशनमधील एका सभासदाच्या जागी आपली योजना झाली, येणेकरुन आपले त्यावेळचे विचार सरकारास पसंत होते हे उघड झाले. ही आपली नेमणूक झालेली पाहून गिरण्यातील कामकरी लोकांच्या सभेला व गिरण्यांच्या मालकाच्या सभेलाही फार आनंद झाला व त्या उभयतासही आपली निवडणूक पसंत पडून कमिटीच्या अध्यक्षानी तर आपण बजावलेल्या कामगिरीबद्दल फार वाहवा केली. आपण भारदस्तपणे जे प्रतिपादन केले ते गिरण्यांचे मालक व कामकरी या दोघांच्याही हिताचे होते आणि त्यापैकी थोडेसे तरी हक्क त्यांना मिळाले, त्याबद्दल आपणाला खरोखर धन्यता वाटावी.

सन १८९३ साली झालेल्या दंग्याचे प्रसंगी शांतता राखण्याचे कामी आपण केलेले परिश्रम तर आमच्या डोळ्यासमोर आहेत. दंग्याच्या योगाने भीतिग्रस्त व अस्वस्थ झालेल्या लोकांच्या मनात पुन्हा स्वास्थ्य आणि विश्वास उत्पन्न करण्याचे कार्य आपण आपल्या काही मित्रांच्या साहाय्याने भगीरथ प्रयत्न करिताना सर्वत्र दिसत होता, शुक्रवारच्या भीतीने तर या शहरातील कापड धंदा बसूनच गेला होता. म्हणून एक जाहीर मेळा भरवून उभयपक्षांनी क्षुब्ध झालेली मने शांत करावी ही कल्पना पहिल्याने आपण काढून त्याप्रमाणे आपण व आपले सन्मान्य सहकारी व मित्र रा. रा. विठ्ठलराव कृष्णाजी वडेकर व दुसरे सद्‌गृहस्थ यांनी ते शेवटास नेले.

ही जी आपण अमूल्य कामगिरी बजावली तिचे आपणास व आपल्या सहकाऱ्यास जेव्हा जेव्हा स्मरण होईल तेव्हा तेव्हा आनंद झाल्याशिवाय राहणार नाही.

सार्वजनिक हिताची आपण केलेली ही कामे आणि आपल्या अंगी असलेले सद्‌गुण म्हणजे शांतता, प्रसंगावधान, दृढनिश्चय, लोकास योग्य सल्लामसलत देण्याविषयीची उत्सुकता वगैरे. त्यांच्या योगाने आपणास चाहणारे व आपल्या मैत्रीची इच्छा करणारे लोक फार झाले आहेत. आपली प्रतिष्ठा वाढविणारा जो किताब हल्ली सरकारने दिला आहे त्यामुळे त्या सर्वांना परमानंद झाला आहे. आणि आपली उत्साहबुद्धी व आयुरारोग्य देशबांधवांच्या हितार्थ लावण्याकरिता आपल्यास ईश्वराने उदंड आयुष्य द्यावे, अशी आम्हा सर्वांची त्या जगदीशापाशी सदैव प्रार्थना आहे.

**सत्कारला उत्तर म्हणून रावबहादूर लोखंडे यांनी केलेले भाषण :**

'अध्यक्ष व गृहस्थहो,

ममता व संतोष प्रकट करण्यासारखे जे आपण मानपत्र दिले त्याबद्दल मी आपले मनापासून फार उपकार मानतो. आपण माझे संबंधाने संतोषवृत्तीने जे काही बोललात त्यास अनुसरून विशेष बोलावे पण माझ्यात ज्या उणिवा आहेत त्या मी जाणतो म्हणून न बोलावे असे मला वाटते. माझे संबंधाने आपण जे मत प्रदर्शित केले तसा कोणताही गुण माझ्यात नाही. परंतु हे सर्व आपल्या सद्‌हेतूचे व मित्रत्वाचे लक्षण होय. तथापि, मी एका गोष्टीत सर्वस्वी आपल्या मतास अनुसरून सांगतो की, सरकारने संतुष्ट होऊन दयार्द्र बुद्धीने जो मला मान दिला आहे. त्याबद्दल मी जर स्वत: संतोष प्रदर्शित न केला तर माझेवर तुसडेपणाचा आरोप येणार आहे. परंतु ज्या सरकारच्या मनातून मराठे जातीची योग्यता व बढती व्हावी असे आहे त्या लोकांपैकी एका गरीब मनुष्याचा सन्मान करण्याविषयीची जी निवडणूक झाली. त्यामुळे जो आनंद झाला आहे तो शतपटीने वाढला आहे, हे मी जाणून आहे. ज्या जातीपैकी मी आहे त्या वर्गाकरिता माझेकडून जी अल्पशी सेवा घडली असेल ती एक प्रत्येक शहरवासी सद्‌गृहस्थाचे मग तो कोणत्या का धंद्यातील असेना, त्याचे ते कर्तव्यकर्म आहे असे त्यांनी समजले पाहिजे. तथापि, आपले शब्द प्रोत्साहन देणारे असल्यामुळे गृहस्थहो, आपली खात्री असू द्या की, आपणासारख्या खऱ्या मित्रांच्या

साहाय्याने मी माझ्या नादार योग्यतेस अनुसरुन कामगार लोकांच्या बऱ्यास्तव नेहमी झटण्याचा प्रयत्न करीत जाईन. मागच्या दंग्याच्या वेळी लोकांच्या मनातील भीती घालविण्यास व शांतता ठेवण्यास आपणा सर्वांस साह्य देण्याविषयी आगत्य पडले होते व तशा अल्पशा सेवेचा जो आपण संतोषपूर्वक उल्लेख केला आहे त्या संबंधात ज्यांच्या साहाय्याने आपण हाती घेतलेले काम सौम्य रीतीने पार पडले; असे जे साह्यकारी मेहरबान पोलीस कमिशनर मि. व्हिन्सेंन्टसाहेब व त्यांचे हिम्मतदार असिस्टंट सरदार मीरअब्दूल अली खान बहादूर, मि. ब्रव्हिन आणि पोलिस फौजेतील इतर कामदार की, ज्यांचे युक्तीने, योग्यतेने आणि खऱ्या धैर्याने काम करण्यास शक्तिमान झाले, त्या गृहस्थांचे या प्रसंगी आभार न मानल्यास मी आपले कर्तव्य करण्यास चुकलो असे होणार आहे. 'एकोपा करण्याचा मेळा' ज्याचे धोरण केवळ लोकात शांतता ठेवण्याचे होते तो मेळा आपले पोलिसाचे मुख्याचे दक्षतेने पार पडून लोकात उत्तम प्रकारे शांतता करण्यात आली व अशा प्रकारचा एक उद्देशही होता. आणि त्यात प्रत्येक राजनिष्ठ गृहस्थाने ते आपले कर्तव्यच आहे असे समजले पाहिजे. आपल्या मायाळू सरकारच्या बलिष्ठ परोपकारी आणि शांत अमलांत दुर्बळ मनुष्य स्वार्थरहित आणि प्रामाणिकपणाने शांतता ठेवण्यास व करण्याचे कामी झटण्यास व देशसेवा करण्यास शक्तिमान आहे किंवा दुसऱ्या रीतीने विचार करिता ज्या सरकारच्या अमलाखाली आपण राहतो त्याची आपण राजनिष्ठपणाने सेवा करणे यासारखेही आहे. गृहस्थहो, माझेविषयी आपण प्रेमपूर्वक जे विचार प्रदर्शित केलेत व आज रोजी जो आपण माझा मोठा सन्मान केलात, त्याबद्दल मी पुन्हा एकदा आपले अंत:करणपूर्वक फार आभार मानतो.'

### मराठा हॉस्पिटलची स्थापना :

त्या कालात वारंवार प्लेग, कॉलरा इत्यादी रोगांच्या साथीने हजारो लोक मृत्युमुखी पडत. गोरगरिबांना वेळेवर उपचार घेण्याच्या सोयीसुविधा क्वचितच उपलब्ध असत. ही महत्त्वाची गरज पूर्ण करण्यासाठी मुंबईतील उदार व ध्येयवादी लोकांच्या सहकार्यातून श्री. लोखंडे यांनी मराठा हॉस्पिटलची १८९६ मध्ये स्थापना केली. या मानवतावादी कार्यात मुंबईतील काही उदार धनिक आणि सत्यशोधक कार्यकर्त्यांनी चांगली मदत केली. या हॉस्पिटलमुळे हजारो गोरगरिबांचे प्राण वाचले.

**श्री. लोखंडे यांचे साहित्य :**

उपलब्ध साहित्य (१) सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान भाग १ला (सप्टेंबर १८८६) व (२) सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान भाग २ रा (मे १८८७) यांचा समावेश होतो. प्रस्तुत लेखकाने महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयात जाऊन शोध घेतला. सत्यशोधक निबंधमाला भाग १ ला हे पुस्तक मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात दुर्मीळ साहित्य विभागात तर सत्यशोधक निबंधमाला भाग २रा हे पुस्तक मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, येथे उपलब्ध झाले. श्री. लोखंडे यांनी 'दीनबंधू'चे संपादक म्हणून प्रदीर्घ काळ लेखन केले आहे. यामध्ये त्यानी केलेले लेखन किंवा अन्य काही पुस्तके यांचा या पुस्तकात समावेश नाही. या पुस्तकाचा मर्यादित हेतू डोळ्यासमोर ठेवून श्री. लोखंडे यांच्या जीवनकार्याचा थोडक्यात परिचय दिला.

सत्यशोधक निबंधमाला भाग १ व २ या दोन पुस्तकांतील विषय व आशय थोडक्यात येथे देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

'सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान' भाग १ ही माला रा. नारायणराव मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोधक हितास्तव 'दीनबंधू' छापखान्यात छापून प्रसिद्ध केली असा मजकूर पुस्तकाच्या मुखपृष्ठावरच छापलेला आढळतो. ठिकाण मुंबई आहे. सप्टेंबर सन १८८६. किंमत ३ आणे छापण्यात आली आहे. हे पुस्तक एकूण ५९ पानांचे असून दोन पानांची प्रस्तावना लेखकाने लिहिली आहे. हिंदुस्थानातील सर्व हिंदू लोकांचे ऐक्य साधणे वाजवी आहे. तथापि, तशी स्थिती नाही. त्यामुळे हिंदू लोक विशेषत: शेतकरी वगैरे लोक हीन-दीन अवस्थेमध्ये आपले जीवन जगत आहेत. ज्यांचे हाती धर्माची सूत्रे आहेत ते मनास वाटेल तसे वागत आहेत' परंतु हल्लीच्या ज्ञानसूर्याचे प्रकाशात त्यांची ती धर्माविरुद्ध वर्तने इतर लोकांस का सहन होतील ? असा सवाल करण्यात आला आहे. उच्चनीचपणा सर्व गुणकर्मावरुन आहे आणि तसे गुण संपादन करण्याचे जर ब्राह्मण लोक श्रम घेत नाहीत तर त्यास इतर जातीने श्रेष्ठ का मानावे ? असा मूलभूत प्रश्न उपस्थित करून त्यावर तपशीलवार मार्मिकपणे चर्चा करण्यात आली आहे.

पहिला विषय म्हणून आपले धर्मगुरु (ब्राह्मण) आमच्या हिंदूशास्त्राप्रमाणे वर्तन करतात काय ? तसे नसल्यास आपण व धर्मगुरु दोषास पात्र आहोत किंवा

नाही असा निवडला आहे. शम, दम, तप, शुद्धी, शांती, सरळता, ज्ञान, विज्ञान आणि आस्तिक्य बुद्धी असे स्वाभाविक गुण ज्या पुरुषामध्ये आहेत त्यास ब्राह्मण म्हणावे. अशा आशयाचा गीतेचा श्लोक देण्यात आला आहे. अशा गुणी व्यक्तीला गुरु किंवा आचार्य मानावे. लेखकाने म्हटले आहे, 'या देशात सर्वत्र असे दिसून येते की, सर्व धर्मकर्म वडलांच्या बढाईवर चालत आहे. शिपायाचा मुलगा म्हणून शिपाई, सावकाराचा मुलगा म्हणून सावकार, शूद्राचा मुलगा म्हणून शूद्र त्याचप्रमाणे ब्राह्मणाचा मुलगा म्हणून ब्राह्मण' ही स्थिती त्याज्य आहे. गीतेतील प्रसिद्ध श्लोक --

**'चातुर्वर्ण्यं मयासृष्टं गुणकर्म विभागशः'**

यांचा अर्थ (कृष्ण म्हणतो अर्जुना) ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे वर्ण म्हणजे पदव्या आहेत. त्यांची योजना गुणकर्मावर केलेली आहे. पुढे मनूचा संदर्भ देऊन स्मरले आहे.

"शूद्रो ब्राह्मणता मेति ब्राह्मणक्चेवशूद्रवाम" (श्लोक ६५, अध्या. १०) अर्थ : शूद्र हा ब्रह्मकर्माने ब्राह्मणत्वाला पावतो आणि ब्राह्मण हा शूद्र कर्माने शूद्रत्वाला पावतो.

पुढे हिंदुस्थानच्या प्राचीन कालखंडातील देशाची व समाजाची माहिती देऊन उत्तरोत्तर धार्मिक, सामाजिक व इतरदृष्ट्या ज्या घडामोडी व अनर्थ घडले त्यांची सोदाहरण माहिती दिली आहे. यज्ञ, वेद व वेदाभ्यास राजसत्ता आणि घडलेली स्थित्यंतरे, जातीसंबंधी वादविवाद, सत्पात्री दान म्हणजे काय ? कुपात्री दान, इत्यादी विषयावर साधारण चर्चा सोप्या भाषेत करुन प्रत्येकाने न्यायाने वागून योग्य तोच खर्च करुन येऊ घातलेल्या आपत्ती टाळाव्यात, असा सत्यशोधक समाजाच्या तत्त्वाप्रमाणे उपदेश करण्यात आला आहे.

दुसऱ्या विषयात (१) आमच्या लोकांच्या मनात धर्मवेड भरविणारे पुढारी कोण ? आणि (२) ते दूर होण्यास सुलभ उपाय कोणते ? 'प्राचीन काळापासून शास्त्राचे सुकाणू आमच्या भटजींच्या हाती असल्यामुळे त्याला त्या शास्त्रास व लोकांस ह्या भवसागरात हवे तसे वळविण्यास आजपर्यंत हरकत पडत नाही. या सदरील धर्मगुरू म्हणविणारांनी असा काही व्यूह रचिला आहेत की, तेणेकरुन सर्व लोक मोहित होऊन मेंढराप्रमाणे एकामागून एक अचूक खड्ड्यात पडतात.' अशा या

भोंदू शास्त्रांनी सर्व हिंदुस्थान देश नपुंसक करुन सोडला. शौर्याने व धैर्याने आम्हांकडे पाठ केली.' असे सांगून पूर्वजांच्या पराक्रमाचे उदाहरण देऊन आपला झेंडा सर्व पृथ्वीवर कसा मिरविला, हिंदुस्थानास सुवर्णभूमी कसे बनविले, सर्व सुधारणा कशा घडवून आणल्या आणि त्यांचे जगाने कसे अनुकरण केले, हे स्पष्ट करण्यात आले आहे. दुर्दैवाने महाभिक्षुकांनी मूळ ग्रंथात आपल्या श्रेष्ठत्वासाठी व स्वार्थासाठी फेरफार करुन ज्या अनिष्ट पद्धती व रुढी अनेक बनावट ग्रंथात घुसडून दिल्या व समाज सर्वार्थाने दुबळा बनविला, त्या पुरोहित समाजाने निदान यापुढे तरी सद्‌वर्तन करावे. तसेच आपल्या देशातील प्रत्येकाने सत्याची कास धरुन कालमानानुरुप आपले योग्य असे वर्तन ठेवावे, अशी शिकवण देण्यात आली आहे.

सत्यशोधक निबंधमालेच्या दुसऱ्या भागात 'आमच्या लोकांच्या मनात धर्मवेड पसरविण्यास पुढारी कोण ? आणि ते दूर होण्यास उपाय कोणते ? या विषयावर पुन्हा थोडक्यात चर्चा करण्यात आली आहे. पुरोहित, ब्राह्मण इतर सर्व समाजाचे धनी व पालककर्ते समजून आशीर्वाद देतात व त्याच्या बदली दान किंवा दक्षिणा घेतात. तथापि, असे करताना ते सत्यास व न्यायास धरुन आचरण करतात काय ? तसेच त्यांचे वागणे श्रेयस्कर आहे काय, याचे निबंधकाराने विवेचन केले आहे. जोपर्यंत सर्व समाज अज्ञान अंधकारात होता तोपर्यंत सर्वजण भिक्षुकांच्या भूल--थापांना बळी पडले. तथापि, जे लोक शिकले आणि ज्यांनी सत्यासत्याचा अभ्यासपूर्ण शोध घेतला त्यांना भटभिक्षुकांच्या लांड्या-लबाड्या कळू लागल्या. यामुळे दुराचारास आळा बसू लागला असे निबंधकारांनी सांगितले आहे. सर्वांस ज्ञानदृष्टी देणारी, खऱ्या ईश्वरी मार्गाची ओळख करुन देणारी आणि अत्यंत उपयुक्त अशी जी विद्या ती सर्वांना देण्याची गरज प्रतिपादन केली आहे. विद्या ही केवळ ब्राह्मण समाजाची मक्तेदारी नसून ती सर्वांना घेण्याचा अधिकार आहे. तेव्हा आजवर कपटकारस्थाने करुन अज्ञानी समाजाच्या अडाणीपणाचा धूर्तपणे फायदा करुन घेतला, फुकट मजा मारल्यात, त्याचे उपकार प्रांजल बुद्धीने फेडा. असे केल्याने खरोखर तुमचे व देशाचेही कल्याण होईल. ब्राह्मण जातीत जे सनातनी आचरणाचे लोक आहेत त्यानी इतर लोकांबरोबरचे बेपर्वाईचे वर्तन टाकून देऊन आपल्या सद्‌वर्तनाने इतर लोकांबरोबर सलोखा निर्माण करावा असे सुचविले आहे. निबंधकार शेवटी म्हणतात, 'ईश्वराने मनुष्यप्राणी जे निर्माण केले आहेत ते सारख्या हक्काने व नात्याने उत्पन्न केले आहेत.

जर ईश्वराच्या मनातून ब्राह्मणात व इतर लोकांत निराळेपणा दाखवायचा असता तर त्यांच्या व इतरांच्या अवयवांत फेर करुन टाकला असता, परंतु तसा त्यांचा हेतु नाहीच. 'यावरुन सत्यशोधक समाजाची जी प्रमुख तत्त्वे आहेत त्यास अनुसरुन हिंदू धर्माचे खरे ज्ञान' सत्यशोधक निबंधमाला भाग १ व २ मधून देण्याचा परिणामकारक प्रयत्न श्री. लोखंडे यांनी केला आहे.

श्री. लोखंडे हे महात्मा जोतीराव फुले यांचे एक निकटवर्ती अभ्यासू व निष्ठावंत असे सहकारी असल्याने सत्यशोधक समाजाचे ते एक प्रमुख आधारस्तंभ होते. वेद, उपनिषदे, पुराणे याचबरोबर इंग्रजी राजवटीबरोबर आपल्या देशात उपलब्ध झालेले ज्ञान-विज्ञान व विविध सुधारणा यांचा त्यांनी चांगला अभ्यास केला होता हे त्यांच्या निबंधमालेतून स्पष्ट होते. निबंधमालेचा प्रमुख हेतू म्हणजे विद्येपासून वंचित असलेल्या किंवा वंचित ठेवण्यात आलेल्या शूद्र-अतिशूद्रांना, स्त्रिया, शेतकरी व कामगारांना विद्येच्या माध्यमातून हिंदू धर्माचे खरे ज्ञान व्हावे, त्यांनी सर्वच क्षेत्रात सत्याचा शोध घ्यावा आणि सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त व्हावे, हा या मालेतील शिकवणुकीचा आशय आहे, विषय आहे. खरे पाहता ही सत्यशोधक समाजाची शिकवण आहे. अल्पशिक्षित गोरगरीब समाजाला समजेल अशी सोपी भाषा, वेद, उपनिषदे, गीता, साधुसंत यांची प्रातिनिधिक मते इत्यादीमुळे निबंधमालेतील शिकवण सरळ, सोपी आणि प्रभावी अशी वाटते. ज्या समाजासाठी मालेचे प्रयोजन आहे. त्यांना समजेल-उमजेल अशी बालबोध भाषा आणि उदाहरणे देऊन निबंधकारांनी लोकप्रबोधनाचे कार्य प्रभावीपणे केल्याचे आढळून येते. खरे पाहता अशा लोकसाहित्याची आजही दीन-दलित स्त्री-पुरुष समाजाला गरज आहे. परंतु साहित्याच्या क्षेत्रातील परंपरागत कंत्राटदारांनी आजवर अशा साहित्याची घोर उपेक्षा केली. अशा साहित्यास वाळीत टाकले. ते नामशेष झाले व तसे होईल असे प्रयत्न झाले. किंबहुना हे खरे लोकसाहित्य 'गावंढळ' 'विद्रूप' व 'टाकाऊ' आहे अशी संभावना करण्यात आली आणि हे साहित्यच नव्हे असा बनावट शिक्का त्यावर मारण्यात आला. या पार्श्वभूमीवर विचार करता दीन-दलित स्त्री-पुरुष समाजाचे प्रबोधन केलेल्या व करु शकणाऱ्या अशा साहित्याचा शोध घेऊन ते पुन्हा प्रकाशित व प्रसारित करण्याची आज पूर्वीइतकीच नव्हे पूर्वीपेक्षा जास्त गरज आहे. अशा लोकसाहित्यातील पुरोगामी विचारांचे पुनरुज्जीवन करणे ही काळाजी गरज आहे.

# सत्यशोधक समाज आणि सत्यशोधकाचे कार्य

भारतातील सर्व आधुनिक सामाजिक सुधारणांचा उगम म. फुले यांच्या समाजक्रांती कार्यात व त्यांनी स्थापना केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात आढळून येतो. भारतातील अशी एकही नवी सामाजिक सुधारणा नाही की, जी फुल्यांनी सांगितली नाही. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रावर सत्यशोधक समाज चळवळीचा फार मोठा प्रभाव पडलेला आढळतो. भारताच्या नकाशावर आजसुद्धा महाराष्ट्र तुलनात्मकदृष्ट्या जो प्रगतिपथावर आहे त्याचे श्रेय सत्यशोधक समाज चळवळीलाच द्यावे लागते. कै. पंढरीनाथ पाटील यांनी सन १९२७ साली लिहिलेल्या 'म. फुले यांचे चरित्र' या पुस्तकास विदर्भातील एक थोर सत्यशोधक श्री. नारायण गणपतराव अमृतकर यांनी प्रस्तावना लिहिली आहे. तीत ते म्हणतात. 'अस्पृश्यता निवारण, जातिभेद विध्वंसन सत्यशोधक समाज, सक्तीचे शिक्षण, राजकीय स्वातंत्र्य उर्फ स्वराज्य वगैरे आजकाल देशात दुमदुमणाऱ्या सर्व सुधारणांचे मूळ जोतीरावांच्या चरित्रात स्पष्ट दिसले आणि त्यांनी या सुधारणांचा पुरस्कार करताना जे हाल सहन केले त्याचा जर विचार केला, तर जसजसा काळ लोटत जाईल तसतसे जोतीबा हेच नव्या मनूतल्या भारताचे स्वातंत्र्याचे जनक होते हे त्यांच्या शत्रूनांही कबूल करावे लागेल.'

**मुंबईतील सत्यशोधकांचे कार्य :**

थोर सत्यशोधक रा. लोखंडे यांचे मुंबईतील सामाजिक व कामगार क्षेत्रातील कार्य त्या काळाचा विचार करता क्रांतिकारक आहे. म्हणूनच त्यांना कामगार

चळवळीचे जनक मानले जाते. मुंबईतील कापडगिरण्यांचे मालक आपल्या नागड्या-उघड्या स्वार्थासाठी बालवयातील मुले, स्त्रिया आणि पुरुष कामगार यांना १२ ते १४ तास गिरणीत कामासाठी जुंपत. त्यांना गुलामाप्रमाणे वागवत. तसेच वयाच्या ८ ते १२ वर्षे वयाच्या लहान मुलांनासुद्धा कोणतीही दयामाया न दाखवता प्रौढ मजुराप्रमाणे राबवून घेत. श्री. लोखंडे यांनी स्वार्थी गिरणीमालकांकडून मजुरांचे होणारे हे हरप्रकारचे शोषण प्रत्यक्ष अनुभवले होते. कारण त्यांनी कापड गिरणीमध्ये प्रत्यक्ष काम केले होते. या अवधीत त्यांना गिरणीमालकांचा मतलबीपणा पूर्णपणे समजून आला होता. त्या काळात गिरण्यांची देखरेख करणारे अधिकारी हे बऱ्याच वेळेला श्रीमंत अशा गिरणीमालकांचीच बाजू घेत असत. या पार्श्वभूमीवर लोखंडे यांनी पूर्ण विचारांनी विविध मार्गांनी गिरणी मालकांशी सामना करण्याचा निर्णय घेतला.

१९ व्या शतकातील मुंबई येथे नोकरीच्या निमित्ताने आलेले लोखंडे हे महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीने प्रभावित झालेले एक थोर सत्यशोधक होते. ते स्वत: विद्याविभूषित असल्याने त्यांनी गिरणी कामगारांचा प्रश्न आपल्या हाती घेऊन निकराचा लढा देण्याचा निर्णय घेतला. सरुवातीला अर्ज, विनंत्या करुन कामगारांना आवश्यक अशा किमान सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

तथापि गिरणीमालकांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्या काळात कापडगिरण्यांमध्ये कामगारावर देखरेख करणारे जॉबर यांचा प्रभाव होता. यासाठी श्री. लोखंडे यांनी जॉबर मंडळींशी संपर्क साधून त्यांचे वैचारीक परिवर्तन केले. त्यामुळे काही जॉबर मंडळींनी कामगारांच्या हितार्थ श्री. लोखंडे यांना साथ दिली. १८९० मध्ये फॅक्टरी कमिशनसमोर साक्ष देताना श्री. लोखंडे यांचेबरोबर एम्प्रेस मिलमधील जॉबर रघु भिकाजी, अलेक्झांड्रा मिलमधील गेणूबाबाजी, अँग्लो इंडिया मिलमधील हेड जॉबर नारायण सुरकोजी आणि अन्य काही जॉबर मंडळींनी साक्ष देऊन सहकार्य केले. श्री. लोखंडे यांच्याबरोबर गेलेल्या जॉबर मंडळींनी गिरणीकामगारांची तत्कालीन शोचनीय परिस्थिती अत्यंत बारकाईने विषद केली. दरम्यान मुंबईतील व पुण्यातील काही वृत्तपत्रांनी श्री. लोखंडे यांना चांगली साथ दिली. पुण्याच्या सार्वजनिक सभेने गिरण्यांबद्दल योग्य तो कायदा व्हावा अशी भूमिका घेतली. २९ डिसेंबर, १८७८ मध्ये नेटिव्ह ओपिनियन पत्राने गिरणीमालकांनी

कामगारांच्या हिताच्या दृष्टीने ताबडतोब पावले उचलावीत असा इशारा दिला. तथापि स्वार्थांथ गिरणीमालक सहजासहजी श्री. लोखंडे किंवा अन्य कोणाचीही कैफियत ऐकण्याची भूमिका घेण्यास तयार झाले नाहीत. गिरणीत काम करणारे सर्व कामगार आनंदात असून त्यांच्यापैकी कुणाचीही तक्रार नाही अशी गिरणीमालकांनी भूमिका घेतली. उलट शाळा कॉलेजमधील मुलांमुलीपेक्षा गिरणीत काम करणाऱ्या मुलांची तब्येत अधिक चांगली आहे असे आपमतलबी मत मांडले त्यामुळे श्री. लोखंडे यांनी आणखी जारीने प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान गोरगरिबांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे आणि सामाजिक सुधारणेला वाहून घेतलेले 'दीनबंधू' हे पत्र श्री. भालेकर बंधूकडून ९ मे, १८८० रोजी लोखंडेनी चालवण्यास घेतले. यामुळे कामगारांच्या हिताच्या दृष्टीने जनजागृती होण्यास मदत झाली. ब्रिटिश सरकारने गिरण्यांच्या बाबतीत केलेला कायदा अपुरा व असमाधानकारक असल्याने त्यामध्ये सुधारणा करावी अशी सरकारकडे मागणी केली. सन १८८४ मध्ये गिरणी कामगारांच्या मागण्या मंजूर व्हाव्यात यासाठी प्रचंड सभांचे आयोजन केले. २४ एप्रिल, १८८९ रोजी १७ हजार कामगारांच्या सह्यांचे मागणी निवेदन गव्हर्नर जनरलना सादर केले. तसेच बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन, मुंबई यांनी १० हजार कामगारांचा मेळावा भरवून त्यामध्ये जाहीरपणे मागण्या मांडल्या. याचबरोबर सन १८९० मध्ये बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन ही कामगारांची भारतातील पहिली संघटना स्थापन केली. यामुळे संघटनेला बळकटी येऊन सांघिक-शक्ती वाढीस लागली. या फोफावलेल्या कामगार चळवळीचे फलित म्हणून बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशनने प्रथमच कामगारांना साप्ताहिक सुट्टी मंजूर केली. श्री. लोखंडे यांच्या धडाडीच्या व कल्पकतेच्या प्रयत्नास यश येऊ लागले. कारण गिरणी कामगारांना साप्ताहिक सुट्टी मिळणे हे मोठे यश होते. भारतातील कामगार चळवळीचा हा पहिला मोठा विजय होता.

श्री. लोखंडे हे चरितार्थासाठी ठाणे येथून मुंबई येथे आले होते. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाले होते. त्यावेळचा विचार करता त्यांना चांगली नोकरी मिळणे सहज शक्य होते. तथापि गिरणी कामगारांच्या हितासाठी आणि त्यांच्यामध्ये असलेल्या

अनिष्ट चालीरिती व गिरणीकामगारांचे संसार सुखी व्हावेत यासाठी त्यांनी स्वत:ला झोकून दिले. स्वत:च्या संसारावर तुळशीपत्र ठेवून एक थोर सत्यशोधक म्हणून त्यांनी मुंबईमध्ये केलेले चौफेर कार्य ऐतिहासिक असे आहे. कामगार चळवळीबरोबर समाजसुधारणेचाही जारीने प्रयत्न केला. सन १८७६ मध्ये 'पंचदर्पण' ही पुस्तिका लिहून समाजामध्ये चालत आलेल्या चुकीच्या रुढी व परंपरा नाहीशा करण्याचा प्रयत्न केला. दीनबंधू या पत्रातून शूद्र-अतिशूद्र समाजातील मुलांमुलींना शिक्षणासाठी फ्रीशिप मिळावी ही मागणी लावून धरली. सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा फुले यांना मुंबईत बोलावून त्यांची विविध ठिकाणी प्रबोधनपर व्याख्याने आयोजित केली. देवाधर्माच्या नावाखाली सनातन्यांनी गोरगरीब समाजाला वेठीस धरुन त्यांची जी लुबाडणूक चालविली होती ती थोपविण्याचा प्रयत्न केला. शूद्र, अतिशूद्रांनी शिक्षण घेऊन सुधारावे आणि सनातन्यांच्या सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त व्हावे यासाठी प्रयत्न केले. ब्राह्मण समाजामध्ये केशवपनाची अनिष्ट प्रथा चालू होती ती बंद व्हावी म्हणून मुंबईतील सर्व न्हाव्यांची डोंगरी येथे सभा आयोजित करुन केशवपनाचे अमानुष कार्य करणे कसे चुकीचे आहे हे समजावून सांगून त्यांचा संप घडवून आणला. सन १८९३ मध्ये हिंदू-मुस्लिम समाजामध्ये दंगा उसळला होता. हा दंगा शमविणे ब्रिटिश सरकारलाही कठीण झाले. म्हणून त्यांनी लोखंडे यांचे सहकार्य घेतले. लोखंडे यांनी दोन्ही समाजाच्या घरोघरी जाऊन त्यांना समजावून सांगितले. शांतता कमिट्या स्थापन केल्या. साहाय्यक निधी उभा करुन झळ पोहचलेल्या कुटुंबांना साहाय्य केले. हिंदू-मुस्लिमांचा एकोपा मेळावा आयोजित करुन त्यांचे प्रबोधन केले आणि शांतता प्रस्थापित केली. श्री. लोखंडे यांचे हे मौलिक कार्य विचारात घेऊन ब्रिटिश सरकारने जस्टीस ऑफ पीस (जे. पी.) आणि रावबहादूर अशा पदव्या त्यांना बहाल केल्या. प्लेगसारख्या साथी आणि अन्य रोगराई यावर उपचार करण्यासाठी 'मराठा हॉस्पिटलची' स्थापना केली. सत्यशोधक निबंधमाला भाग १ आणि २ या दोन विद्वतापूर्ण पुस्तकाद्वारा शूद्र-अतिशूद्रांचे प्रबोधन व्हावे यासाठी प्रयत्न केले. महात्मा जोतीराव फुले आणि त्यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कावड झेंड्याखाली श्री. लोखंडे आणि त्यांचे सहकारी यांनी १९ व्या शतकात मुंबईत केलेले वरील प्रकारचे कार्य व्यापक व ऐतिहासिक स्वरुपाचेच आहे हे यावरुन स्पष्ट होते.

**दिव्य ज्योत मालवली :**

हॉस्पिटलमुळे हजारो गोरगरिबांचे प्राण वाचले परंतु श्री. लोखंडे मात्र प्लेगच्या साथीला बळी पडले, हा एक अत्यंत दुर्दैवी आणि चमत्कारिक योगायोग आहे. ८ फेब्रुवारी, १८९७ मध्ये त्यांचा प्लेगच्या भयंकर साथीने बळी घेतला. दीन-दलित स्त्री-पुरुषांना प्रदीर्घ काळ सावली देणारा, आधार देणारा, प्रेरणा देणारा, संरक्षण देणारा आणि सामर्थ्य देणारा प्रचंड वटवृक्ष एकाएकी कोसळला. भारतातील दीन-दलितांची सावली काळाने हिरावून घेतली. अबालवृद्ध जनतेचा आधारस्तंभ एकाएकी कोलमडला. लक्षावधी गोरगरिबांच्या जीवनात प्रकाश देणारी दिव्य ज्योत क्षणार्धात मालवली.

**"यज्ञी ज्यांनी देऊनी निजशिर घडीले मानवतेचे मंदिर**
**परी जयाच्या दहनभूमीवर नाही चिरा नाही पणती."**

या दोन ओळीतील आशय रावबहादूर नारायणराव लोखंडे यांच्या बाबतीत तंतोतंत लागू पडतो. स्वत:च्या संसारावर तुळशीपत्र ठेवून पदरी असलेली चांगली नोकरी लाथाडून लाखो स्त्री-पुरुष कामगारांचे संसार फुलविण्याचा हयातभर प्रयत्न केला. भारतात पहिलीवहिली कामगार संघटना ज्याने स्थापन केली, गिरणीमालक आणि ब्रिटिश सरकारच्या रागालोभाची पर्वा न करता मोठ्या धैर्याने संघटनेच्या बळावर उपेक्षित कामगारांना अनेक हक्क मिळवून दिले, लक्षावधी गोरगरिबांचे प्राण वाचविण्यासाठी ज्यांनी हॉस्पिटलची स्थापना केली, स्त्री-पुरुष, शूद्र-अतिशूद्रांच्या प्रबोधनासाठी, जागृतीसाठी व उद्धारासाठी आपली समर्थ लेखणी 'दीनबंधू' या पत्रातून व इतर छोटी छोटी पुस्तके लिहिण्यास झिजविली, त्या थोर सत्यशोधकाचे त्यांच्या मुंबई या कर्मभूमीत किंवा अन्यत्र कसल्याही प्रकारचे स्मारक असू नये, ही जितकी चीड आणणारी दुर्दैवी घटना आहे तशीच ती भारतीय संस्कृतीच्या उदारतेला न शोभणारी आणि काळजाला घरे पाडणारी अशी घटना आहे.' म्हणून शेवटी म्हणावेसे वाटते,

**"दिव्यत्वाची जेथ प्रचिती**
**तेथे कर माझे जुळती."**

१९ व्या शतकातील पुणे म्हणजे भिक्षुकशाहीचे माहेरघर. सनातन्यांचा बालेकिल्ला. याच पुण्यनगरीत शूद्र-अतिशूद्र व स्त्री-समाज यांच्या उध्दारासाठी व कल्याणासाठी ज्या धैर्याने व जिद्दीने जोतीरावांनी एका मागोमाग एक अशा सुधारणा प्रत्यक्षात आणण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे सिंहाच्या गुहेत शिरुन त्याची आयाळ पकडण्याचाच प्रकार होतो. जोतीरावांच्या क्रांतिकार्यात त्यांना जसे उदारमतवादी इंग्रज अधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले त्याचप्रमाणे कांही ब्राह्मण सुधारकांचेही लाभले. विशेष म्हणजे त्यांची पत्नी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी त्यांना सर्वत्र कार्यात दिलेली साथ क्रांतिकारकच म्हणावी लागेल. ज्या काळात स्त्रीने शिकणे महापाप मानले जाई त्या काळात त्या आपल्या पतीकडून शिकल्या आणि सनातन्यांच्या व टवाळांच्या अनन्वित छळाला न जुमानता त्यांनी शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणून उत्कृष्ट कार्य केले. यासाठी त्यांना आपल्या घरातून बाहेर पडावे लागले. हालअपेष्टा व अनेक संकटांना सामोरे जावे लागले. तरीसुध्दा त्या धीरोदात्त माउलीने कशाचीही पर्वा न करता आपल्या पतीच्या सर्वच क्रांतिकार्यात बरोबरीने सहभाग दिला. त्या काळाचा विचार करता फुले दांपत्याने एका नव्या मनूची सुरुवात केली त्यातून एका नव्या युगाची पहाट पाहावयास मिळाली.

**सत्यशोधक समाजाची स्थापना :**

कोणत्याही प्रकारची चळवळ असो किंवा क्रांती-उत्क्रांती असो ती अचानक उद्‌भवत नाही. त्यापाठीमागे अनेक लहान-मोठ्या घटना, आघात-प्रत्याघात आणि बौध्दिक-वैचारिक घडामोडी घडत असतात. सत्यशोधक चळवळसुध्दा अशाच प्रकारच्या पार्श्वभूमीवर साकार झालेली आढळून येईल. महात्मा फुले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ब्राह्मणांसह सर्व समाजाला, सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करणाचा प्रयत्न केला. विद्या हे एक प्रभावी साधन आहे हे विचारात घेऊन अनेक शाळा सुरू केल्या. प्रौढांसाठी रात्रीच्या शाळा, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंधगृह, दुष्काळ निवारण इत्यादी सुधारणा घडवून आणल्या. देवाच्या व धर्माच्या नावाखाली भूदेवांनी चालविलेली दिशाभूल थोपविण्याचा प्रयत्न केला. तरीसुध्दा प्रस्थापित ब्राह्मणी शक्तीला आवर घालणे कठीण होऊ लागले. समाजसुधारणेच्या मार्गातील अडीअडचणी व

खाचखळगे यांची महात्मा फुले यांना चांगली कल्पना होती. भिक्षुकशाहीची रग कमी केल्याशिवाय आपले इच्छित कार्य तडीस जाणार नाही हे त्यांना कळून चुकले. यातून प्रभावी मार्ग कसा काढता येईल यावर विचारविनिमय करण्यासाठी जोतीरावांनी पुण्यामध्ये पुणे, मुंबई व अन्य ठिकाणाहून ५०-६० निवडक लोकांची एक सभा आयोजित केली. त्या सभेत प्रदीर्घ असे उलटसुलट विचारमंथन झाले आणि त्याची परिणती म्हणे २४ सप्टेंबर, १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची रीतसर स्थापना करण्यात आली. एका अभूतपूर्व अशा सांघिकशक्तीची दिव्य ज्योत प्रज्वलित झाली आणि समाजक्रांतीच्या ऐतिहासिक चळवळीची ही नांदी ठरली. सत्यशोधक समाजाची खालील तीन प्रमुख तत्त्वे ठरविण्यात आली. १) सर्व मानवप्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत. २) ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईस संतुष्ट करण्यास अगर बापास विनवण्यास जशी त्रयस्थ दलालाची जरुरी नसते, त्याप्रमाणे सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ती करण्यास भट दलालाची आवश्यकता नाही. ३) कोणीही जातीने श्रेष्ठ ठरत नसून फक्त गुणाने श्रेष्ठ ठरतो.

सत्यशोधक समाजाची स्थापना म्हणजे प्रस्थाप्रित ब्राह्मणी मिरासदारीला मोठे आव्हान होते. ब्राह्मणांनी संस्कृत भाषेत मंत्र म्हटल्याशिवाय ईश्वर प्रसन्न होतच नाही अशी सर्वांची समजूत करुन देण्यात आली होती. संस्कृत सोडून मराठी, कानडी अगर कोणतीही भाषा सर्वसाक्षी परमेश्वराला का समजू नये याचे गौडबंगाल जोतीरावांनी स्पष्ट केले. त्यामुळे सत्याशोधक समाजाच्या स्थापनेत प्रतिगामी भट-भिक्षुकांचा विरोध झाला नसता तरच नवल ! महाभयंकर घटना, कलियुग आणि महापाप या सदरात या कार्याची भूदेवांनी गणना केली. अनेक लोकांना विरोधासाठी चिथावणी दिली. परंतु जोतीरावांनी या प्रकारच्या कोल्हेकुईस भीक घातली नाही. कै. पंढरीनाथ पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे सत्यशोधक समाज म्हटला म्हणजे तेथे गुलामगिरीचा नायनाट, शिक्षणाची चळवळ, स्त्री शिक्षणाचा प्रसार, अस्पृश्योद्धार, सधवा-विधवा स्त्री जातीच्या मानवी हक्कांचा पुरस्कार, दीन अर्भकांवर व आंधळ्या पांगळ्यांवर भूतदया, सत्याचरण, ईश्वरभक्ती, सत्यनिष्ठा व स्वातंत्र्य या गोष्टींचा आपोआप बोध होतो.

सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्याबरोबर पुण्यात व पुण्याबाहेर या समाजाच्या अनेक शाखा निघू लागल्या. अनेक तरुण यामध्ये सहभागी झाले. सत्यशोधक

कार्यकर्त्यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. अल्पावधीतच समाजाच्या कार्यास व्यापक चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले. देशातील ही एक अपूर्व अशी घटना होती. नवविचाराच्या एका नव्या संघशक्तीचा हा एक समर्थ आविष्कार होता. कोट्यवधी दीनदलितांच्या भाव-भावनांचा आदर करुन त्यांना सुमार्ग दाखविण्याचे ते एक केंद्र होते. सत्यशोधक समाजाच्या झेंड्याखाली दीनदलितांच्या सांघिकशक्तीचे घडविलेले ते यथार्थ दर्शन होते. सत्यशोधक समाजाचा कावड झेंडा निश्चित करण्यात आला. हा कावड झेंडा म्हणजे मन्वंतराचे प्रतीक. समाजक्रांतीच्या नव्या युगाची निशाणी. दीनदलितांच्या आशाआकांक्षाची पताका आणि सत्य, मानवता व समानतेचे मानचिन्ह होय.

**सत्यशोधक चळवळीचा परिणाम :**

१९ व्या शतकात अनेक चळवळींचा महाराष्ट्रात उदय झाला. त्यामध्ये आर्यसमाज, प्रार्थनासमाज, परमहंस सभा इत्यादीचा समावेश होतो. तथापि महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनावर खऱ्या अर्थाने सत्यशोधक समाजाचा विशेष प्रभाव आढळून येतो. जिला आपण सर्वसमावेशक चळवळ म्हणू ती फक्त सत्यशोधक समाजाच्या रुपाने आपणास पाहावयास मिळ्ते. कारण खेड्यापाड्यातील उपेक्षित शेतकरी, शेतमजूर, शूद्र, अतिशूद्र, स्त्रिया आणि इतर अन्य समाज यांच्या जागृतीसाठी आणि उद्धारासाठी अतिशय त्यागबुध्दीने व ध्येयवादाने शेवटच्या गरिबातल्या गरीब माणसांपर्यंत पोहचलेली ही एकमेव चळवळ होय. या चळवळीचा पाया शास्त्रशुद्ध अशा शाश्वत तत्त्वज्ञानावर आधारलेला होता, ती तत्कालीन समाजाच्या गरजावर आधारित अशी चळवळ होती. हजारो वर्षे दबलेल्या व थिजलेल्या उपेक्षित समाजाला पंखाखाली घेऊन शिक्षणाच्या व जागृतीच्या माध्यमातून सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्तता व्हावी असे पाहणारी ही भारतातील पहिलीच चळवळ होती. दीन-दलितांच्या आणि उपेक्षितांच्या आर्त किंकाळ्यांना याच चळवळीने प्रतिसाद दिला. शोषितांचा हजारो वर्षे दडपला गेलेला आक्रोश याच चळवळीने प्रथम ऐकला. सर्व प्रकारच्या शोषणाविरुध्द आणि गुलामगिरीविरुध्द उभारलेले हे भारतातील पहिले बंड नव्हे, तर ते महायुध्द होते. कारण या चळवळीने केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर दक्षिणेत परिवर्तनाची व समाजक्रांतीची एक लाट उसळली. हजारो सत्यशोधक

या ना त्या स्वरूपात पुढे सरसावले. या देशातील उपेक्षितांची, शोषितांची आणि गुलामगिरीत खितपत पडलेल्या दीन-दलितांची सांघिकशक्ती उभी केल्याचे हे भारतातील पहिले उदाहरण होते. विशुध्द वैचारिक बैठक, शाश्वत तत्त्वज्ञान, सत्य, समता व बंधुता यावर आधारलेली ही भारतातील पहिलीच चळवळ होती. यामध्ये धर्मभेद, जातिभेद अशा विषमताप्रधान कोणत्याही विचाराला अगर आचाराला जरासुध्दा थारा नव्हता. किंबहुना सर्वच क्षेत्रातील विषमता, शोषण व गुलामगिरी या विरुद्धचा हा खरा संग्राम होता.

उत्तर पेशवाईत विशेषत: शेवटच्या पेशव्याच्या कारकिर्दीत शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा सर्वच क्षेत्राची अवस्था म्हणजे अखेरची घटका मोजणाऱ्या कर्करोग्यासारखी झाली होती. देवाच्या व धर्माच्या नावाखाली रावबाजीत अनेक प्रकारच्या अनाचाराने धुमाकूळ घातला होता. शेतकरी, शेतमजूर, स्त्रिया आणि शूद्र, अतिशूद्र यांचे भयाणभीषण शोषण होत होते. त्यांच्यावर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्यायाला पारावार राहिलेला नव्हता. एखादी तरुण, सुंदर स्त्री नजरेला पडण्याची सोय नव्हती. तसे झाले व अशा प्रकारामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याला शेवटची घरघर लागलेली होती. जिकडेतिकडे दीन-दलितांच्या आणि स्त्रियांच्या आर्त किंकाळ्या ऐकू येत होत्या. एकूण महाराष्ट्राची दैनादैना उडाली होती.

या पार्श्वभूमीवर एक सुशिक्षित उमदा करारी, द्रष्टा व स्वतंत्र बुद्धीचा असामान्य तरुण पुढे सरसावला. तो तरुण म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महाराष्ट्राच्या अधोगतीचा त्यांनी अत्यंत बारकाईने अभ्यास केला. सर्व धर्मग्रंथ वाचले. इंग्रजांच्या आगमनाबरोबर व नंतर प्राप्त झालेल्या नवविचारांचा सखोल अभ्यास केला आणि शिक्षणाची संजीवनी देऊन सत्यशोधक समाजाच्या झेंड्याखाली शोषितांचा पहिला लढा या देशात यशस्वीपणे उभा केला. २४ सप्टेंबर १८७३ ही तारीख या देशाच्या शोषितांच्या लढ्याच्या इतिहासातील एक सुवर्णदिन होय, कारण यादिवशी म. फुले आणि त्यांच्या निवडक सहकाऱ्यांनी रीतसर सत्याशोधक समाजाची स्थापन केली.

**शैक्षणिक क्षेत्रावरील परिणाम :**

महात्मा फुले यांच्या समग्र क्रांतिकार्यात शिक्षणाला म्हणजे विद्येला सर्वश्रेष्ठ स्थान देण्यात आलेले स्पष्ट होते. सर्व प्रकारच्या अवनतीला अविद्या कारणीभूत आहे

असे त्यांचे स्पष्ट मत होते आणि ते खरे आहे. विद्या नसलेला माणूस आणि पशू यामध्ये फारसा फरक नसतो हे त्यांनी स्पष्ट केले. तत्कालीन स्थितीचा अभ्यास केला असता देवाच्या व धर्माच्या नावाखाली विद्या शिकण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणंचाच आहे. दीन-दलित किंवा स्त्रियांनी विद्या शिकणे ही देवाच्या आज्ञेविरुद्ध किंवा धर्माविरुद्ध ठरणारे महाभयंकर पाप आहे. अशी भिक्षुकशाही किंवा पुरोहितशाहीकडून इतरांना भीती घातली जात होती.

इंग्रजांच्या राजवटीला हे विकृत विचार मानवण्यासारखे नव्हते. त्यांनी उदार दृष्टिकोन स्वीकारुन विद्या घेण्याचा सर्वांनाच अधिकार आहे हे स्पष्ट केले. श्रावण महिन्यात ब्राम्हणांना दक्षिणा म्हणून केली जाणारी हजारो रुपयांची खैरात थांबवून ही रक्कम शिक्षणाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांच्या या समान संधी देणाऱ्या उदार धोरणाचे म. फुले, न्या. रानडे, भांडारकर इत्यादी सर्व सुधारकांनी स्वागत केले. हे धोरण म्हणजे गोरगरिबांना वरदानच आहे अशी भावना समाजात वाढीस लागली. इंग्रजांचे राज्य आज आहे, उद्या ते नसेल. ते आहे तोपर्यंत दीन-दलितांनी व स्त्रियांनी शिकून घावे, नाहीतर पुन्हा विद्येचा संकोच केला जाईल. जनतेच्या शिक्षणाची काळजी ज्या सुशिक्षितांनी, समर्थांनी किंवा राज्यकर्त्यांनी घ्यावयाची ते घेणार नाहीत. यासाठी त्वरा करा असे सुधारक सांगत आले. त्यांचे म्हणणे खरे ठरत आहे हे आज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ६५ वर्षानंतरसुद्धा दिसून येते. गरिबांना चांगले शिक्षण आजही मिळत नाही. निरक्षरांची संख्या वाढतच आहे. प्राथमिक शिक्षणसुद्धा गरिबांना दुर्मीळ आहे. मागासवर्गीय व स्त्रियांचे शिक्षण आजही अल्प व उपेक्षित आहे. म्हणून विद्येची महती सांगताना म. फुले यांनी म्हटले आहे.

विद्येविना मती गेली ।
मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।

यावरुन म. फुल्यांचे हे शैक्षणिक तत्त्वज्ञान कसे शाश्वत आहे हे स्पष्ट होते. इंग्रजांच्या उदार धोरणास सनातनी ब्राह्मण विद्धानांनी कडवा विरोध केला. तसेच शिक्षण ही धार्मिक बाब असल्याने त्यामध्ये इंग्रजांनी ढवळाढवळ करु नये तसे झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील अशा धमक्या दिल्या गेल्या. इंग्रज सरकार हे सर्वसामान्यपणे उदार होते. तरीसुद्धा राज्य करणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. जनतेचे कल्याण हा काही त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता असे नाही. त्यामुळे मेकॉले यांनी शिक्षणाचा झिरपता सिध्दांत (Downword Filtaration) मांडला. याप्रमाणे जे मूठभर ब्राह्मण समाजातील लोक शिकतील, ते गोरगरीब जनतेचे शिक्षण करतील आणि अशा पद्धतीने शिक्षण खालच्या वर्गापर्यंत झिरपत जाईल अशी सुपीक कल्पना पुढे आणली गेली. ती सनातनी व मक्तेदारी समाजाच्या उपयोगी पडली, जे शिकलेले होते त्यांच्या डोके स्वरुपी मडक्याला छिद्रच नव्हते. त्यामुळे त्यांच्याकडून खाली विद्या झिरपणे कदापिही शक्य नव्हते. परिणामी इंग्रजांना पैसा वाचविता आला मतलबी ब्राह्मणांचा हेतू साध्य झाला.

या पार्श्वभूमीवर महात्मा फुले यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले क्रांतिकार्य अभूतपूर्व व अद्धितीय असे ठरले. पुण्यासारख्या त्या वेळच्या सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात त्यांनी भर बुधवार पेठेत मुलींची शाळा १८४८ मध्ये सुरु केली. महारमांग मुलांसाठी वेताळ पेठेत १८५१ मध्ये शाळा सुरु केली. स्वत: आणि पत्नी सावित्रीबाई यांनी कोणत्याही प्रकारच्या मोबदला न घेता शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून काम केले. पुणे परिसरात खेड्यापाड्यात एका पाठोपाठ एक अशा अनेक शाळा काढल्या. रात्रीच्या शाळा काढल्या, शेतीधंद्याचे आधुनिक शिक्षण, जोडधंदे, कालवे पाटबंधारे. रात्री शिक्षण इत्यादी विषयांच्या प्रगतीला चालना मिळाली. डोळे दिपून जावेत अशा तऱ्हेची ही देशातील अभिनव व क्रांतिकारी चळवळ ठरली. एका नव्या पर्वाचा उदय झाला. सत्यशोधक सभा, परिषद, सत्यशोधकी जलसे, तमाशे, छोट्या पुस्तिका आणि दीनमित्र, दीनबंधू इत्यादी वृत्तपत्रातून लोकशिक्षणाची एक व्यापक चळवळ उभी राहिली. खेड्यापाड्यातील शेतकरी, शेतमजूर, स्त्रिया, दीन-दलित आणि मोठ्या शहरातील मजुरांना शिक्षणाची पहाट प्रथमच लाभली. खेड्यापाड्यात व डोंगरकपारीत जाऊन पोहचलेली शिक्षणाची या देशातील ही पहिली चळवळ होय. न्याय, समता, बंधुता आणि सामाजिक बांधिलकी ही मूलभूत तत्त्वे या चळवळीने अंगीकारिली

होती हे स्पष्ट होते. विद्येचा लाभ सर्वांना न्यायाने मिळाला पाहिजे यावर या चळवळीने भर दिला.

दुसरी बाब म्हणजे फुल्यांच्या या शैक्षणिक क्रांतिकार्याचा प्रभाव अनेक व्यक्तींवर पडणे स्वाभाविक होते. राजर्षि शाहू महाराज, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज यांनी शिक्षणक्षेत्रात ऐतिहासिक कार्य केले ते सर्वज्ञात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊसाहेब पाटील, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख, कै. बापूजी साळुंखे, कै. मामासाहेब जगदाळे (बार्शी) इत्यादी थोर व्यक्तींनी फुल्यांपासून प्रेरणा घेऊन गोरगरिबांच्या शिक्षणासाठी ऐतिहासिक कार्य केले. त्यामुळे महाराष्ट्र आज संपूर्ण देशात शिक्षण क्षेत्रात तुलनात्मकदृष्ट्या आघाडीवर आहे. तथापि, सद्य:स्थिती पाहता फुल्यांचे स्वप्न फारच अपुरे आहे हे स्पष्ट आहे. विद्यावेतने, स्त्री-शिक्षणाला प्राधान्य देणे, आधुनिक शेती शिक्षण, विविध सुधारणांचे शिक्षण, मागासवर्गीयांचे शिक्षण या बाबतीत सर्व सुधारणांचा पाया फुल्यांच्या या शैक्षणिक कार्यात आहे हे स्पष्ट होते. शेतकरी समाजाचे शिक्षण प्रथमच यामुळे सुरु झाले. जनतेचे शिक्षण (Mass Education) ज्याला आपण म्हणू ते प्रथम येथूनच सुरु झाल्याचे दिसून येईल. म्हणून म. फुले यांनी चालू केलेली शिक्षणाची चळवळ ही भारतातील खरीखुरी जनतेच्या शिक्षणाची चळवळ (Education Movement of Masses) होय. त्यामुळेच अलीकडे महाराष्ट्रात सर्व क्षेत्रात शेतकरी, मागासवर्गीय आणि स्त्री-समाज यातील काही थोड्या व्यक्ती विविध क्षेत्रात उच्च पदावर दिसतात.

**सामाजिक परिणाम :**

थोर चरित्रकार कै. धनंजय कीर यांनी म्हटल्याप्रमाणे आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरु करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्घटनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही हिंदुस्थानात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंचाळी होय. (मा. जोतीराव फुले चरित्र पृ. १४९) सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा जोतीराव फुले हे एक क्रांतिवीर होते. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले' या म्हणीप्रमाणे ते वागले. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी आपल्या मतांना मुरड घातली

नाही. तडजोड केली नाही. विचारपूर्वक घेतलेला निर्णय कोणतीही किंमत द्यावी लागली तरी तो अमलात आणावयाचा हे त्यांचे वैशिष्ट्य होते. या संदर्भात थोर सुधारक व फुले यांचे मित्र माधवराव रानडे व लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची उदाहरणे लक्षात घेण्यासारखी आहेत.

माधवराव रानडे यांची बहीण अचानक विधवा झाली म्हणून जोतीराव त्यांच्या भेटीस गेले. त्यांचे सांत्वन करून झाल्यावर जोतीराव त्यांना म्हणाले की आपण सुधारक आहात. आपण जो उपदेश करतो तो प्रत्यक्षात येण्यासाठी आपण आपल्या बहिणीचा पुनर्विवाह करावा. यावर रानडे म्हणाले जर विधवा बहिणीचा पुनर्विवाह केला तर माझ्या वडलांना अपार दु:ख होईल आणि पुण्यातील ब्राह्मण माझ्यावर बहिष्कार टाकतील. जोतीराव रागावून म्हणाले रावसाहेब मग सुधारकाचे ढोंग करू नका.

या बाबतीत घडलेली दुसरी घटनाही विचारात घेण्यासारखी आहे. पहिल्या पत्नीच्या निधनानंतर रानडे यांनी वयाच्या ३२ व्या वर्षी एका ११ वर्षे वयाच्या कुमारिकेशी विवाह केला. हा सामाजिक सुधारणेचा विश्वासघात आहे हे सांगून जोतीरावांनी त्यांचा खरपूस समाचार घेतला.

दुसरे उदाहरण लोकहितवादींचे आहे. त्यांनी आपला मुलगा शिक्षणासाठी परदेशी पाठविला. परंतु धर्मबाह्य कार्य झाले असे सनातनी ब्राह्मणांचे मत पडले हे पाहताच त्यांनी शरणचिठ्ठी लिहून देऊन प्रायश्चित घेतले. सरकारने इंग्लंडच्या कामगिरीवर जाण्याचे त्यांना मिळालेले निमंत्रण त्यांनी ब्राह्मणांच्या भीतीने नाकारले. (म. जोतीराव फुले पृ. १५६)

यावरुन समकालीन कचखाऊ सुधारक आणि निर्धारी जोतीराव फुले यांच्यातील फरक लक्षात येतो आणि त्यांची थोरवीही स्पष्ट होते. म्हणून त्यांना भारतीय सुधारणांची, सामाजिक पुनर्रचनेचे आणि भारतीय समाजवादाचे जनक म्हणतात. जोतीरावांनी १८७३ साली स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचा सामाजिक व राजकीय क्षेत्रावर कोणता परिणाम झाला याचा पुढे विचार करू.

सत्यशोधक चळवळ ही शेतकऱ्यांच्यासाठीच शेतकरी पुढाऱ्यांनीच स्वत: मुळातच चालू केलेली आधुनिक चळवळ होती. ही चळवळ प्रसारित पावावी म्हणून

अगदी पहिले नियतकालिक दीनबंधु नावाचे सन १८७७ साली चालू झाले. भालेकर-लोखंडे-बिर्जे हे अगदी पहिले जनतेतील संपादक झाले. दीनबंधु म्हणजे जे गरीब बांधव आहेत असे लोक. त्यांची गाऱ्हाणी, संकटे, अडीअडचणी या पत्राने प्रथम मांडल्या. राष्ट्रवीरने देखील पुढे पन्नास वर्षे हेच सत्कार्य उत्तम प्रकारे बजाविण्यात असामान्य यश मिळविले. जनतेचे प्रतिनिधी प्रातिनिधिक संस्थांतून निवडून जाऊ लागले. तालुका, जिल्हा लोकलबोर्ड जनतेच्या ताब्यात आली. आता पुढे पंचायत राज्य व जिल्हा परिषदांच्यावर ताबा झाला. हा सगळा परिणाम शिक्षणजागृतीच्याच प्रयत्नांचा होय. नाहीतर या सर्व परिस्थितीचा संपूर्ण अभाव होता व सत्ता, मत्ता आणि सर्वप्रकारचे नेतृत्व मूठभर शहरी पांढरपेशांच्या ताब्यात होते. मध्यस्थ (एजंट) आडत्या नको हे सत्यशोधक चळवळीचे कणाभूत व प्रमाणभूत तत्त्व होते. त्यामुळे परिस्थिती पालटली. त्यासाठी प्रथम धर्मसुधारणेचा मूलभूत प्रयत्न करावा लागला. सत्यशोधक मोठे व्यवहारी होते. जनतेच्या चालीत ते चालले. तिला समजणारी भाषा त्यांनी वापरली. तिला पाहिजे होते त्या बाबींचा आवाज त्यांनी उठविला. तिला पाहिजेत व झेपतील अशी तत्त्वे मांडली, साधने वापरली, पहिली जागृती घडवून आणली. हे सर्व चिपळूणकरी निबंधमालेच्या संप्रदायाला अर्थात आवडले नाही. ही जनतेची चळवळ रोखण्यासाठी सत्यशोधक चळवळ ही परधर्म व परकीयांच्यापासून उत्स्फूर्त आहे असा डाव त्यांनी टाकला; पण सत्यशोधक खंदे वीर होते, झुंजार होते. शेकडोपटींनी बऱ्यावाईट प्रतिक्रिया व्यक्त करुन, चिपळूणकरी संप्रदायाचा बालेकिल्ला जमीनदोस्त करण्यात आला. बुद्धीने ब्राह्मण निर्माण केले. पुढे जंगम व गुरव निर्माण झाले. त्याप्रमाणे म. फुले, शाहूमहाराज यांनी स्वयंमपुरोहित निर्माण करणारी नवी चळवळ आधुनिक काळी पुन्हा हातात घेतली. धार्मिक, सामाजिक-राजकीय क्षेत्रांतून पुढारलेल्या वर्गाला बहिष्कृत करुन वगळण्याचा जालीम पवित्रा घेण्यात आल्यामुळे त्यांचे महत्त्व कमी झाले. त्यांच्या जागा, वतनदाऱ्या मोकळ्या झाल्या. सत्यशोधक चळवळीच्या काळात प्रथम अब्राह्मण पुरोहितांकडून लावलेली लग्ने बेकायदेशीर आहेत. दक्षिणा वसूल होण्यासाठी वगैरे तत्सम प्रकारचे वर्चस्व राहावे म्हणून म. फुल्यांच्या वेळेपासून काही केसेस कोर्टात दाखल केल्या गेल्या; पण म. फुले यांनी १८८५ साली हायकोर्टात दावा जिंकला व शेवटी मुंबई कौन्सिलमध्ये जोशी बिल मंजूर होऊन पुरोहित होण्याचे व पौराहित्याचे स्वातंत्र्य कायद्याने प्रस्थापित झाले. विविध परिणाम

काय झाले हे पाहण्यासाठी चळवळीच्या इतिहासातून कालक्रमणानुसार पुढे जावे लागते. सत्यशोधक चळवळींचा आविष्कार जातीय माध्यमातून झाल्यासारखा वाटतो. पण त्या काळाच्या मर्यादित माध्यमात राहून तिला वस्तुस्थितीजन्य असे व्यावहारिक पवित्रे घ्यावे लागले हे ठीकच झाले. सर्व ब्राह्मणेतरांमधील जातिजमातींच्या शैक्षणिक संस्था, परिषदा व चळवळी या सर्वांना सत्यशोधक चळवळीने जन्म दिला. राजर्षी शाहूमहाराजांनी विद्याप्रसारक चळवळींना मोठ्यात मोठा आर्थिक हातभार लावला. त्यामुळे म. फुल्यांची स्वप्ने व्यवहारात मोठ्या प्रमाणात आली. म. जोतीराव फुले व राजर्षी शाहूमहाराज हे मोठ्यात मोठे पुढारी झाले. यांच्या निधनानंतरही सर्वांगीण प्रगती व परिणाम करणारी ही चळवळ टिकली. कारण सत्य हे शाश्वत व विकासात्मक असते. प्रकाशित होतच असते. वेदोक्त प्रकरणापर्यंत (१९०१-६) एक प्राथमिक कालखंड खलास होतो, संपतो. Prior to 1856 the shastris in the Poona Sanskrit College taught Law to Brahmin students only and refused to teach the secred Law to any one except a Brahmin" ( A Review Education in Bombay State (1855-1965) Government Publication Page 492) बहुजन समाजाला विद्येची दारे बंद होती असे म्हणणे केवळ कादंबरीप्रमाणे काल्पनिक नव्हते ! शूद्र म्हणजे दास-गुलाम, अतिशूद्र म्हणजे तर अस्पृश्य असूनही बंदा गुलाम. मराठी काळानंतर मराठे लोकांना शूद्र समजण्याची वहिवाट वाढली. वेदाचा, संस्कृताचा अधिकार स्त्रिया व शूद्रांस नाही. प्राकृतांना नाही अशी ओरड प्रामुख्याने तुकारामादी संतांनी केली. बहुतेक सर्व संतानी तत्कालीन जातिव्यवस्थेचा निषेध केल्याचे संत साहित्यात जागोजागी आढळून येते. संत तुकारामानी 'तुका म्हणे नाही जाती सवे काम, ज्याचे मुखी नाम तोची धन्य!' संत चोखोबानी तर 'ऊस डोंगापरि रस नव्हे डोंगा' असे कळवळून म्हटले आहे. संत एकनाथांनी तर भर दुपारी नदीच्या वाळवंटात रडत असलेल्या अस्पृश्याच्या मुलाला कडेवर घेऊन महारवाड्यात पोहोचविले. ही एक धाडसी कृती म्हणावी लागेल. संत एकनाथानी संस्कृतचे स्तोम माजविलेले पाहून 'वेद वाणी देवेकेली एरकाय चोरापासून आली' असा सवाल केला. संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांची समाजाकडून केलेल्या अन्यायाबद्दल त्यांनी

ईश्वराजवळ काहीच न मागता 'दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्य पाहो । जो ते वांच्छिल तो ते लाहो । प्राणिजात ।।' हे विश्वकल्याणाचे नम्रपणे मागणे मागितले. त्यांनी मराठीमध्ये ज्ञानेश्वरी लिहून जनसामान्यांना उपलब्ध केली. संत चोखोबा, सोयराबाई, संत गाडगेबाबा यानीही उच्चनीचतेचा निषेधच केला आहे. महात्मा फुले यानी आपल्या 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकात जातिभेदाचा धिक्कार केला आहे. धनंजय कीर आणि स. गं. मालशे यांच्या मते हा ग्रंथ म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा एक जाहीरनामाच आहे. तो विश्वकुटुंब वादाचा गाभाच आहे. मानवी समानता ही मूल्ये या ग्रंथाची मूलाधार प्रेरणा आहे. समान दर्जा, समान हक्क, समान संधी यासाठी मूळ सत्यशोधक प्रवाह निर्माण झाला होता. मालकाला, यजमानाला शूद्र समजून त्याला नीच, अस्पृश्य मानण्याचा प्रघात उत्तर पेशवाईत वाढला. दक्षिणा, दान-देणगी मात्र शूद्र नव्हती. संस्कार लोप होऊन चुकला. राजर्षी शाहूमहाराजांनी छत्रपती शिवाजी, प्रतापसिंह यांच्यापासून चाललेल्या वेदोक्त प्रकरणाचा शेवट एकदाच केला. क्षात्रजगत् गुरुनामक नवे पुरोगामी पीठ तयार केले. लो. टिळक, विजापूरकर, भाऊशास्त्री लेले वगैरेंनी कडवा विरोध केला. श्री शाहूमहाराज यांनी नाईलाजाने यात लक्ष घातले. आर्यसमाजाला कोल्हापूरात चांगले स्थान दिले. कारण श्री दयानंदांनी यच्चयावत मनुष्यप्राण्यांना वेदाचा अधिकार खुला केला. इंग्रजी राज्यात मॅक्समुल्लर, विल्सन, जोन्स वगैरे आंग्ल पाश्चात्य पंडितांना वेद व संस्कृत शिकविण्यासाठी पोटार्थी वैदिक पंडित जात असत. त्यांची भाषांतरे जर्मन व इंग्रजी भाषेत झाली पण राजर्षी शाहूमहाराज व त्या अगोदर सयाजी महाराज यांचे वेदोक्त संस्कारहक्क नाकारण्यात आले. त्यामुळे चळवळ भडकली वणव्याप्रमाणे पसरली. याच घणाघाती काळाच्या स्वरुपात प्रामुख्याने आक्षेप घेतले जातात पण याच घणाघाती काळाच्या समयास स. शो. चळवळीचे प्रमुख उद्देश तडीस गेले. ब्राह्मण-अब्राह्मण-हरिजन वगैरे सर्व महाराष्ट्रीय समाजस्तरावर या चळवळीचा धार्मिक-सामाजिक-राजकीय-शैक्षणिक वगैरे दृष्टींनी सर्वांगीण परिणाम होऊन चुकला. चळवळीच्या तात्त्विक यशाचे पुढे प्रत्यक्षात आलेल यश धर्मनिर्णय मंडळाने पुढील प्रसारित केलेल्या प्रमुख ठरावात आढळते. डॉ. आंबेडकर, म. फुले व शाहू महाराज यांनी जी Shock Treatment दिली त्यामुळे सनातनी पंडित (तूर्त तरी) मागे पडले.

जुन्या व सनातनी विचारांचे खंडन कोणी करीत नाही. शास्त्र पंडितांतच सुधारक व परिवर्तनशील नवे पंडित तयार झाले. गोळवलकर गुरुजींनी वर्णधर्माचे नाव काढताच सर्वच वर्गातील विचारवंतांनी त्या विचारावर प्रत्याघात केला.

**आर्थिक राजकीय परिणाम :**

सत्यशोधक समाज निघाल्यानंतर १८७७ सालात मोठा दुष्काळ पडला. त्याची पुनरावृत्तीदेखील झाली. शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी वरिष्ठवर्गीय सावकार व इनामदार यांच्या ताब्यात गेल्या. जे भटभिक्षुक जोशी-कुलकर्णी, वतनदार-पुरोहित होते तेदेखील सावकारी करीत असत व शेतकऱ्याला पिळीत. कुलकर्णी हा तर ग्रामराक्षस होता, त्याला सत्यशोधक चळवळीने खलास केले. शेटजी (भांडवलवाले) भटजी (पाद्री मुल्ला वगैरे) यांच्या वर्चस्ववादाविरुद्ध उठावाचा हा मार्ग पाया होता. म. फुले-लोखंडे-भालेकर 'दीनमित्र' कर्ते पाटील यांचे 'लेखन' पाहिल्यास शेतकरी-मजूर-कामगार व हरिजन यांची दु:खे व द्रारिद्र्य त्यात सांगितले आहे. 'गरिबी हटाव' ही यांचीच पहिली चळवळ. सावकारशाहीचा जुलूम नजरेला यांनीच आणला. या सर्वांतून डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलीफ ॲक्ट (सन १८७९) मंजूर झाला व तब्बल इंग्रजीत शेतकऱ्यांना थोडा प्राथमिक दिलासा मिळाला. सत्यशोधक चळवळ, विद्याप्रसारक चळवळ मूलत: जशी होती तशी ती शेतकरी-कामकरी व मजूर चळवळ होती. शेतकरी-कामकरी ही एक दृष्टी आहे, तत्त्वज्ञान आहे, विचार आहे. या प्रवाहाची बीजे सत्यशोधक चळवळीत दिसतात. 'दीनबंधू सार्वजनिक सभा, शेतकरी सभा, गिरणी कामगार मजूर संघ' यांच्याद्वारे आर्थिक समतेच्या पहिल्या चळवळी करण्यात आल्या, रा. लोखंडे यांच्या साक्षीप्रमाणे पहिल्या फॅक्टरी ॲक्टमध्ये गिरणी कामगारांच्या प्राथमिक मागण्या मंजूर झाल्या. पुढे सक्तीच्या शिक्षणाची मागणी मंजूर झाली. नोकरीत प्रमाण मिळाले. राखीव जागा कौन्सिलात मिळाल्या. आता वटवृक्षवत झालेल्या विविध सहकारी चळवळी सत्यशोधक पुढाऱ्यांनी प्रथम वाढविल्या. परिणामांच्या दृष्टीने संकलन करावयाचे झाल्यास ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या शब्दात करता येते बहुजनसमाजावर हिंदूंच्या ब्राह्मणी परंपरेने जे युगानुयुगे वर्चस्व गाजविले आणि खालच्या समाजाला अज्ञात, दारिद्र्य, भोळेपणा, मागासलेपणा, अस्वच्छता, मालिन्य, मनोदौर्बल्य आणि हताश वृत्ती यांचेच भागीदार राहू दिले तिच्याविरुध्द बंड करणारी प्रवृत्ती सत्यशोधक समाजाच्या रूपाने जागी झाली.

शेतकऱ्यांचे, कारागीर वर्गाचे आणि कामगार वर्गाचे दीर्घकालीन आर्थिक शोषण ही गोष्ट या असंतोषाच्या मुळाशी होती. हिंदू धर्माच्या परंपरेवर बौद्धिक आक्रमण करणारी वैचारिक जाणीव या चळवळीत होती. सत्यशोधक समाजामुळे शेतकरी, कामकरी यांच्या जीवनविषयक लढ्याला आकार प्राप्त झाला. अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराच्या चळवळीला दक्षिण हिंदुस्थानात ब्राह्मणेतर चळवळीमुळेच काही बळ चढले. सरकार संस्थेतील ब्राह्मणी वर्चस्व आणि समाजातील सर्व महत्त्वाच्या व्यवहारातील ब्राह्मणी नेतृत्त्व या गोष्टींच्या विरुद्ध एक प्रकारचा वर्गविग्रहच या चळवळीने निर्माण केला. ('वेदिक संस्कृतीचा विकास' पृष्ठे २३५/२३६)

पिळवणूक व वर्चस्ववाद आणि वतनदारी कोणाचीही असो ती यापुढे नाहीशी करणे हेच खऱ्या सत्यशोधकाचे कर्तव्य आहे.

भारत देश हा खेड्यांचा देश असून देशात ७० टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. म्हणून या देशास शेतीप्रधान देश आणि देशातील समाजास शेतीप्रधान समाज असे म्हणतात. परंतु गेली शेकडो वर्षे शेती, शेतकरी आणि शेती व्यवसायाशी संबंधित पशुसंवर्धन, वनसंवर्धन, पाणीपुरवठा, तळी, नद्या, नाले, खते, बि-बियाणी, कीटकनाशके, शेतीपूरक उद्योगधंदे आणि विज्ञानाचा व आधुनिक अवजारांचा व तंत्राचा शेतीमध्ये वापर या मूलभूत प्रश्नांकडे राजकर्त्यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे शेती हा तोट्यात चालणारा धंदा ठरला. स्वातंत्र्य मिळून ५२ वर्षे लोटली तरी यामध्ये फारसा फरक पडलेला नाही. खरे पाहता जगातील सुधारलेल्या शेती क्षेत्रात आज ज्या सुधारणा आढळतात त्या बहुतेक सर्व सुधारणा म. फुले यांनी १००-१२५ वर्षांपूवी सांगून ठेवल्या आहेत. त्या अमलात आल्या असत्या तर बहुसंख्य शेतकऱ्यांची आज जी दैना झालेली आपण पाहतो ती पाहावी लागली नसती. म. फुले यांनी लिहिलेल्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या पुस्तकात या सुधारणा समाविष्ट आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे :

(१) शेतकऱ्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, त्यांच्यासाठी वसतिगृहाची सोय करावी.

(२) शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलांना विलायतेतील शेतकी शाळा स्वखर्चाने दाखवून आणाव्यात.

(३) नवीन धर्तीची उपकरणे वापरायची शेतकऱ्यांना सवय होईपर्यंत त्यांना शिक्षण द्यावे.

(४) श्रावणमासात शेतकऱ्यांसाठी प्रदर्शने भरावावीत, जो शेतकरी उत्तम पीक काढील त्याला त्याच्या नांगरणीच्या उत्तम कलेबाबत व उत्तम पीक काढल्या-बद्दल बक्षिसे द्यावीत.

(५) जे शेतकरी सरकारी मार्गदर्शनाशिवाय किंवा मदतीशिवाय स्वत: विहीर खणतील त्यांना उत्तेजनार्थ योग्य ती बक्षिसे द्यावित.

(६) शेतकऱ्यांना शेतीविषयक ज्ञान देणारी पुस्तके द्यावित.

(७) जेव्हा जेव्हा पाऊस अवेळी पडतो, तेव्हा तेव्हा पाणी शेतामध्ये मुरवून टाकले पाहिजे आणि पाट काढून ते नदीला मिळविले पाहिजेत. म्हणजे जमीन धुवून जाणार नाही.

(८) तळी आणि नदीतील गाळ शेतकऱ्यांना विनामूल्य द्यावा.

(९) सरपणाला पाला-पाचोळा द्यावा; पण वृक्ष तोडू देऊ नयेत.

(१०) नवीन शेळ्यामेंढ्यांची उपज करण्यासाठी चांगल्या जातीच्या शेळ्या परदेशातून आणून शेतकऱ्यांना द्याव्यात, म्हणजे लोकरीचा पुरवठा होईल आणि लेंड्यांचा शेतीसाठी उपयोग होईल.

(११) सरकारने शांततेच्या काळात गोरे आणि काळे सैन्य व पोलिसदल कामास लावून नदीवर धरणे बांधावीत.

(१२) नदीचे पाणी विहिरीतून साठवून ते फळबागांसाठी काढलेल्या कालव्याचे पाणी शेतकऱ्यांना वेळेवर मिळावे.

(१३) गोहत्याला कायद्याने बंदी करावी. म्हणजे शेतकऱ्यांना शेतीसाठी बैलांचा पुरवठा होईल.

**म. फुले शेतकऱ्यांचे कैवारी :**

म. फुल्यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय दृष्टिकोनातून शेतकऱ्यांच्या जीवनाच्या सर्वांगीण बाबीचे सूक्ष्म निरीक्षण केले व नेमके काय करावयास पाहिजे याविषयी मौलिक सूचना दिल्या आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

(१) शेतीवर वाजवी कर बसवावा.

(२) शेतकऱ्याने नीतीने वागावे. जे अनीतीने वागतात त्यांना सरकारने शिक्षा करावी.

(३) शेतकऱ्यांनी एकापेक्षा अधिक लग्ने करु नयेत. मुलांची लग्ने बालपणी करु नयेत.

(४) शेतकऱ्याला कर्जमुक्त करावे.

(५) पोलिसांनी रात्रीचे वेळी शेतीचे चोरीचिलटापासून व डुक्करादी प्राण्यापासून संरक्षण करावे म्हणजे शेतकऱ्यांना रात्री भरपूर विश्रांती व झोप मिळेल.

(६) भाजीपाला विक्रीच्या व्यवहारात अडत्याकडून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये.

(७) जे व्यापारी भेसळीचे जिन्नस विकतात अगर खोटी वजनेमापे वापरतात त्यांच्यावर सरकारने पाळत ठेवावी.

(८) दारु पिण्याऱ्या पोलीस पाटलावर देखरेख असावी.

(९) कनिष्ठ वर्गातील शिकलेल्या लोकांना मामलेदारसारख्या अधिकाऱ्यांच्या जागा द्याव्यात. त्यातूनच शेतकऱ्यांचे हितकर्ते निर्माण होतील.

(१०) शेतकऱ्यांच्याकडून वसूल केलेला कर त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करावा.

(११) कोल्हाटणी, मुरळ्या व तमासगीर यांना अश्लील गीते म्हणण्यास बंदी घालावी. त्यामुळे शेतकऱ्यांची नवीन पिढी निरोगी, मजबूत व बळकट होईल.

सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी झाली. त्यानंतर २४ सप्टेंबर, १८७३ ते २४ सप्टेंबर १८७५ या दोन वर्षांचा समाजाच्या कामकाजाचा पहिला रिपोर्ट आणि ता. २४ सप्टेंबर १८७५ ते २४ सप्टेंबर १८७६ पावेतोचा एक वर्षांचा रिपोर्ट सत्यशोधक समाजाकडील मॅनेजिंग कमिटीच्या हुकूमावरुन ज्ञानप्रकाश छापखान्यात छापून ता. २० मार्च सन १८७७ इ. रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. हे दोन्ही अहवाल एकत्रच प्रसिद्ध करण्यात आले आहेत. यामध्ये सत्यशोधक समाजाने अहवालसालात केलेली कार्ये आणि विविध ठिकाणच्या सत्यशोधकांनी व हितचिंतकांनी केलेल्या कार्याची नोंद घेण्यात आली आहे. सत्याशोधक समाजाची

मूळ तत्त्वे आणि ध्येयधोरणे विचारात घेऊन ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले आणि आर्थिक व इतर स्वरुपात साहाय्य केले त्यांचेही आभार मानून त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे. ही पद्धत सत्यशोधक समाजाच्या सर्वच अहवालात वापरलेली आढळून येते आणि ती योग्यच आहे.

सत्यशोधक समाजाच्या पहिल्या अहवालात सुरुवातीलाच म्हटले आहे, 'ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादी लोकांच्या दास्यत्वापासून शूद्र लोकांस मुक्त करण्याकरिता मतलबी ग्रंथांच्या आधारे आज हजारो वर्षे ते शूद्र लोकांस नीच मानून गफलतीने लुटीत आले आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यास त्यांचे वास्तविक अधिकार समजून देण्याकरिता म्हणजे धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांच्या बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून त्यांना मुक्त करण्याकरिता काही सुज्ञ मंडळींनी हा समाज तारीख २४ सप्टेंबर सन १८७३ इसवी सन रोजी स्थापन केला. या समाजात राजकीय विषयांवर बोलणे अजिबात वर्ज्य आहे'. यावरुन समाजाची सुरुवातीची मूळ भूमिका अधिक स्पष्ट होते. या धोरणास अनुसरून ज्यांनी ज्यांनी सक्रिय सहभाग दिला त्यांची प्रसिद्ध झालेल्या अहवालात नोंद घेण्यात आली आहे. अशा कार्याचे स्वरूप प्रामुख्याने खालीलप्रमाणे आढळून येते.

(१) पुरोहिताशिवाय सत्यशोधक समाजाने केलेली लग्ने व त्यासाठी केलेली मदत.
(२) मुलींना विद्येची गोडी लागावी म्हणून दिलेली बक्षिसे व कपडेलत्ते.
(३) ब्राह्मणाशिवाय केलेले धार्मिक विधी उदा. दशपिंड, उत्तरकार्य, वास्तुशांती इ.
(४) अनाथ, पंगू, अंध, थोटे, लुळे इत्यादींना केलेली मदत.
(५) शूद्र-अतिशूद्र समाजातील मॅट्रीक्युलेट परीक्षा पास होणाऱ्या मुला-मुलींना सोन्याचे पदक देणे.
(६) सत्यशोधकांनी घरोघरी जाऊन किंवा छोट्या मोठ्या संभाषणातून दिलेली शिकवण.
(७) गरीब व गरजू मुला-मुलींना स्कॉलरशिप्स देणे.
(८) देशात जलप्रलय किंवा दुष्काळामुळे आपदग्रस्त ठरलेल्या लोकांना समाजामार्फत रोख, वस्तू, अन्नधान्य व इतर स्वरुपात मदत करणे.

(९) शिक्षण, शेती सुधारणा व इतर सामाजिक सुधारणा या विषयावर पुस्तके लिहिणाऱ्यांना उत्तेजन देणे, बक्षिस देणे.

(१०) शूद्र-अतिशूद्र मुला-मुलींसाठी दिवसाच्या व रात्रीच्या शाळा सुरु करणे.

(११) मागास लोकांत विद्येची गोडी निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

(१२) इंजिनियरींग व इतर महाविद्यालयात गरिबांच्या मुलांसाठी जागा राखून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे.

(१३) चांगले भाषण करता यावे म्हणून सत्यशोधकांना मार्गदर्शन करणे.

(१४) बाहेरगावच्या शूद्र समाजातील मुला-मुलींसाठी वसतिगृहे सुरु करणे.

(१५) शूद्र समाजातील विद्यार्थ्यांना पाट्या-पुस्तके पुरविणे.

(१६) समाजाने हाती घेतलेली मोठी व महत्त्वाची कामे कशी यशस्वी होतील यावर विचार करुन उपाय ठरविणे.

(१७) समाजाचा जमाखर्च.

(१८) सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण अमलात येण्यासाठी वेळोवेळी केलेले ठराव, नियम व पोटनियम.

(१९) परिषदांच्या स्वागताध्यक्षांची मार्गदर्शनपर भाषणे.

(२०) परिषदांच्या अध्यक्षांची मार्गदर्शनपर भाषणे,

(२१) सत्यशोधक समाज ही एक चळवळ म्हणून उभी राहावी या दृष्टीने केलेला विचार व ठराव.

●●●

# पंचदर्पण

# PANCH DARPAN

**OR**

## USEFUL REGULATIONS OF ALL THE CASTES

Published by
NARAYEN MEGHAJEE LOKHANDEY MALLEY,

INHABITANT OF KANHERSEER, ZILLA POONA,

***Now in Bombay.***

***(Registered under Government of India's Act XXV of 1867)***

*Bombay :*

**PRINTED AT THE ANGLO - VERNACULAR PREES**

**1876.**

**------------**

**(Price Three Annas)**

# पंचदर्पण

अथवा

## सर्व जातींचे उपयोगी पडणारे नियम.

हे पुस्तक

## नारायण मेघाजी लोखंडे माळी राहाणार कव्हेरसर जि. पुणे हल्ली वस्ती मुंबई.

यांनी

**लोकहितार्थ**

**आपले अल्प मतीने रचून तयार केले,**

**ते**

**(हे पुस्तक सन १८६७ चे २५ वे अ‍ॅक्टप्रमाणे नोंदले आहे)**

-----------

मुंबईमध्यें,

अंग्लो-व्हर्न्याक्युलर छापखान्यांत छापून प्रसिध्द केले

------------

सन १८७६.

(किंमत तीन आणे)

## प्रस्तावना

हिंदुस्थानात इंग्रज सरकारचे राज्य स्थापन झाल्यापासून जिकडे तिकडे लोकांमध्ये विद्यावृध्दी व सुधारणा झाल्याची चिन्हे बरीच दिसत आहेत, परंतु सुखांत दु:ख एवढेच समजले पाहिजे की, 'अलीकडेच स्त्रीपुरुषांमध्ये फारच अविचार होत आहे; तो कशामुळे म्हणाल तर ज्ञातींत असावेत तसे मजबूत पंचांचे नियम नसल्यामुळे दिवसेंदिवस स्त्रीपुरुषे बिघडत चालली आहेत. स्त्रिया बेधडक जारकर्म करुन जातीस कलंक लावीत असून तो जारकर्माचा प्रकार शेजारी वगैरे लोकांस माहीत असून उघड करीत नाहीत. त्यामुळे दुसऱ्या नवीन होणारे स्त्रियांस तो कित्ता घेण्यास काडीमात्रही दहशत पडत नाही. याचे कारण ज्ञातींत पंच पक्षपाती असून तशा बदकर्मी अपराध्यास शिक्षा व्हावी तशी मिळत नाही. त्यामुळे एवढा जास्त बदफैलाव होतो व पुन्हा त्यापासून बालहत्या, अब्रूस बट्टा लागणे, एकमेकांत वैमनस्य उत्पन्न होणे आणि जातीस कलंक लागणे इत्यादी फारच अनहिताचे प्रकार होत आहेत; परंतु त्याचा मोड करण्याकरिता जर करितां आमचे देशबंधू आपापले ज्ञातींत सत्यशील पंच निवडतील, आणि त्यायोगे आपला नि:पक्षपातीपणाचा बाणा दाखवून कोणीही फिर्याद केली की, अमुक ठिकाणी  गैरवर्तणूक होत आहे व त्यापासून जातीस मोठाच बट्टा लागणार आहे तर त्यांनी ताबडतोब गुप्तपणे टेहेळणी करुन सर्वांचे खात्रीस पटेल त्याप्रमाणे बंदोबस्त करावा आणि त्या अविचारी कुळांचा एकदम ऱ्हास करुन टाकावा. नाहीपेक्षा हल्ली जो जारकर्माचा फैलाव होत चालला आहे, तो अधिक वाढून त्याचा मोड कधीही होणार नाही, कारण कित्येक ज्ञातीमध्ये असेही काही हट्टवादी आणि दुराग्रही लोक आहेत की, अशा अविचारी लोकांपासून थोडासा खाऊ मिळाला म्हणजे पुरे, मग त्यापासून आपले ज्ञातीची अपकीर्ती होवो अगर त्यास कोणी काही दूषणे दिली तरी त्याकडेस मुळीच पाहात नाहीत हे त्यांस मोठेच लाजिरवाणे आहे. सबब माझे प्रियकर बंधूनो ! ह्या पुस्तकात जे काही नियम दाखविले आहेत त्याप्रमाणे आपण वागण्याचा कित्ता घ्याल तर तुमची जगांत कीर्ती राहून जातीत ह्या पुढे होणारे सुखाचा व सदाचरणाचा हिस्सा तुम्हांस मिळून आपला उर्जितकाळ होईल.

## पंचदर्पण-मनोगत

पंचदर्पण हे रा. लोखंडे यांचे पहिले छोटे पुस्तक आहे. ते सन १८७६ मध्ये प्रकाशित झाले. सत्यशोधक समाजाचा मुख्य हेतू सामाजिक सुधारणा हा आहे. त्यास अनुसरुन त्यांनी ही पुस्तिका अतिशय सोप्या, ओघवती अशा लोकभाषेत लिहिलेली आहे. यामध्ये प्रथम जातीच्या आदर्श नियमनासाठी ९ नियम तपशीलवार असे सांगितले आहेत. त्यामध्ये स्त्री शिक्षण, लग्नाचे वय, पुनर्विवाह, विधवा विवाह, लग्नातली उधळपट्टी, व्यसने, घटस्फोट, सहकार, बचत यासंबंधीचे विचार परिणामकारकरीत्या मांडलेले आहेत. पुरुष पहिल्या पत्नीच्या निधनानंतर जर दुसरे लग्न करू शकतो तर विधवा स्त्रीलासुध्दा दुसरे लग्न करता आले पाहिजे. ब्राह्मणात तशी सोय नसते. हे अत्यंत चुकीचे आहे. तरुण विधवांनी वाट चुकू नये म्हणून त्यांना पुनर्विवाहाची परवानगी असली पाहिजे असे ते आवर्जून सांगतात.

त्यांनी सांगितलेले नऊ नियम आजही सर्वांनाच मार्गदर्शक असेच आहेत. यानंतर त्यांनी मारवाडी आणि व्यापारी यांच्याकडून आर्थिक अडचणीत असलेल्या गरिबांना कसे नागविले जाते आणि त्यांना जीवनातून कसे उठविले जाते यासंबंधी निवेदन करुन त्यावर उपायही सुचविले आहेत. मारवाडी आणि सावकारी करणारे व्यापारी गरिबांना नडल्या वेळी दिलेले कर्ज चौपट करतात. अज्ञानामुळे गरिबांना हे कळत नाही. कळले तरी ते अडचणीत असल्याने काही बोलू शकत नाहीत. अशा परिस्थितीत मारवाडी व सावकारी करणारे व्यापारी अशा परिस्थितीचा गैरफायदा घेतात. एकाची चौपट केलेली रक्कम परतफेडीसाठी हे लोक निर्दयपणे घरादाराची लूट करतात आणि त्यांना जीवनातून उठवतात. अशा परिस्थितीत एखाद्या गरिबाला पैशाची अत्यंत गरज पडली तर त्याने आपल्या ज्ञातीचे सरपंचाकडे जाऊन आपली अडचण सांगावी. त्याने रास्त व्याजाने आपल्या ज्ञातीच्या फंडातून किंवा व्यापाऱ्याकडून पैसा देण्यास सांगावे. अशा सहकाराच्या मार्गांनी गरिबांनी आपल्या अडचणी सोडवून घेण्याचा प्रयत्न करावा असा उपदेश केला आहे.

सन १८८७-८०..... यादरम्यान मुंबईत गिरणी उद्योगात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्या दरम्यात पश्चिम महाराष्ट्र आणि कोंकण भागातून हजारो तरुण रोजगारासाठी मुंबईस गेले. विवाहित तरुणांच्या पत्नी मात्र त्यांच्या मूळ गावीच

असत. त्यामुळे या तरुणांना कौटुंबिक सुख मिळणे कठीण झाले. अशा परिस्थितीत मुंबईस गेलेले तरुण आणि गावी असलेल्या त्यांच्या बायका यांच्यामध्ये व्याभिचार माजू लागला. तो एक चिंतेचा विषय होऊन बसल्याने रा. लोखंडे सांगतात. त्यावर उपाय म्हणजे व्याभिचार करणाऱ्यास अपंगत म्हणजे ज्ञातीबाहेत टाकावे किंवा त्याने केलेल्या व्याभिचाराचे स्वरुप विचारात घेऊन त्यास रु. १०० पासून ते रु. ५०० पर्यंतचा दंड करावा. मात्र त्यास परत ज्ञातीत घ्यावयाची तरतूद ठेवावी. स्त्रियांच्या बाबतीत मात्र ते कठोरपणे लिहितात, एखाद्या स्त्रीने अन्य जातीतील एक किंवा अनेक परपुरुषाशी आपला व्याभिचार ठेवला असेल तर अशा स्त्रियांचा घटस्फोट घडवून आणावा असा त्यांनी सल्ला दिला आहे. हा सल्ला जर विचारात घेतला तर पुरुषांना त्यांनी थोडे झुकते माप दिल्याचे जाणवते. स्त्रीपुरुष समानता हे सत्यशोधक समाजाने तत्त्व आहे त्यास यामुळे बाधा पोचते असे म्हणावे लागेल. अर्थात रा. लोखंडे यांच्या विचारसरणीत पुढे बदल होणे स्वाभाविक होते.

एकंदरीत समाजस्वास्थ्य, नैतिकता या दृष्टीने लोखंडे यांनी या पुस्तिकेत मांडलेले विचार खचितच मार्गदर्शक आणि आदर्श असेच आहेत हे स्पष्ट होते.

संपादक

## पंचदर्पण

प्रत्येक मनुष्यास आपणास सुख व्हावे अशी इच्छा असते व त्याचा कल ते प्राप्त करुन घेण्याकडे फार असतो. जेणेकरुन आपण सुखी होऊ ते करण्याकरिता आपल्या समजुतीप्रमाणे जेथपर्यंत होईल तेथपर्यंत झटत असतो. जे ज्ञानी बुद्धिवान व सुशिक्षित आहेत ते आपला निर्वाह करुन देशहिताकरिता आणि लोककल्याणा-करिता प्रयत्न करीतात. त्याप्रमाणे असेही कित्येक पुरुष आहेत की, या सृष्टीतील सर्व पदार्थ तुच्छवत मानून आपला काळ ईश्वर सेवनाकडेस आणि परमार्थाकडेस लावतात. आता मनुष्याच्या सुखाकरिता राज्याची व्यवस्था असणे फार अवश्य आहे. त्याचे संपत्तीस, शरीरास आणि मनास कोणापासून इजा न होईल असा योग्य बंदोबस्त असला पाहिजे. रीतीभाती व वागण्याचे प्रकार परिणाम शुध्द असले पाहिजेत. आणि मनुष्यास दु:ख होण्यास मुख्य जे मूळ कारण अज्ञान ते कमी होण्यास स्त्री पुरुषास विद्या असणे जरुर आहे.

आता वरील गोष्टी पृथ्वीमध्ये कोणत्याही स्थलांतर, कोणत्याही काळी ईश्वराने तयार करुन ठेवल्याचे आढळत नाही; या सर्व मनुष्याचे बुद्धिबलानेच झाल्या पाहिजेत. बुद्धीचे बलेकरुन जितक्या कृती होतात त्या बहुधा अपुरत्या होतात व त्या अशा प्रकारच्या होत नाहीत की, त्या सदासर्वकाळ राहून सर्व काही व प्रसंगी सफळ होतील. त्यांस पूर्णतेस आणण्याची आवश्यकता असते.

सृष्टीमध्ये कोणतीही वस्तू अगर युक्ती किंवा सुधारणा मनुष्याने केलेली असो ती कनिष्ठ स्थितीपासून चांगल्या स्थितीपर्यंत आल्यावाचून राहाणार नाही. पुन: जी वस्तू अगर सुधारणा आज आपणास पूर्ण दशेप्रत आलेली आहे असे दिसते तीच काही काळाने अधिक चांगली होते, असे जे या गोष्टीमध्ये रुपांतर होते त्यास सुधारणा झाली असे म्हणावे. नाही तर आज या हिंदुस्थान देशामध्ये अनेक जातिभेद असून त्या त्या जातीमध्ये अनेक तऱ्हेचे लोक बुद्धिवान आहेत. परंतु या दुनियेमध्ये चार दिवस सुखाने व सन्मानाने घालविण्याची इच्छा असणाऱ्यांच्या ठायी, जे जनप्रचार किंवा ज्या लोकरीती चालू असतात त्या सर्वांचे व्यवहारीक ज्ञान असणे अगदी अवश्य आहे ; आणि ते नसल्यामुळे निरूपयोगी ठरतात असेही जरी नाही, तर प्रपंच सुज्ञ लोक ज्या मानाने सर्व प्रकारचे ऐहिक सुखोपभोग घेऊ शकतील

त्याहून कमी मानानेदेखील ते त्यास साध्य होत नसतात, इतकेच केवळ नाही, तर ज्यास सहा शस्त्रे, अठरा पुराणे केवळ करतळा मळवत् भासतात, अशासही जर एक व्यवहारज्ञान नसले तर त्यास लोक चित्राप्रमाणे समजतात. मग त्यांच्या विद्येचा आणि ज्ञानाचा काय उपयोग होत असेल हे सहजच लक्षात येत जाते. आता ते ज्ञान कोणत्याही विद्येच्या योगे प्राप्त होत नाही. त उपजत अंगस्वभावाप्रमाणेच मनुष्यास अंगचेच असून, वयपरत्वे आणि विद्याव्यासंगे करुन अधिक उणे मात्र झालेले आढळतात. आता यावर कोणी आमचे नवीन शिकलेले अशी कल्पना करतील की, विद्या, लौकिक, संपत्ती संपादून सुखी होण्यास अलीकडचे लोक काय कमी समजता ? त्यास इतकेच सांगणे आहे की, पशु पक्षांस न शिकविताही उपजतच आपापल्या स्वहिताविषयी ज्ञान असतेच. पोटात दुखू लागले तर कोणत्या वनस्पतीचा उपयोग करावा हे समजणे त्यास स्वाभाविकच ज्ञान असते. मग मानवी प्राण्यांनी विद्या, लौकिक आणि संपत्ती संपादली ती उणी नसल्यास नवल कोणते ? पण सार्वजनिक हित आणि तारतम्य विचार व लोक प्रियपणा जोडून जगामध्ये आणि ज्यांनी त्यांनी आपापले ज्ञातीमध्ये सुधारणा आणि आपले ज्ञातीची कीर्ती होण्याची साधने करुन जगामध्ये बरे म्हणून घेण्याची टूक आणि खुबी राखणे ही गोष्ट आज आपणा सर्वत्रास योग्य आहे.

माझे मित्रहो, आज हा एवढा विषय काढण्यास आणि त्याची विल्हेवारी करण्यास आज आपले देशामध्ये त्यात मुख्य मुंबई, पुणे, ठाणे वगैरे अनेक शहरी हिंदू जातीचा म्हणजे सोनार, शिंपी, माळी, भंडारी, कुंणबी, धनगर, लोहार, परभू, सुतार, कासार वाणी आणि ब्राह्मण इत्यादी पुष्कळच लोकांचा भरणा आहे; परंतु त्या त्या जातीमध्ये असे काही चांगले मजबूत नियम आणि सुधारणा झालेली नाही की, जेणेकरुन आपले जातीधर्मातील लोक एक विचाराने एका सल्याने वागतील, ज्या त्या जातीमध्ये फुटाफूट होऊन तट आणि त्याचे भाग निराळे झालेले असतात आणि त्याच योगेकरुन जातीमध्ये कलह उत्पन्न होऊन क्षुल्लक कारणाकरितां शेकडो रुपयांची भरती सरकारची करतात. तसेच जातीमध्ये नियम नसल्यामुळे स्त्री पुरुषामध्ये व्यभिचार निघाल्यामुळे आपले संसार सुखास आणि पुढील अक्षयी होणारे सुखास अंतरतात. जातीमध्ये नियम नसल्यामुळे लोकोपयोगी आणि धर्मार्थ कृत्ये करण्याचा प्रसंग आला असता सिध्दीस जात नाही. त्यामुळे आपले जातीची कीर्ती आणि जातीस सुख मिळण्याचे

एकीकडेस राहून नेहमी लोक दु:खी आणि एकमेकांचा द्वेष करणारे होतात. याकरितां आपले जातीमध्ये असे काही नियम असावेत की, आपले देशात सर्व काही लोकांमध्ये एकोपा होऊन व्यवहार संबंधही आपापले जातीमध्येच होऊन आपले जातीचे लोक सुखी होतील याचा विचार करणे आपणा सर्वत्रास योग्य असून त्याप्रमाणे कोणी एखादा सुमार्ग काढण्यास लागला असता त्यात असे काही जातीचे लोक अज्ञान असतात की, त्या मार्ग काढणाऱ्या वाटाड्या गृहस्थास खाड्यात टाकतात, तर माझे प्रियकर हो मी माझे समजुतीप्रमाणे आपले जातीमध्ये नियम लिहून कळविले आणि तसे नियम हल्ली कित्येक ठिकाणी चालू नसल्या कारणाने ज्या काही गरीब लोकांचे नुकसान होऊन त्या---- सुखास मुकतात. त्यांची मला फारच दया येऊन माझे प्रियकर बंधूस खालील नियम आपापले जातीत सुरू करण्याविषयी विनंतीपूर्वक सादर करुन माझे प्रियकर देशबंधू ह्या नियमास अनुसरुन जातीत वागू लागतील आणि त्यापासून आपणा सर्वत्रांस काय लाभ होईल याचा अनुभव घेतील अशी मी आशा करीत आहे. नाही तर श्रीधर स्वामी यांचे ओवीत सांगितल्याप्रमाणे करण्याची वेळ आणू नका.

"नित्य दुग्धे न्हाणीला वायस, परी तो कदा न होय राजहंस ।।
दह्या माजी कोळसा बहुवस, घालितां उजळ नव्हेची ।। १ ।।
की शर्करे माजी नेऊन, कडू दुधिया ठेविला बहुदिन ।।
परी त्याचे अंतर पूर्ण, गोड नव्हे अनु मात्र ।। २ ।।

## नियम पहिला

प्रत्येक जातबांधवांनी आपापले जातीमध्ये दहापासून बारापर्यंत निवडक नि:पक्षपाती पंच, जातीत एक सभा भरवून निवडून काढावेत आणि त्या पंचांची नेमणूक तीन महिने अगर सहा महिनेपर्यंत असावी, अथवा ज्या कोणाची मर्जी जास्त दिवसपर्यंत राहण्याची असेल त्याप्रमाणे त्यास ठेवून आणि ज्यांची मर्जी नसेल त्यांचे जागी चांगले निवडक पूर्ववतप्रमाणे पंच नेमावे. आणि त्याचप्रमाणे चिटणिस वगैरे असावेत आणि प्रथमत: कोणतेही कारणाने जातीची सभा फिर्यादी तर्फेने भरविली असेल त्यावेळी वादी प्रतिवादी यास पंचासमोर उभे करुन आपले धर्म शास्त्र हातात देऊन शपथ घेण्यास सांगावी. नंतर त्याची जी काही हकीगत असेल ती कोणी पंचाने

अगर चिटणीसाने लिहून घ्यावी आणि त्याची सहीही घ्यावी, त्याचप्रमाणे प्रतिवादी याचीही जबानी लिहून पुराव्याकरिता साक्षीदार आले असतील. त्यांच्या अनुक्रमाने जबान्या लिहून घेऊन पंचांस सर्व वाचून दाखवावे. नंतर त्यात जरकरिता काही शंका पंचास येईल त्याचा खुलासा करण्यास पुन: सदर इसमास शंका टाळीव व जो काही इन्साफ करणे असेल तो लिहून सर्वांस सांगावे आणि ज्याप्रमाणे ठराव पंचांचा झाला असेल त्याप्रमाणे ज्या कोणास आपंगत अगर दंड केले आहे अशांबद्दल जातबांधव असतील त्या सर्वांस लेखी पत्राने त्याचे वाईट कृतीवरुन अगर वाईट चालचलणुकीवरुन किंवा काही कारणांवरुन त्यास आपंगत केले तो सर्व खुलासा लिहून त्याच दिवशी पाठवावे; आणि आपापले जातीमध्ये एकोपा असण्याबद्दल प्रथमत: सर्वांचे अनुरोधाने एका स्टँप कागदावर करारपत्र लिहून ठेवावे की, जेणेकरुन आपले जातीमध्ये दुफळी न होता पंच करतील ते प्रमाण असे सिध्द झाले पाहिजे. त्याचप्रमाणे सभेत मादक पदार्थ सेवन करून येण्याची बंदी असावी कारण त्यापासून पुष्कळच अनर्थ घडून येण्याचा संभव आहे.

टीका-जातीत नि:पक्षपाती पंच असल्याने हजारो रीतीचे फायदे होतील हे उघडच आहे. जातीसंबंधी तंटे जे होतात त्या तंट्यापासून कित्येक जातबांधवांचे हजारो रुपयांचे नुकसान सरकारात जाताना होते, ते न होता आपसात क्षुल्लक कारणाने बोलाचाली अगर मारामारी आणि एकमेकांमध्ये वैमनस्य होते. तो प्रकार न घडून येण्याचा बंदोबस्त होऊन आपले जातबंधू सुखी राहून त्यांचे जमातीची कीर्ती होण्याचा संभव आहे.

## नियम दुसरा

जमातीमध्ये पैसा कोणत्या रीतीने जमा व्हावा म्हणून सर्व जातबांधवाने मिळून प्रत्येक लग्नावर अगर कोणतेही खुषीने कार्यांवर कर ठेवावा की, जेणेकरुन कोणासही तो कर देण्यास हरकत पडू नये. त्याचप्रमाणे आपले जातीचा उर्जितकाळ आणि भरभराटी आणण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनी दरवर्षी जमातीचे फंडात पैसा जमा करावा.

टीका-जातीचे फंडांत अवश्य पैसा असला पाहिजे, कारण कोणते वेळेस असा काही प्रसंग येऊन जातो की, अनाथ प्रेते आणि निराश्रित मुले की, ज्यास कोणाचा

आसरा नाही तशास मदत करण्याकरिता पैसा नसल्यामुळे आपले जातीचा दुर्लौकिक होतो तसेच एखाद्या स्त्रीचा पहिला नवरा मरण पावून दुसरा नवरा करते त्यावेळी त्या स्त्रीस एखादे मूलबाळ असले म्हणजे तो नवीन केलेला नवरा सद्‌गुणी असला तर मुलाचे चांगले पालनपोषण करतो, नाही तर त्याचे फारच हाल होऊन दु:ख सागरात पडावे लागते. तसेच विद्यावृद्धी आणि जातीची चांगल्या प्रकारे सुधारणा करणे हे जातीचे फंडास पैसा असल्यापासून होण्याचा संभव आहे व त्यात आणखी हित होण्याचाही उपाय आहे की, आपले देशबंधू प्रत्येक जातीमध्ये ज्यांनी त्यांनी एक अशी मंडळे स्थापन करुन त्या मंडळीने वर्गणी करावी अगर फंडातील पैशाने व्यापार करण्यास धजावे की, जी वस्तू आपणा जातीबांधवांस म्हणा अगर दुसरे बाहेर गावी व्यापारी लोक अजाण मनुष्यांना ठकवून पाहिजे त्या रीतीचा भाव घेतात. त्याचप्रमाणे सुजाण मनुष्यासही व्यापारी लोक ठकविल्याशिवाय राहात नाहीत याकरिता प्रत्येक ज्ञाती गृहस्थाने विचार करुन अवश्य लागणारे जिन्नसेचा व्यापार काढण्याची त्वरा करुन परके देशबंधूचे घरात जो पैसा जातो तो न जाता आपला उर्जितकाळ येण्यास हा सुलभ मार्ग आहे; पाहा आज आपले देशात परद्विपस्थ लोकांचा व्यापार चालू असल्यामुळे किती आपले तोटे होतात आणि आपण दीनवाणे त्यांचे तोंडाकडे पाहात बसतो. ते लोक मातीचे सोने करुन आपणा सर्वांचे देखत अर्पण करुन आपला खरोखर सुवर्णरुपी पैसा घेऊन जातात. म्हणून त्याकडे आपण अगदी विशेष लक्ष पुरविले पाहिजे.

## नियम तिसरा

जातीचा पैसा सुरक्षित राहावा व कोणते रीतीने जमातीमध्ये पैसा फंडात जमा झाला आणि कोणत्या कार्याकडे खर्च झाला त्याचा हिशेब ठेवण्याकरिता सर्व जाती गृहस्थांनी मिळून हुशार व दक्ष अशा गृहस्थाची नेमणूक करावी आणि हिशेब बरोबर ठेविला किंवा नाही याची तपासणी पंचांनी दरमहा करीत जावी.

टीकाऱ्या नियमांत दर्शविल्याप्रमाणे जातीचे पैशाचा हिशेब ठेविला असता जातीचे पैसे गैरमार्गी न जाता उत्तम कार्याकडेस लागून जातीची कीर्ती होईल. तसेच कोणते कार्याकडेस खर्च केला आणि कोणते कार्याकडून जमातीचे फंडांत पैसा आला हे सर्व तिमाही किंवा सहामाही वर्तमानपत्रद्वारे प्रसिद्ध करावे अथवा ज्यावेळी

जातीची पंचाईत अगर सभा होईल त्यावेळी सर्व प्रगट करुन जातीचे पंचाने सुविचाराने पैसा व्यय केला तो आणि न्यायाचे शैलीने जमातीत पैसा कोणत्या प्रकारे जमा केला तो सर्व खुलासा सर्वांचे ध्यानात येईल. कारण हल्ली कित्येक ज्ञातीत असा काही प्रकार आहे की, ज्या वेळेस जमातीत आलेला पैसा त्यावेळेसच मद्य प्राशनाकडेस अगर मिठाईकडेस खर्चास लावतात व कित्येक ज्ञातीत पैसा सुरक्षित ठेवतात; पण ज्या मनुष्याजवळ पैसा ठेवण्यास दिला असेल त्यास दुसरे लोक मदत होऊन खर्चाचे यादीत जेथे एक रुपया खर्च झाला असेल तेथे ५ रुपयांचा खर्च दाखवून ज्ञातीचे पैशाची अफरातफर करुन जमा आणि खर्च बरोबर करतात. हा सर्व प्रकार ज्ञातबांधवांस केव्हा माहीत पडतो तर एखादे धर्मकृत्याचे कामाकडेस कोणी सत्यवादी धजून ज्ञातीची सभा भरवून अमक्या कृत्यास ५०० रुपये किंवा १,००० रुपये पाहिजेत. तेव्हा कित्येक मिलाफी लोक त्या ठेविलेल्या हिशोबास रुकार देऊन शेवटी फंडांत थोडीशी शिल्लक दाखवून ज्ञातीचे पैसे अशाप्रकारे खाऊन जातात; तर माझे प्रियकर देशबांधवांनो जरकरिता वरील सुचविलेला नियम अंमलात आणला तर कधीही असे न होता ज्ञातीची कीर्ती होईल व ज्ञातीत पैसा सुरक्षित राहून एकमेकात वैमनस्य उत्पन्न होण्याचा जो संभव तो दूर राहून निरनिराळे होणारे तट ते बंद होतील. कित्येक ठिकाणी असाही प्रकार घडून येतो की, "ज्याचे हाती ससा तो पारधी" म्हणजे ज्याचेजवळ पैसा ठेवण्यास दिला तोच काही दिवसांनी नाकबूल होतो याकरिता सर्वांचे अनुरोधाने त्याची नोंद करुन घ्यावी हे फार बरे आहे. म्हणजे असा प्रकार होणार नाही आणि यापुढे नवीन होणारे पंचबंधूस तो कित्ता घेण्याची उमेद येईल.

## नियम चौथा

जातीची सभा अगर पंचाईत कोणास भरवावयाची असेल त्या प्रत्येकापासून सभा भरविण्याबद्दल २ रुपयापासून तो पाच रुपयापर्यंत कर द्यावा व कोणा निराश्रितास पंचाईत भरवावयाची असेल त्याजपासून मुळीच काही घेऊ नये. ज्या दिवशी पंचाईत भरवावयाची त्याचे आदले दिवशी पंचांचा + मुकादम असतो त्यास ताकीद देण्यास सर्वत्रास सांगावे. कोणा एकासही पाचारण करण्यास आळस करू नये, तसा आळस झाल्यास त्यास मजुरीबद्दल पैसा न देता त्यांस दंडास पात्र करावे. तसेच त्याचे बोलावण्याप्रमाणे कोणी येण्यास हयगय केल्यास प्रत्येकास १। रुपया दंड ठेवावा.

त्याचप्रमाणे कोणी जातीमध्ये मरण पावला असेल त्याचे प्रेत नेण्यासही सर्वांनी आलेच पाहिजे. मात्र कोणास फारच जरुरीचे काम असल्यास सूचना पाठवावी. नाहीपेक्षा दंडास पात्र करावे.

टीका-विनाकारण वारंवार पंचाइती भरविल्यापासून ज्ञातबांधवांचा वेळ फुकट जाणार याकरिता ज्याची मर्जी सभा भरविण्याची असेल त्याजपासून वर लिहिलेला कर घ्यावा. कर न घेतल्यास वारंवार आणि क्षुल्लक गोष्टीबद्दल पंचांस त्रास देतील. याकरिता तो कर जरूर घेऊन त्याचा व्यय सर्वत्रास पानसुपारी वगैरे होणारे खर्चास लावून बाकी जमातीचे फंडांत पैसा ठेवावा. तसेच कोण जमातीचे दिवशी हजर न झाल्यास त्यापासूनही दंड घ्यावा का तर असे पुष्कळच लोक न आल्याकारणाने पंचांचे काम शेवटास जाणार नाही. याकरीता त्यासही दंडाची आवश्यकता असावी. या प्रमाणेच मुकादमास दंडास का पात्र करावे ? तर याचे कारण फारच विशेष आहे ते असे की, सदरहू ईसमास जातीबद्दल चांगली माहिती असल्यामुळे त्याजला सर्व मिळून असतात; याकरिता कोणी काही मतलबामुळे न येण्याचे प्रयोजन त्यास सांगून येत नाहीत. इत्यादी कारणांचा प्रकार सर्वत्रांस माहीतच आहे. जातीची सभा महिन्यांत एक वेळ किंवा दोन वेळ भरवावी वारंवार भरवू नये. कारण की, तसे केल्याने कित्येक रोजगारी लोकांस फारच अडचण पडते.

## नियम पांचवा

प्रत्येक जातीमध्ये लग्नासंबंधी सुधारणा करणे अगदी जरुन आहे. याचकरिता ह्या नियमाकडेस अगदी मन:पुरस्कर लक्ष देऊन निरर्थक खर्च करण्याकडेच विशेष लक्ष पुरविले पाहिजे. मुलीचे आईबाप प्रथमत: (लग्न करण्याचे वेळी मुलीबद्दल पैसे (देज) पुष्कळच घेण्याची चाल बहुत ठिकाणी आहे. ती अगदी बंद करावी. फक्त ज्याचे पदी फारच गरिबी आणि दरिद्री स्थिती आहे, तशांस मात्र दहा रुपयापासून पंधरा रुपयापर्यंत घेण्याची मोकळीक असावी, ज्याची मध्यम स्थिती आहे त्यांनी मुळीच घेऊ नये, घेतल्यास त्याचे दुप्पट दंड घ्यावा. अगर ज्ञातीभ्रष्ट करावे.

टीका - निरर्थक खर्च जातीत अगर लग्नांत अगदी करु देऊ नये. आमचे देशबंधू येथे शंका आणतील की, आमचे जवळ पैसा असून आम्ही खर्च का करू नये ? माझे प्रियकरहो तुम्हीच विचार करा की, निरर्थक खर्च केल्यापासून काय

फायदा होणार आहे ? तुम्ही समजत असात की, लग्नकार्यात खर्च केला म्हणजे पुण्य घडते ! लोकांत कीर्ती होते ! हे सर्व विचार तुमचे अगदी खोटे आहेत. जरी कीर्ती होते असा समज असला तरी तो क्षणिक आहे. लग्नांत पुष्कळ जरी खर्च केला आणि थोडासा उणेपणा झाला तर त्या सर्वांवर माती पडल्याप्रमाणे होऊन उलटे कर्ज बाजारी होता ! तोच जर पैसा एखादे अनाथ व गरीब ज्ञाती गृहस्थांचे कार्याकडे खर्च केल्यास किती पुण्याई घडेल ! याजविषयी आपले शास्त्रांतही कन्यादान करणे मोठे पुण्य गणले असून आपण जाणुनबुजून व्यर्थ खर्च का करिता ? मुलांचे आईबापांनी आपण जाणुनबुजून व्यर्थ खर्च का करिता ! मुलांच्या आईबापांनी अगर मुलीच्या आईबापानी विनाकारण लग्नाचे कामांत अट न धरिता दोही पक्षी कार्यभाग आटोपता घ्यावा. कित्येक मुलींचे आईबाप हट्ट धरुन निरर्थक अडथळे घालून मुलाच्या बापास विनाकारण खर्चात पाडतात. तर ते सर्व कर्जाचे ओझे आपलेच मुलीच्या डोक्यावर पुढे येणार हे अगदीच लक्षात येत नाही. याकरिता मुलाच्या अगर मुलीच्या आईबापाने सदासर्वकाळ मुलांचे हिताकडेस पाहात असावे. कारण कधी कधी असेही घडून येते की, लहानपणी लग्न करण्यापासून फारच तोटे होतात. आपले ज्ञातीमध्ये मुलगा १८ वर्षात येऊन विद्या आणि लोकव्यवहात याची साधारण माहिती झाल्याखेरीज त्यांचे विवाहाचे भानगडीत पडू नये. त्याचप्रमाणे मुलगीही दहापासून अकरा वर्षाची होऊन तिजला आईबापांकडून सुशिक्षण मिळून आपले संसाराची व्यवस्था करण्यायोगी होण्यापूर्वी लग्नाचे भरीस पडू नये. कारण याजपासून फारच विपरीत गोष्टी घडून येतात. लहानपणी लग्न झाल्यामुळे त्यास मुळीच काही समज नसून मुलास ही बायको मजला नको अगर मुलीस हा नवरा मजला नको असे सांगण्याचे ज्ञान नसते, त्यामुळे पुढे उर्जित काही दोघांमध्ये वैमनस्य येऊन कलह करण्यास लागतात, आणि ती स्त्री दुसरा नवरा करते अगर पुरुषही दुसरी बायको करतो; त्यामुळे संसाराचे फारच नुकसान होते.

कांही अज्ञानी लोकांची अशी समजूत असते की, विद्या शिकविल्यापासून काय लाभ होतो ? जरकरिता विद्या शिकली तरी कोठे असे हुद्दे आम्हांस मिळत आहेत ? तर हा त्यांचा समज खोटा आहे. कारण याजविषयी सज्ञान लोकांचे असे म्हणणे आहे की, "विद्या कौ: काले फलंदायक:" तसेच "कलम बोला मै शहानशहा बडाहूं,

जो लिख सकता उसे सुलतान बनाऊं, अगर कंबख्त् होवे, तोबी एक बख्त् उसे दवलतकी लज्जत कुच चखाऊं."

पाहा बरे विद्येपासून मनुष्यास बरे वाईट समजते आणि विद्येचे फळ एक दिवसही मिळाल्याशिवाय राहणार नाही. विशेष विद्येची जरुरी अशी आहे की, व्यापार संबंधाने जमाखर्च अगर स्मरणार्थ काही टिपण करण्याचे तसेच ह्या जगांत ईश्वराचे सत्यासत्य आणि गुणानुवादाची व त्याचे कीर्तीची जगांत शास्त्रे प्रगट झालेली आहेत ती, आणि वर्तमानपत्राद्वारे जी देशाची सुधारणुकेची कारणे प्रगट होतात ती विद्येपासून समजू लागतात. याकरिता विद्येची जेवढी प्रशंसा करु लागाल तेवढी थोडीच आहे. तसेच स्त्रीशिक्षण देण्यासही अज्ञान लोकांची फारच वाईट समजूत आहे. याकरिता त्यांसही विद्येपासून कसे लाभ होतात हे दर्शविण्यास विलंब लावू नये, आणि त्यांत मुख्य स्त्रियांनी आपल्या पतीची आणि सासुसासरे यांची आज्ञा पाळण्यात नेहमी झटत असावे. आणि आईबापांनी मुलीस स्वयंपाक आणि आपले घरांतील नीट व्यवस्था ठेवण्यास चांगले प्रकारे शिकवावे. नाहीतर अशा काही आमचे देशबंधूंच्या स्त्रिया असतात की, अविचाराने नेहमी कलह करीत असतात तर माझे देश भगिनींनो ! तुझी ही गोष्ट अगदी ध्यानात ठेवा की, तुमचे लग्न झाले म्हणजे पुष्कळ सोशिकपणा धरला पाहिजे ; लग्न म्हणजे कांही गुळखोबरे खाण्याची गोष्ट नाही. तेथे पुष्कळ नम्रपणा धरला पाहिजे. आणखी त्यात मुख्य ध्यानात धरण्यासारखे असे आहे की, कधी कधी तुमच्या मध्ये काही कटकट जर झाली तर कधी त्याविषयी बाहेर बोलू नका. बाहेर बोलले म्हणजे तितकी मनासमोर ती गोष्ट अधिक दिसू लागते ; आणि कदाचित जरी तुम्हाला विसर पडला, तरी तुमच्या सोबतिणीला विसर पडणार नाही. आणि एखादे दिवशी तुमच्या लक्षातसुध्दा ती गोष्ट नसेल त्यावेळी ते वर्म काढून फजिती केल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणून आपले घरांतील गोष्ट बाहेर न काढण्याविषयी आणि त्यांत मुख्य सोशिकपणा धरण्याविषयी स्त्रियांनी ही गोष्ट लक्षात ठेवावी.

माझे देशबंधूनो, याच नियमांत हे मुख्य ध्यानांत ठेवा की, निरर्थक खर्च करण्याची संधी बंदी केली पाहिजे ; लग्न करण्याची इयत्ता कशी असावी म्हणाल तर गरिबांचे लग्न पंचवीस रुपयातसुध्दा होण्याचा योग आपले जातबंधूचे हातात असतो. मात्र जातबंधूने मनावर घेऊन नियम ठरवून कार्यसिध्दी करावी कारण

जातीचे गृहस्थाने अगदी पूर्णपणे मनावर हा नियम घेतल्यास साखरेचे पाणी पिऊन आणि पानाचा विडा घेऊन लग्न साजरे होणार आहे, आणि विनाकारण निरर्थक लोक कर्ज काढून लोकांचे ऋणात पडून आपले घरात चिंता करुन घेतात, तर 'चिताचिंता समानेच बींदुमात्रविशेषत:' -चिता मेलेले मनुष्याचे देहाची रक्षा करिते, आणि चिंता जिवंत असून मनुष्याच्या शरीराची खराबी करिते, याकरिता असा प्रकार नकरिता विनाकारण लोकांचे ऋणी होऊ नका. याजविषयी पूर्णपणे देशबांधवांनी विचार करावा.

## नियम सहावा

प्रत्येक जातीमध्ये पुरुषांकडून किंवा स्त्रियांकडून व्यभिचार होऊ देऊ नये म्हणून फारच जपले पाहिजे आणि अशी सक्त ताकीद आणि हुकूम असावा की, जेणेकरुन तो दुष्ट व्यभिचार विषवत वाटून तशा रस्त्याने पुन्हा दुसरे कोणी जाण्यास धजणार नाहीत. तरी प्रत्येक जातीचे गृहस्थाने व पंचाने त्या लोकांस आपंगत करावे अगर ज्यावेळी जातीत घेणे असेल तेव्हा १०० रुपयापासून ५०० रुपयापर्यंत दंडास पात्र करुन त्यांस शास्त्ररीतीप्रमाणे शुद्ध करण्याची व्यवस्था करावी. आता याहीपेक्षा जास्त कडक ठराव ज्या कित्येक नीच जाती मानल्या आहेत. तशा भिन्न भिन्न लोकांबरोबर स्त्रीचा अगर पुरुषांचा व्यभिचार घडला असेल त्यांस कधीही जातीची पायरी चढू देऊ नये आणि कोणतेही रीतीने अगदीच केव्हाही संबंध ठेवू नये तशा स्त्रियांचे नवऱ्याकडून अगर विधवा असल्यास त्यांचे भाऊबंदाकडून घटस्फोट करवावा आणि त्याचप्रमाणे त्यांचे कोणी साथी अगर मदत असतील त्यांसही वरप्रमाणे करावे; की जेणेकरुन त्यांचा कोणतेही रीतीचा जातीमध्ये हक्क राहणार नाही असे करावे. जाती भ्रष्ट केलेले स्त्रियांचे आईबाप किंवा समस्त नातलग असतात ते त्या दुष्ट रांडेने व्यभिचाराने मिळविलेला पैसा असतो त्या पैशाचे लोभाने तिचेकडे जातात आणि गुप्त रीतीने पाहिजे तो संबंध करु लागतात. आणि तसेच तिचेही जाण्या येण्याचे संघष्टण तिचे आप्तांसी पडल्याने कोणी नवीन येणारे गृहस्थांस तिची पूर्वीची हकीकत माहीत नसल्यामुळे तिच्याशी पूर्ववत सर्व काही व्यवहार करु लागतात. याकरिता तिच्याशी कोणी आप्त वगैरे संबंध ठेवितील तर तशा लोकांस सदरीलप्रमाणे एकदम भ्रष्ट करावे. आणि तिचे बरोबर फक्त भाषणच झाले असेल तर पंचवीस रुपयांचे दंडास पात्र करावे. ह्याप्रमाणे पंचाने नि:पक्षपाताने न्याय करुन

ज्या पुरुषांस भ्रष्ट केलेले आहे आणि तो पुन्हा आडदांडपणा दाखवून आणि जातीने केलेले सजेविषयी तिळमात्र भय न बाळगून उध्दटपणा करु लागेल तर वर प्रमाणेच कोणी त्याच्याशी संबंध करील तर तो वरील भ्रष्टतेस पात्र होईल आणि फक्त त्याचेशी भाषण करणारास पंचवीस रुपये दंडाची शिक्षा द्यावी. कारण एवढा सक्त हुकुम ठेविल्याशिवाय जातीची सुधारणा आणि जातीचे भय बाळगणार नाहीत, सबब हा नियम अगदी कायम लागू व्हावा.

टीका-कित्येक जातीमध्ये असा काही प्रचार आहे की, दृष्ट व्यभिचार अगर कोणतेही कारणाने अपंगत ठेविले असेल तशा मनुष्यांपासून दंड अगर काही नियमित भोजन घेऊन सोडून देतात तर हे अगदीच गैर आहे. कारण स्त्रीपुरुषाने व्यभिचार केला आणि ती दंड देण्यास समर्थ असली म्हणजे दंड देऊन पुन्हा आपला क्रम चालू करितात. त्या दुष्ट लोकांचा असा समज असतो की, जातीचे लोकांस दंड अगर एखादे जेवण दिले म्हणजे आपण मुक्त होतो. अशांबद्दल आपणास पुष्कळच उदाहरणे मुंबईसारखे शहरी ऐकण्यात आणि पाहाण्यांत येतात. आणि कित्येक अज्ञान जातीमध्ये तर फक्त दारु पिण्यास मिळाली म्हणजे पुरे. तर माझे प्रियकर बांधवांनो, ही रीत आणि व्यवस्था अगदीच बंद करावी. अशा दुष्ट आणि व्यभिचारी स्त्रियांपासून दंड घेऊन ठिकाण्यावर आल्या तर बरे, नाहीतर तशापासून दुसरीही स्त्रीपुरुषे तो कित्ता घेतात व तेणेकरून आपली जातीचा बोज जाऊन इतर जातीमध्ये दुर्लौकिक होण्याचा संभव आहे. म्हणून प्रथमतःच कोणालाही कडक शिक्षा लागल्याशिवाय दुसरे लोकांस दहशत बसणार नाही व जातीमध्ये व्यभिचार कोणतीही स्त्री करीत आहे अथवा व्यभिचार होत आहे म्हणून अंदेशा आला तरी त्याची परिस्फुटता शेजारचे, अगर त्याचेच जातीचे मनुष्यास माहीत असून ते आपले जातीची अब्रू जाईल करिता बाहेर उद्‌गार आणीत नाही व त्यांनी तो तसा व्यभिचार छपून ठेविला आणि पुढे काही दिवसांनी बाहेरच लोकांनी उघडकीस आणिला तर त्या छापून ठेवणारे म्हणजे शेजारी ज्ञातीगृहस्थांस शिक्षेस पात्र करावे. आणि जो कोणी असा दुष्ट व्यभिचार उघडकीस आणून पंचास कळवीत जाईल त्यास पंचाकडून इनामे दिली जातील असा उघड ठराव करुन जेवढा आपणाकडून व्यभिचाराचा मोड होत जाईल तेवढा यत्न करीत जावा. म्हणजे कांही कालाने पुढे येणाऱ्या स्त्रिया व पुरुष सदाचरणास लागून बदकर्माचा दरारा पाळतील.

## नियम सातवा

स्त्री सद्‌गुणी असून तिचा पती तिला वागविण्यास अगर नांदविण्यास खुषी नाही, तर तशा पुरुषास प्रथमत: पंचांनी चांगला उपदेश करावा. त्याप्रमाणे तो ताळ्यावर न आल्यास तीस खुला मार्ग करुन द्यावा व तिचे खाण्यापिण्याचा निराळा बंदोबस्त करावा आणि दोघेही एकमेकांस सोडचिठ्ठी देण्यास खुषी असली तरी सदरील प्रमाणे लिहून घ्यावे. समस्त जात गंगा व पंच यांस लिहून देतो की, ही माझी बायको तिचे काही नाव असेल ते आणि तिचे बापाचे नांव, लग्नास किती वर्षे झाली ती, आणि न वागविण्याचे कारण व तीस सोडचिठ्ठी देण्याबद्दल (तिचे निर्वाहाकरिता) पंचाचे स्वाधीन अमुक रक्कम म्हणजे २०० पासून ५०० दिली, आणि तिचा माझा अत:पर काही संबंध राहिला नाही. ही चिठ्ठी मी अक्कलहुशारीने लिहून दिली सही. त्यावर पंचांच्या सह्या नंतर पंचांचा शेरा तिचे गुणावगुणाबद्दल घेऊन ते पत्र त्या बायकोचे स्वाधीन करावे. त्याचप्रमाणे स्त्रियांचेही सदर प्रमाणे लिहून घ्यावे. त्यांत मित शक वगैरे घालण्याची वहिवाट ठेवावी.

टीका - आता पुरुष रंडीबाज, दारूबाज, जुगारी इत्यादी अनेक तऱ्हेने अवगुणांत तल्लीन असल्याने सद्‌गुणी स्त्रियास त्रास देतो. आणि त्या स्त्रियांचे अशा योगाने मन उदास झाले म्हणजे त्यामध्ये वैमनस्य वाढून त्यांचा वियोग करितात. तसेच स्त्री दुर्गुणी असली म्हणजे गरीब बिचारे पुरुषाचे हाल काय होतात ते लिहून सांगण्यास नकोच; परंतु एवढे सांगणे आहे की, आशा योगाने उठले ते पुरुष अगर स्त्रिया सोडचिठ्ठी घेण्यास उभ्या राहतील तर याजबद्दल चांगला पोक्त विचार आणि नि:पक्षपाती न्याय करून सदर सल्ल्याप्रमाणे वहिवाट करावी.

कित्येक दुष्ट स्त्रियांचा पुरुषांबरोबर गोडीपणा असो अगर बेबनाव असो. पण नवऱ्यास अकस्मात काही रोग अगर काही शरीर व्यंग झाले (आंधळा, पांगळा) तर तशा स्त्रिया दुष्ट लोकांबरोबर लागून दुसरा नवा करण्यास धजतात तर त्या दुष्ट लोकांस व त्या स्त्रियांस योग्य शासन करावे आणि यातून जर करिता तिचे नवऱ्यास फारच वाईट प्रकारचा रोग एकाएकी झालेला आहे तर तो रोग तीन वर्षेपर्यंत बरा होतो किंवा नाही याचा आदी अंत पाहिल्याशिवाय त्या दुष्ट स्त्रियेचा विचार जातीने चांगला करुन आणि त्या पुरुषाची स्थिती पाहून योग्य तजवीज करावी.

शास्त्रात आणि लोकोपचारांत असे म्हणतात की, ज्या पुरुषास रक्तपिती (अपस्मार रोग) अगर नपुंसकपणा अकस्मात झाला तर अशा पुरुषाचा अगदी संबंध ठेवू नये, परंतु त्याजला एकदम निराश्रित करणे गैर आहे सबब त्याचा चांगले प्रकारे बंदोबस्त करुन ठेवणे पंचाचे हातचे आहे.

पंचाने सोडचिठ्ठी देण्याचे कामांत फारच अक्कल व हुशारी करुन आणि नि:पक्षपातीपणा धरुन कामांत हात घालावा, आणि योग्य विचाराने इन्साफ करीत जावा. प्रथमत: एकदोन वेळा त्यास चांगले प्रकारे शिकवून दहशत पडण्यासारखी समज द्यावी की जेणेकरुन ती आपली सुखाने संसारांत कालक्रमण करु लागतील. त्यायोगे ती न उमजली तर मात्र ज्ञातीचे शेवटील अमलाप्रमाणे करावे. नाहीतर कित्येक दुष्ट स्त्रिया बिचारे गरीब नवऱ्याचे हातावर तुरी देऊन जातात. कारण की "गरिबाची मरु नये बायको आणि समर्थाचे पडू नये घर" याचा विचार पाहून पंचांनी आपली शिताफी करावी. तसेच आपले जातीत व्यभिचारापासून होणारे बदनाम त्याचाही समूळ नाश करण्याचे उपाय योजून बंदोबस्त करावा.

## नियम आठवा

कित्येक स्त्रिया नवऱ्यापासून विभक्त राहतात आणि कित्येक तरुण विधवा स्त्रिया पुनर्विवाह केल्याशिवाय राहून स्वच्छंदाने वर्तणूक करुन गर्भपात व बालहत्या करण्यास प्रवृत्त होतात. अशी उदाहरणे मुंबई शहरी पुष्कळच दृष्टोत्पत्तीस येतात आणि अशीच वहिवाट ठेवल्याने आणखीही ह्या प्रकारची कृत्ये होण्याचा विशेष संभव आहे. कारण याजबद्दल प्रत्येक जातीत चांगले असावेत तसे बंदोबस्त नाहीत. सबब कित्येक स्त्रिया वैधव्याचा डौल मिरवितात आणि गुप्त रीतीने व्यभिचार करुन लहान बालकांचे जिवावर उठतात ! तसेच ज्या स्त्रिया नवऱ्यापासून विभक्त राहतात त्यांचाही क्रम असाच चालू असतो.

नवऱ्यापासून विभक्त राहाण्याची कारणे अशी आहेत की, नवऱ्याने अगर सासु-सासऱ्याने काही कारणावरुन मारले अथवा बोलाचाली गुणावरुन झाली अथवा थोडेस वैमनस्य उत्पन्न झाले म्हणजे ज्या स्त्रियास आईबापांची अगर भाऊबंदांची मोठीच फुस असती तशा स्त्रिया नवऱ्यापासून पळून जाऊन आईबापास अनेक तऱ्हेने चाहाड्या सांगून त्यांच्याही मनात बिकट पाडतात आणि नवऱ्याचे घरी पुन्हा धाडणार

नाहीत असा कुतर्क त्यांचे मनात भरवितात; कारण आधीच मुलीचा लोभ असतोच आणि तशात एखादे बिकट कारण मुलीकडून समजले म्हणजे ती आई-बाप त्यामुलीस नवऱ्याकडे पाठवित नाहीत. तेणेकरुन त्यास उत्तेजन येऊन तशा स्त्रिया बदफैली होण्यास उल्लू होऊन जातात. अशा ज्या स्त्रिया आपले सासु-सासरे आणि नवरा यांचे शुष्क बोलण्याचे कारणाने मनात वैमनस्य धरुन आपले आईबाप आणि भाऊबंद यांचेजवळ चाहाड्या करुन तेथेच त्यांचे आश्रयाने दिवस काढतात. तर तशा स्त्रियांस आणि तिजला कोणी आश्रय देणारे गृहस्थास २५ रुपयांपर्यंत दंडाचे शिक्षेस पंचांनी पात्र करावे. सदरहू स्त्रिया आपले नवऱ्याचे घर सोडून कोणाचे आश्रयास येऊन राहातील तर त्या गृहस्थाने एक महिन्याचे आत पंचांस येऊन कळवावे, नाहीतर विनाकारण वर्षोनुवर्षे लोटून जाऊन दाद नाफिर्याद होते अथवा कित्येक तशा स्त्रियांचे भाऊबंद अगर आईबाप हटवादी असले म्हणजे आमचे घर नवऱ्याने नेण्याचे येऊ नये काय ? आमचे घरी खाण्यास मिळत नाही काय ? तर नवऱ्याचे घरी आमचे मुलीस सासू सासऱ्याचे आणि नणंदा भावजयांचे जाचांत वागण्यास पाठवावे काय ? तर हा त्यांचा व्यर्थ समज काढून टाकावा. कारण जिकडची वस्तू तिकडेच राहावी हे त्यांचे पूर्णपणे मनात भरवून तिचे बोलणे आईबापांनी अगर भाऊबंदांनी बिलकुल मनावर घेऊ नये असा योग्य बंदोबस्त करावा.

टीका- स्त्रिया नवऱ्यापासून विभक्त राहिल्यापासून जारकर्म होण्याचा संभव आहे. म्हणून एक महिन्यांतच पंचांस कळवावे आणि त्याचा उलगडा करुन टाकावा. पुष्कळ दिवस लागल्याने व्यभिचार होऊन त्यापासून गर्भ संयोग होतो. तेव्हा त्या जनलज्जेस्तव त्याची हत्या करण्यास प्रवृत्त होतात. म्हणून अशा जारकर्मी स्त्रियांचा व्यभिचार आपण लपवून न ठेविता ताबडतोब उघडकीस आणावा. नाहीतर तसाच छपून राहून कांही कालाने दैववशांत गर्भ राहिला असता त्या लहान अर्भकाची हस्ते परहस्ते हत्या करुन टाकितात. त्याजबद्दल तुम्ही दोषांस पात्र व्हाल म्हणून जारकर्माची माहिती झाल्याबरोबर तुम्ही आपले शिरावर दोष न ठेविता पंचांस जाहीर करावे.

तसेच तरुण विधवा यांचाही प्रकार असाच आहे. म्हणून त्यांचा पुनर्विवाह लावल्यापासून अशा दुष्ट कृत्यांचा मोड होण्यास फार दिवस लागणार नाहीत. याजबद्दल परम दयाळू परमेश्वराने असा काही नियम करुन ठेविला नाही की, पुन्हा लग्न करु नये. वस्तुत: कोणताही पुरुष पुन्हा लग्न करुन पापातें पावत नाही,

त्याअर्थी विधवा तरी पुनर्विवाह करून कशी दोष पावतील ? प्रजोत्पादन आणि तत्संबंधी दुसरी कर्तव्यकर्मे संपादणे हे लग्नाचे प्रयोजन आहे. तर अनापत्य अबलांनी ही सत्कार्ये साधण्याकरिता पुन्हा नवरा करण्यास का न अधिकारी व्हावे ? ज्यापेक्षा इंद्रिय संयमन करणे इतके कठीण आहे की, हजारांत तशा शांत स्वभावाचा मनुष्य मिळणे कठीण आहे. त्यापेक्षा बालविधवा स्त्रियांनी जन्मपर्यंत इंद्रियवृत्ती अवरोधून ठेवाव्या हे कसे संभवेल ! कारण आम्ही कोणतीही वृत्ती एकदम कोंडून ठेवावी अशी परमेश्वराची इच्छा नाही. त्याने कोणताही विषय निरर्थक उत्पन्न केला नाही. आपली प्रत्येक मनोवृत्ती पूर्ण सुखाच्या खाणीसारखी आहे. त्याने आम्हांस ज्या मनोवृत्ती दिल्या आहेत, त्या योग्य विषयांकडेस जर आम्ही खर्चिल्या नाहीत तर खचित अयोग्य विषयांकडे वळतील, याजकरितां विधवांच्या विवाहाचा निषेध परमेश्वराचे नियमास अनुसरून नाही. जे कोणी ह्या कल्याणकारक नियमाच्या बाहेर वागतात त्यापासून निखालस वाईट फळ उत्पन्न व्हावयाचे यास्तव विधवांचे मनोदु:ख व व्यभिचार दोष, कुळास डाग, व जातीस बट्टा लागणे इत्यादी महापातकांची उत्पत्ती या निशक चालीची प्रत्यक्ष फळे होत. सबब माझे प्रियकरहो आपण जाणुनबुजून अशा दोषांस का पात्र होता ! म्हणून आपण याजबद्दल त्वरित उपाय योजून ज्याणे ज्याणे आपापले जातीत (ज्या कोणाचे जातीत पुन्हा लग्न होत नाहीत त्यांनी) असा विवाह करण्याची बिलकुल शंका आणू नये. ह्या पुनर्विवाहाबद्दल थोडे दिवसांपूर्वी कित्येक पंडितांनी विधवांच्या दु:खाकडे पाहून व वडिलोपार्जित जो शास्त्राविरूध्द दुष्ट विचार चालत आलेला तो दूर करावा म्हणून दोन्ही पक्षांचे पंडितांनी एक मोठी सभा पुणे मुक्कामी भरविली होती. त्यांत हा विवाह सशास्त्र म्हणणाऱ्यांचे मत जास्त होऊ लागल्याबरोबर कित्येक हटवादी पंडितांनी त्यांचा मोड करण्याचा विचार करून मध्ये अनेक तऱ्हेची विघ्ने उत्पन्न केली, आणि बिचारे तरुण विधवांचे उर्जित दशेची पायमल करून टाकिला, हे किती बरे ते लोक त्या तरुण विधवांचे दोषांस पात्र झाले आहेत. तसेच ज्या लोकांत पुनर्विवाह करण्याचा रीती असून तेही अशा ब्राह्मणाप्रमाणे तरुण विधवांचे पुन्हा लग्न करीत नाहीत तर माझे मित्रहो ! आपण अशा अविचारी लोकांप्रमाणे दुराग्रहपणा धरू नका व त्यांचे दोषांस पात्र होऊ नका व पूर्वापार पुन्हा तरुण विधवेचे लग्न करण्याची जी चाल आहे तीच कायम ठेवून त्यांचे पुण्याचा वाटा आपण स्वीकारा.

## नियम नववा

कित्येक जातीमध्ये स्त्रिया जिवंत नवरा असून दुसरा नवरा करतात तेणेकरुन पुष्कळचे तंटे बखेडे होऊन सरतेशेवटी सरकारापर्यंत खटला जाऊन पुराव्याअंती कैदेचे शिक्षेसही पात्र होतात. अशा खटल्यामध्ये कित्येक जातीचे लोक खोटे बोलून अपराध्याचे संरक्षणही करुन पैशाचा व्ययही पुष्कळच करितात. खर्च करुन सरकारापर्यंत जाणे हे बहुधा ज्यापाशी पुष्कळ पैसा आहे त्याकडून होते ; परंतु जे कोणी गरीब जातबंधू आहेत त्यांस मदत कोणीही होणे कठीण आहे कारण की, 'जिकडे घुगऱ्या तिकडे उदेव उदेव' आणि 'चलती तिकडे भलती' ह्या प्रकारे बहुतकरुन घडून येते. एखादे गरिबाने पंचापुढे फिर्याद आणिली असता त्याचे कोणी मनावर न घेता उलटे सुलटे सांगून त्यास रवाना करुन देतात ; तर असा संभव नि:पक्षपाती पंच असल्याने कधीही होणार नाही. जिवंत नवरा असून ती पुन्हा लग्नसंबंध करील तर त्या स्त्रियेपासून आणि तिच्याशी संबंध करणारे गृहस्थापासून पहिल्या नवऱ्यास जो लग्नास खर्च लागला तो खर्च तीनशेपासून पाचशे रुपयांपर्यंत घ्यावा व तो नवरा घेण्यास खुषी नसला तर त्यास दुसरी बायको करुन द्यावी आणि सदर मुहूर्त लावणारे स्त्रियेस व त्या गृहस्थास तीन वर्षेपर्यंत ज्ञाती बाहेर ठेवावे. कारण अशा अंदाधुंदीचा प्रचार फार करुन माळी कुणबी इत्यादी जातीमध्ये मुंबई शहरी फाच जारी चालू आहे. ह्याच जातीमध्ये कित्येक स्त्रिया जिवंत नवरा असून वारंवार चार पाच जणांशी मुहूर्त लावून प्रशस्तपणे वर्तणूक करीत असतात; परंतु ज्याबद्दल कोणीही काही विचार करीत नाहीत ही मोठीच आश्चर्याची गोष्ट आहे.

टीका - जिवंत नवरा टाकून दुसरा नवरा करणे हे बहुतकरुन गरीब लोकांचे बायकांकडूनच होत असते. तसाच थोडासा प्रचार मध्यम स्थितीतले व श्रीमंत लोकांचे बायकांकडूनही होतो. तरी श्रीमंत व मध्यम स्थितीतले लोक कदाचित अशा बायकांस शिक्षेस पात्र करु शकतील; परंतु गरीब असून ज्यांस बोलायचे ज्ञानही नाही अशा गृहस्थांचे फारच नुकसान होऊन विपत्तीमध्ये पडतात. हा एवढा फितुरीपणा करण्याचा विचार करुन लुच्चे, लफंगे, छाकटे इत्यादी वाईट चालीचे लोकांपासून होऊन युक्ती परयुक्तीने एखादे बायकोस व्यभिचारास प्रवृत्त करतात, आणि तिच्याशी मुहूर्त लावितात, तसेच शेवटपर्यंत त्यांचे जवळ निभाव कोठून होणार ? कारण बोलून चालून ते

लफंगे फटगभाई असल्यामुळे त्याच स्त्रियेस पुन्हा आणखी दुसऱ्या बरोबर मुहूर्त लावण्याचा प्रसंग येतो. इत्यादी कारणाने असे पुष्कळच नवरे होऊन नंतर काही दिवसांनी प्रसिध्दपणे उघड उद्योगही चालू करण्यास मागे पुढे पाहात नाही. परंतु सरतेशेवटी ईश्वरी शासन त्यांचे कपाळी असतेच त्यामुळे त्यांचे फारच हाल होऊन नरकवासाचा रस्ता पकडतात. करिता माझे प्रियकर बंधूंनो सहाव्या नियमात सांगितल्याप्रमाणे तो नियम अमलात आणला तर कधीही गरिबाचे नुकसान आणि श्रीमंताचे अब्रूस बट्टा लागणार नाही.

दुसरे नियमात मागे कळविलेच आहे की, ज्यांनी त्यांनी आपापले ज्ञातीत अवश्य लागणारे जिनसेचा व्यापार करावा; परंतु कित्येकाचे मनांत शंका येईल की, ज्या ज्ञातबांधवांपाशी पैसा असेल त्यांस तसे करण्यास काहीच अडचण पडणार नाही; पण कित्येक ज्ञातीचे गृहस्थ कनिष्ठ स्थितीत आहेत व ज्यास खाण्याचीसुध्दा मारामार तर त्यांनी काय करावे ? त्यांसही पुष्कळच इलाज आहेत - ते असे की त्यांनी आपले ज्ञातीची सभा करून सर्वांस सक्त हुकूम असा द्यावा की, ज्या व्यापाऱ्यांपाशी अगर लगतचे ज्ञातीत व्यापार चालू असलेले गृहस्थांकडून अवश्य लागणारे जिन्नस विकत घ्यावेत दुसरे कोणापासून घेऊ नयेत. ज्या ज्ञातीत व्यापार चालू असेल त्यांनी अगर व्यापाऱ्यांनी नेमस्त दराने जिन्नस विकावेत.

ज्ञातीचे सुख इच्छिणाराने प्रत्येक जिनसेचा भाव हमेशा दुसरे ठिकाणी जाऊन तपासीत असावा. जे सर्व ज्ञातबांधव एकाच व्यापाऱ्याजवळून अवश्य लागणारे जिन्नस खरेदी करितात त्यांनी त्या ज्ञातीचे फंडात योग्य दिसेल अगर ती ज्ञात सांगेल त्याप्रमाणे वर्षाचे त्यांचे फंडात अमुक रक्कम द्यावी. ह्याप्रमाणे झाले असता ज्ञातीचा स्वार्थ व व्यापाऱ्यांचाही स्वार्थ साधून परमार्थही साधतो. आणि जर करिता एखादे व्यापाऱ्याने जास्त किंमत घेतली असे जर कोणतेही गृहस्थास माहीत पडले तर त्या व्यापाऱ्यापासून जिन्नस घेण्याचे बंद करावे जी रक्कम त्याने देण्यास कबूल केली असेल ती त्याचकडून घ्यावी. अगर पहिल्यानेच ज्ञातीचा मक्ता देण्याचे वेळीच काही रक्कम त्या ज्ञातीने कब्जांत अनामत घ्यावी.

अलीकडेस आपले देशांमध्ये मारवाडी लोकांचा आणि त्याचप्रमाणे आणखीही दुष्ट व्यापाऱ्यांचा व्याजाबद्दल एवढा तडाखा आहे की, त्या योगेकरून बहुतेक लोकांची धुळधाणी झालेली आहे. एखाद्या गरिबास पैशाची निकड असल्यास मारवाड्याकडून

कर्ज काढावे लागते. तेव्हा ते लोक एकाचे चौपट करुन त्या कर्ज घेणाऱ्याचे घरात काही एक न ठेविता त्यास दु:खसागरात पाडतात. सबब माझे देशबांधवांनो त्या दुष्ट लोकांचे हातून सोडविण्याचा हा फार सुलभ मार्ग आहे की, ज्यास फारच निकडीचे काम असेल त्यांनी आपले ज्ञातीचे सरपंचाकडेस जाऊन आपली सर्व हकीकत सांगावी. आणि त्यांनी त्यास नेमस्त दराने ज्ञातीने फंडातून अथवा व्यापाऱ्याकडून पैसा देण्यास सांगावे, की जेणेकरुन आपापले ज्ञातबांधवांवर व्याजाचा हल्लींच्या मारवाड्यांचा तडाखा न बसता व्यवहार रीतीने पैसे नेतील व परत करतील; कारण त्यांची सर्व युक्ती आणि शेंडी ज्ञातीचे हाती असते व त्यांस योग्य शिक्षा देणेस ज्ञातीस सुलभ पडते तसे सरकारास पडत नाही. कारण की सरकारात त्यांचे हमेशा दळणवळण नसते.

ज्ञातीचे फंडात पैसा असल्याने मुलांस व मुलीस सुशिक्षण देण्यास फारच सुलभ पडते. व तशीच धर्मकृत्ये करण्यास कोणतीही अडचण पडत नाही. विद्यावृद्धी झाल्याने सर्वांस हित व अनहित ताबडतोब समजते. पराचे हिताकडेस आपण पाहून लागलो असता परमात्मा परमेश्वर आपणास साह्य झाल्याशिवाय कधीही राहणार नाही म्हणून माझे मित्र हो ह्या पुस्तकांत जे जे नियम सुचविले आहेत त्यांचा अनुभव घ्याल तर तुमचे उपकार ज्ञातबांधवावर होऊन पुढे येणारे मनुष्यांस कित्ता घातल्याप्रमाणे होईल.

तिसरे नियमांत दर्शविलेच आहे की, हुशार व दक्ष असा एक गृहस्थ आपलेच ज्ञातीतून निवडून अगर आपले ज्ञातीत मिळत नसल्यास दुसरे लगतचे ज्ञातीतून पसंत करावा व त्याचे मेहनतीचे वर्षासन त्यास द्यावे आणि जेणेकरुन तो नि:पक्षपाते करुन स्वीकारलेले काम सर्वांचे पसंत पडेल असे करण्यास धजून सर्वांच्या मनाची खात्री करण्यास त्याने लहान थोर ज्ञातबांधवास जो कांही खर्च जमा झाला असेल तो सांगावा व त्या ठेविलेल्या हिशेबाची नक्कल चिटणीसाने छापण्यास द्यावी आणि सर्वांस पुरे इतक्या नकला छापाव्यात आणि सभेचे दिवशी सर्वांस एक एक द्यावी, म्हणजे कोणतेही वेळी पैशाची अंदाधुंदी होणार नाही.

हल्ली अशी चाल कित्येक सुधारलेल्या ज्ञातीमध्ये जमाखर्च ठेवण्याची सुरू आहे पण त्यांत ह्या प्रकारची व्यवस्था नसल्यामुळे पैशाचा व्यय ज्यांस जसा वाटेल

तसा करितात. सरतेशेवटी हिशेब ठेवणारे ज्ञातीचा पैसा खाऊन जातात. याजविषयी माझे देशबांधव जाणतच आहेत. तरी माझे मित्रहो ! तुम्ही जाणून बुजून सत्कार्यास लागणारे पैशाची ह्याप्रमाणे व्यवस्था न करिता ह्यांत सुचविल्याप्रमाणे तजवीज करा म्हणजे त्यापासून काय फायदा होतो हे तुम्हांस वारंवार विषयरुपाने लिहिले आहे त्यावरून दिसून येईल.

पाचवे नियमांत लहानपणी लग्न केल्याने पुष्कळच तोटे होतात हे दर्शविलेच आहे तरी त्यांतील थोडासा टीकेचा भाग उघड रीतीने लक्षात यावा म्हणून वाचकास विदीत करितो :

१) मित्रहो ! ज्या जातीत पुनर्विवाह करण्याची दुराग्रही लोकांनी अद्याप बंदीच ठेविली आहे तशा ज्ञातीत जर लहानपणी लग्न केले आणि दुर्दैवाने मुलगा मरण पावला तर त्या बिचारे मुलीस वैधव्यांचा कलंक जन्मभर लागून त्या अबलेस रांडपणाचा बोजा वागविणे जरूर पडून गुलामाप्रमाणे कुटुंबांत राहून कैद्याप्रमाणे दिवस काढिते. कारण की, तिचा कैवार घेणारा भ्रतार नाही. अथवा तशा विधवा जर बदफैली निघाल्या तर त्यांचे कुळांस दुर्नामाचा बोजा घेणे प्राप्त होते. आता त्या बदकर्मापासून उत्पत्ती होण्याचा संभवच आहे. तर त्या दुष्ट स्त्रिया अर्भकांचा कोणत्याही रीतीने नाश करण्यास प्रवृत्त होतात व जर करिता तिचे नातलगांस समजले म्हणजे तेही त्यांचे गुणावणावरुन त्या बदकर्माची झाकाझाकी करितात. अगर त्यांचे मौतीने डेरे दिले असल्यास दुसरे कोणास समजून सरकार त्यांचे कर्मास योग्य शिक्षा देते अथवा देहांत शासन करिते.

२. पाहा ! लहानपणी लग्न केल्यावर दुर्दैवाने असा प्रकार झाला तर सासूसासरे आणि आईबाप त्या विधवा स्नुषेकडे पाहून दररोज दु:खी होतात. जसजशी ती उपवर होत जाते तसतसे त्या सासूसासऱ्याचे व तिचे आईबापाचे लक्ष तिचे सृष्टीचे सुखांकडेस जाते व खंती होऊनही आता पुढे दिवस गुणाने काढील किंवा अवगुणो काढील म्हणूनही त्यांचे लक्ष वारंवार तिचेकडील गुंतलेले असते. जे श्रीमंत व मध्यम अवस्थेत असतात ते तिचा वाईट मार्गात पाय पडू नये म्हणून फार नजरही ठेवितात; पण तो मदन कोणास सोडितो ? विधवा स्त्रियास किती जरी आटोक्यांत ठेविले तरी त्या आडमार्गात पाऊल टाकल्याशिवाय राहणार नाहीत, कारण स्पष्टपणे दिसत

आहे की, दुसऱ्याने रतिसुख भोगावे व तिने का भोगू नये ? प्रथमत: डामडौलाने लग्न समारंभ केल्यानंतर दुर्दैवाने हा प्रकार झाला म्हणजे त्या आईबापस किती बरे दु:खाचे डोंगर होऊन रुदन करु लागतील. आणि तशांत जर करिता कर्ज काढून लग्नसमारंभ केला असल्यास त्या बिचाऱ्यास कोणते प्रकारे दु:ख होत असेल ! याचा विचार वाचकांवरच सोपवितो.

३. एखादे ज्ञातीत लहानपणी लग्न होऊन विधवा झाली आणि त्या ज्ञातीत पुनर्विवाह करण्याचीही वहिवाट आहे. तिचे घरची मनुष्ये म्हणजे सासूसासरे सधन असली तर तिचे आईबाप वगैरे पुन्हा लग्न करण्याचे भरीस पडत नाहीत कारण की आता दुसरे घर कसे मिळेल आणि कसे नाही याचा विचार करीत बसतात. नंतर ती मुलगी तारुण्याचे भरांत येऊ लागली म्हणजे तिचे आईबाप व सासरघरची मनुष्ये तिचे पाळतीला असतात, पण हे सर्व त्यांचे करणे व्यर्थ होय; कारण तारुण्याचे भरात आल्यावर तिजला सृष्टीचे सुखांचा उपभोग घेण्यास कळू लागते. मग अर्थातच तिजला ती संपत्ति व त्या घरांची कीर्ती काय करणे आहे बरे ? ती गुप्तपणे आडमार्गाने त्या बदकर्मास प्रवृत्त होते व सरतेशेवटी उघडकीस आले म्हणजे तिचा शिंतोडासुध्दा घेण्यास तिचे नातलग धजत नाहीत. मग तिचे आईबाप त्या दुष्ट गुणांमुळे तिचा दुसरीकडे विवाह करु लागतात; परंतु तिचे गुण सर्वांत माहीत असल्यास तिजबरोबर कोणी पुनर्विवाह करीत नाहीत. मग तिजला उघड रस्ता धरणे भाग पडते.

आणखी ह्या प्रकारचे तोटे लहानपणी लग्न केल्याने आणि पुनर्विवाहाचा प्रतिबंध असल्याने होतात हे सर्व माझे देशबांधवांस माहीत असून आडमार्गाने वर्ततात म्हणून हे मोठे नवलच समजले पाहिजे ! करिता अशा रीतीचा मोड आपण न कराल तर असाच प्रकार पुढे होणारे सृष्टीत राहून आपणास अज्ञानावस्थेत गणतील. सबब याचा विचार आपण पूर्ण कराल अशी आशा करीत आहे.

सहावे नियमांत व्यभिचाराविषयी थोडेसे विवरण केले आहे परंतु हा विषय फार गहन आहे. सबब त्याचकडे पुन्हा वळणे भाग आहे. कोणी एखादे गृहस्थाने स्त्रियेकडून किंवा पुरुषाकडून व्यभिचार होतो असे जर पंचास कळविले तर त्या जारकर्मी लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी त्या स्त्रियेस किंवा पुरुषास असा लेखी

किंवा जातीचे मुकदमाबरोबर निरोप पाठवावा की, तुमची वाईट वर्तणूक होत आहे ती आमचे ऐकण्यात आली आहे तरी तुम्हाला ज्ञातीची गरज असल्यास शुध्दीवर यावे. जर तुम्हांकडून तसे होणार नाही तर आम्ही तुम्हाला योग्य शिक्षा देऊ. त्यांचे जे शेजारी ज्ञातीगृहस्थ राहात असतील त्यांसही कळवावे की, तुमचे शेजारी अविचार होत असून ज्ञातीचे पंचास कळविले नाही म्हणून तुम्हांस जी सजा पंचाचे ध्यानांत येईल ती भोगावी लागेल. अथवा तुम्हाला काही माहीत असल्यास पंचास येऊन सांगावे. नाहीपेक्षा त्या बदकर्मी लोकांची व्यवस्था होईल त्याप्रमाणे तुमचीही गती होईल. जोपर्यंत अशा प्रकारचा कडक अंमल नसेल तोपर्यंत ती कुकर्मी मनुष्ये ताळ्यावर येणार नाहीत.

माझे प्रियकरहो ! आज हा एवढा आपणासमोर पाढा वाचून ठेविला आहे. त्यांत जर कदाचित कमसमजुतीमुळे चुकी झाली असेल ती आपण सुधारुन घेऊन एवढे मी केलेले श्रमास उत्तेजन येण्यासारखे आपणाकडून आश्वासन मिळून या रचलेल्या नियमांप्रमाणे आपले जातीमध्ये जरूर उपयोग घेऊन आपापले लोकांत सुधारणुकीचा पाया घालाल अशी मी आशा करीत आहे. कारण प्रत्येक नियम आपण लक्ष घालून वाचून त्या प्रमाणे वर्तणूक करू लागले असता आपले सर्व प्रकारे कल्याण होईल.

# सत्यशोधक निबंधमाला

अथवा

# हिंदू धर्माचे खरे ज्ञान

**भाग १ ला**

रा. रा. नारायणराव मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोधकांचे हितास्तव "दिनबंधु" छापखान्यात छापून प्रसिध्द केला.

मुंबई.

**माहे सप्टेंबर सन १८८६**

**किंमत ३ आणा**

## प्रस्तावना

आमच्या हिंदुस्थान देशात हिंदु लोकांचा मोठा भरणा आहे व ह्या धर्माचे संबंधाने सर्वांचे ऐक्य असणे हे वाजवी आहे. परंतु तसा प्रकार मुळीच नाही तेणेकरुन हिंदु लोक व त्यातून अज्ञान शेतकरी वगैरे लोक अगदी दीन होऊन गेले आहेत. ज्यांचे हाती धर्माची सूत्रे आहेत ते तर मनास वाटेल त्याप्रमाणे वर्तन करीत असल्यामुळे धर्माचे सत्यतेसंबंधाने बराच घोटाळा होऊ लागला आहे आणि हा घोटाळा बाहेर येण्यास अन्य जातीचे लोकात विद्यावृद्धि होऊ लागल्यामुळे त्यास तो समजू लागला आहे. जेव्हा लोक अक्षरशून्य होते तेव्हा भटांनी पाहिजे तसे वर्तन केले व त्यावेळेस त्यास कोणी विचारीतही नव्हते. परंतु हल्लीच्या ज्ञानसूर्याचे प्रकाशात त्यांची ती धर्मविरुद्ध वर्तने इतर लोकास का सहन होतील ? उंच-नीचपणा सर्व गुणकर्मावरुन आहे आणि तसे गुण संपादन करण्याचे जर ब्राह्मण लोक श्रम घेत नाहीत तर त्यास इतर जातीने श्रेष्ठ का मानावे ? ब्राह्मण लोकांच्या दुर्वर्तनामुळे व इतर लोक सत्याचा शोध करु लागले आहेत ; व तसा शोध करणारास सत्यशोधक सभेकडून साह्य मिळावे म्हणून ह्या सभेने हिंदु धर्माविषयी निबंध तयार करण्याचे मनावर घेतले आहे आणि हा स्तुत्य हेतु पार पडावा म्हणून तिने ठाणे येथील डॉक्टर संतुजी रामजी लाड यांचे येथे जो सन १८८५ चे सप्टेंबर महिन्यात प्रथम सत्यशोधक समाजाचा वा -- उत्सव झाला त्यावेळी तिजकडून निबंध मागविण्यात आले ----- जे येतील ते सर्व सत्यशोधक निबंधमाला या ----- ती प्रसिद्ध करील. करिता ज्यास हिंदु धर्माचा खरा अभि '----- आहे, त्यांनी सत्यशोधक निबंधमाला वाचण्यास ---- करु नये.

**नारायण मेघाजी लोखंडे**

## संपादकाचे चार शब्द

देशात हिंदू लोकसंख्या इतर धर्मीयांपेक्षा सर्वाधिक आहे. तथापि धर्माची सूत्रे केवळ ब्राह्मणांच्या हाती असल्याने त्यांच्यापैकीच हिंदू असलेल्या इतर बहुसंख्य जे शेतकरी व कामकरी लोक आहेत त्यांची स्थिती दीन, हीन अशी झाली आहे. कारण ब्राह्मणांनी सत्य कधी त्यांना सांगितलेच नाही. त्यांना धर्माची व देवाची भीती घालून, विद्येपासून वंचित ठेवून अज्ञानी व अंध:श्रद्धाळू बनविले. या वर्गाने मोठ्या धूर्तपणे धर्मापेक्षा मोठे घोटाळे निर्माण केल्याने अन्य समाज सर्वदृष्ट्या मागास राहिला आणि ते सर्वार्थाने आंधळे बनले. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन श्री. संतुजी रामजी लाड यांच्या ठाणे येथील घरामध्ये सत्यशोधक समाजाचा १८८५ उत्सव झाला. त्यामध्ये जाणकार व अभ्यासू सत्यशोधकांकडून निबंध मागविण्यात आले. आलेले निबंध सत्यशोधक निबंधमालेमार्फत प्रसिद्ध केले जातील असे जाहीर करण्यात आले. त्या अनुषंगाने रा. नारायण मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान भाग-१ व २ याप्रमाणे दोन अभ्यासपूर्ण निबंध सत्यशोधक समाजास सादर केले. हे निबंध २ भागात अनुक्रमे १८८६ व १८८७ मध्ये प्रसिद्ध केले आहेत. या दोन्ही निबंधाचा मुख्य विषय 'हिंदू धर्माचे खरे ज्ञान' बहुजनांना व दीन-दलितांना माहीत करुन देणे असा आहे. म्हणूनच रा. लोखंडे यांनी पुस्तकाच्या मुखपृष्ठावर सत्यशोधकांच्या हितास्तव 'दीनबंधू' छापखान्यात छापून प्रसिद्ध केले अशी नोंद केली आहे. यावरुन हे दोन निबंध पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्याचा उद्देश स्पष्ट होईल.

रा. लोखंडे हे महात्मा फुले यांचे एक कर्तबगार, निकटवर्ती, अभ्यासू व निष्ठावंत सहकारी होते. सत्यशोधक समाजाचे ते एक प्रमुख आधारस्तंभ होते. वेद, उपनिषदे, पुराणे याचबरोबर इंग्रजी राजवटीबरोबर आपल्या देशात उपलब्ध झालेले ज्ञान-विज्ञान आणि अन्य विविध सुधारणा यांचा त्यांनी चांगला अभ्यास केला होता. हे त्यांच्या निबंधमालांतून आणि चालविलेल्या 'दीन बंधू' या नियतकालिकातील लेखनावरुन दिसून येते. निबंधमालांचा मुख्य हेतू म्हणजे विद्येपासून वंचित असलेल्या

किंवा वंचित ठेवण्यात आलेल्या शूद्र-अतिशूद्रांना, स्त्रिया, शेतकरी व कामगारांना विद्येच्या माध्यमातून हिंदू धर्माचे खरे ज्ञान व्हावे, त्यांनी सर्वच क्षेत्रात सत्याचा शोध घ्यावा आणि सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त व्हावे हा या मालेतील शिकवणुकीचा आशय व विषय आहे. खरे पाहता ही सत्यशोधक समाजाचीच शिकवण आहे. अल्पशिक्षित गोरगरीब समाजाला समजेल अशी सोपी भाषा, वेद, उपनिषदे व साधुसंत यांची प्रातिनिधिक मते व वचने यामुळे निबंधमालेतील शिकवण सरळ, सोपी आणि प्रभावी अशी वाटते. ज्या समाजासाठी मालेचे प्रयोजन आहे त्याचा त्यांना समजेल उमजेल अशी बालबोध भाषा उदाहरणे घेऊन निबंधकारांनी लोक प्रबोधनाचे कार्य परिणामकारक व प्रभावीपणे केल्याचे आढळून येते. खरे पाहता तशा लोकसाहित्याची आजही दीन-दलित स्त्री-पुरुष समाजाला गरज आहे. साहित्य क्षेत्रातील परंपरागत कंत्राटदारांनी आजवर अशा लोक-साहित्याची घोर उपेक्षा केली. ते गावंढळ साहित्य म्हणून त्याज्य ठरवले. असे साहित्यास वाळीत टाकले किंवा ते नामशेष करण्यात आले. हे साहित्यच होऊ शकत नाही अशी त्यांची संभावना करण्यात आली. ते बनावट आहे तसा त्यावर शिक्का मारण्यात आला. उच्चभ्रूंनी लिहिलेले हेच खरे साहित्य असते. हे मत बहुजनांच्या गळी उतरविण्यात आले. बहुजनांनी आजवर या मतास माना डोलवल्या. महात्मा फुले यांच्यासारख्या एका क्रांतिदर्शी अशा लोकसाहित्यिकाची या ठेकेदार मंडळींनी चेष्टा केली. त्यातील शुद्धलेखनाच्या चुका शोधण्याचा त्यांनी आजवर खटाटोप केला. परंतु त्यांच्या दुबळ्या हातांनी हा ज्ञानसूर्य त्यांना झाकता आला नाही. म्हणूनच फुल्यांचे साहित्य आज हे खऱ्या अर्थाने लोकांचे साहित्य आहे. अनेक विचारवंत व संशोधक याकडे वळले आहेत. बहुजन समाजातील शिक्षित वर्ग हेच खरे 'आमचे' ग्राहक आहेत. म्हणून आज हे साहित्य आवडीने विकत घेत आहेत आणि वाचत आहेत. त्यावर विचार करत आहेत. चिंतन, मनन करत आहेत. आज ज्याला आपण विद्रोही साहित्य म्हणतो अशा साहित्याची गंगोत्री म्हणजे महात्मा फुले आणि त्यांचे सहकारी सत्यशोधक यांचे साहित्य आहे हे आता निराळे सांगण्याची गरज नाही. म्हणूनच रा. लोखंडे यांनी आपल्या या दोन निबंधमालेत म्हटले आहे की, ब्राह्मण सोडून इतर समाजाने चार वेद वाचू नयेत ते देवाधर्माच्या आज्ञेच्या विरुद्ध होईल. अशीच भूलथाप दिली.

बहुजनांनी वेदांना किंवा अन्य धर्म पुस्तकांना स्पर्शही करता कामा नये असा दंडक घातला गेला. विद्येची मक्तेदारी त्यांनी हजारो वर्षे यथेच्छ उपभोगली. या देशावरील प्रदीर्घकाळ चाललेल्या मुस्लीम राजवटीतसुद्धा त्यांनी आपली मक्तेदारी शाबूत ठेवली. मुस्लीम राजवटींनी याकडे डोळेझाक केली. ते आपल्याच 'उद्योगात' मग्न राहिले. ब्राह्मणांच्या या मक्तेदारीला इंग्रजांनी खरा सुरुंग लावला. आपले आसन स्थिर व्हावे या स्वार्थी उद्देशाने का असेना त्यांनी इंग्रजी भाषेला प्राधान्य देणाऱ्या ठिकठिकाणी इंग्रजी शाळा सुरु केल्या. या शाळांत ज्ञान-विज्ञान, सामाजिक शास्त्रे यांच्या अभ्यासाला शाळा महाविद्यालये व विद्यापीठे यामधून सुरुवात झाली. त्यासाठी इंग्रजी ग्रंथ उपयोगात आले तेव्हापासून ब्राह्मणांनी स्वार्थांध होऊन निर्माण केलेले ग्रहण सुटण्यास सुरुवात झाली. यामध्ये मिशनरी लेखकांच्या पुरोगामी साहित्याचाही समावेश आपणास करावा लागेल.

१९ व्या शतकात महात्मा फुले यांनी ब्राह्मणांची ही लबाडी प्रथम ओळखली. अनेक पुराणे आणि आपल्या स्वार्थासाठी रचलेल्या 'सत्यनारायण' सारख्या भाकडकथा म्हणजे बहुजनांची शुद्ध फसवणूक आहे हे त्यांनी कुणाचाही मुलहिजा न ठेवता रोखठोकपणे सांगितले. अगदी माणूस जन्माला आल्यापासून ते त्याच्या मृत्यूनंतरही अनेक विधी त्यांनी सांगितले आहेत आणि आजही बहुजन समाज हे खोटे विधी ब्राह्मणांच्या सांगण्यावरुन सारासर विचार न करता करत आहे आणि त्यावर असंख्य भिक्षुक ब्राह्मण आपले पोट भरत आहेत. काही श्रीमंतही झाले आहेत. या पुरोहित ब्राह्मण वर्गाने अनेक प्रकारच्या लांड्यालबाड्या करुन देशातील बहुसंख्य समाजास वेठीस धरले, त्यांच्या डोक्यातील मेंदू बधिर करुन टाकला. त्यामुळे हे भट सांगतील ती पूर्व दिशा अशी स्थिती झाली. ही वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरी शेकडो वर्षे अखंडपणे चालू आहे. बहुजन समाजातील शिकलेले काही लोकसुद्धा आजही भटांच्या किंवा पुरोहितांच्या खोट्या-नाट्या उपदेशालाच बळी पडतात हे पाहिल्यानंतर पुरोहितशाही आणि बडवेगिरी आजही अबाधितपणे चालू आहे असे दिसून येईल. काहींच्या घरी तर कोणताही विधी असो तो भटाशिवाय होतच नाही. भटांनी होकार द्यावा असा प्रकार आजही चालू असताना आढळतो.

वरील पार्श्वभूमी विचारात घेता रा. लोखंडे यांनी 'सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान' या आपल्या भाग पहिल्या पुस्तकात प्रस्तावनेतच म्हटले आहे, "आमच्या हिंदुस्थान देशात हिंदू लोकांचा मोठा भरणा आहे व धर्माचे संबंधाने सर्वांचे ऐक्य असणे हे वाजवी आहे. परंतु तसा प्रकार मुळीच नाही. जेणेकरुन हिंदू लोक व त्यातून अज्ञान शेतकरी वगैरे लोक अगदी दीन होऊन गेले आहेत. ज्यांच्या हाती धर्माची सूत्रे आहेत ते तर मनास वाटेल त्याप्रमाणे वर्तन करीत असल्यामुळे धर्माच्या सत्यतेसंबंधी बराच घोटाळा होऊ लागला आहे. हा घोटाळा बाहेर येण्यास अन्य जातीचे लोकांत विद्यावृद्धी होऊ लागल्यामुळे त्यास तो समजू लागला आहे. जेव्हा लोक अक्षरशून्य होते तेव्हा भटांनी पाहिजे तसे वर्तन केले व त्यावेळेस त्यास कोणी विचारणारे नव्हते." म्हणूनच सत्यशोधक सभेकडून या विषयावर निबंध तयार करुन घेण्याची योजना आखली. त्यास अनुसरुन रा. लोखंडे यांनी हा निबंध १८८६ साली सप्टेंबर महिन्यात झालेल्या सत्यशोधक समाजाच्या उत्सवाच्या वेळी लिहिला. त्यांनी सत्यशोधक निबंध भाग १ साठी जो विषय निवडला तो त्यांच्याच भाषेत असा आहे, "आपले धर्मगुरु (ब्राह्मण) आमच्या हिंदुशास्त्राप्रमाणे करतात काय ? त्याप्रमाणे त्यांची वर्तणूक आहे किंवा नसेल तर त्यांस आपण जाणून इष्ट मानतो, सेवा करतो. सबब आपण हे धर्मगुरू दोषास पात्र आहेत किंवा नाही ?"

ब्राह्मण म्हणजे जात नव्हे असे सांगून ते म्हणतात ब्रह्म जाणतो तो ब्राह्मण. जो ज्ञानी असतो तो ब्राह्मण. शम, हम, तप, शुद्धी, शांती, सरलता, ज्ञान-विज्ञान आणि अस्तिक्य बुद्धी असे हे स्वाभाविक असणारे पुरुष ब्राह्मण जाणावे असे भगवत्गीतेमध्ये सांगितल्याचा ते दाखला देतात. तसेच हाती पळीपंचपात्र घेऊन काही ब्राह्मण भिक्षा मागण्याचा धंदा करतात ते योग्य नाही असे सांगून पराशर, व्यास, वाल्मिकी, कौशिक, विश्वामित्र आणि तुकाराम हे तेजस्वी, सत्यशील, धर्मनिष्ठ व पुण्यवान असे होते म्हणून ते खऱ्या अर्थाने ब्राह्मण या पदास पात्र होते. वायुपुराणातील श्लोकद्धारा ते म्हणतात, विद्धान विचारी पुरुष शास्त्रावलोकन करुन त्याप्रमाणे आचरण करतो आणि दुसऱ्यासही तसे वर्तन करण्यास प्रवृत्त करतो अशांनाच आचार्य म्हणावे असे ते सांगतात, असे आचरण हल्लीचे गुरु म्हणविणारे

ब्राह्मण आचार्य करतात काय ? असा प्रश्न रा. लोखंडे यांनी उपस्थित केला आहे. तथापि हल्लीच्या भिक्षुक ब्राह्मणांत आवश्यक ते गुणधर्म नसल्याने ते आचार्य, उपाध्याय आणि गुरु या पदास पात्र ठरत नाहीत. सांप्रत समाजात असे दिसून येते की, शूद्राचा मुलगा म्हणून तो शूद्र, शिपायाचा मुलगा म्हणून तो मुलगा शिपाई, सावकाराचा मुलगा म्हणून तो सावकार आणि ब्राह्मणाचा मुलगा म्हणून तो ब्राह्मण ही रुढी त्याज्य अशी आहे. ही निराधार अशी पद्धती आहे. याउलट ज्याच्या अंगी असे गुण असतात त्याप्रमाणे तो त्या पदास पात्र ठरतो. एखाद्या शूद्राचा मुलगा जर आदर्श गुणांनी युक्त असेल तर तो ब्राह्मण पदास पात्र ठरतो. त्यास त्याच्या योग्यतेप्रमाणे समाजात स्थान मिळाले पाहिजे हे रा. लोखंडेनी या निबंधात ठिकठिकाणी नमूद केले आहे. वेदांतसुद्धा हेच तत्त्व मांडण्यात आले आहे. ही वेदांतील शिकवण ब्राह्मण आणि इतर समाजाने स्वीकारली असती तर आजच्या सारखी जन्मावरुन जात ठरविली गेली नसती आणि समाजात अनर्थही माजले नसते. या व्यवस्थेने ब्राह्मण वर्चस्वाचा बुरुज ढासळला असता. रा. लोखंडे यांनी या मताच्या समर्थनार्थ पुढीलप्रमाणे श्लोक दिला आहे-

"अर्थ- (कृष्ण म्हणतो हे अर्जुना) ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे वर्ण म्हणजे पदव्या आहेत. त्याची योजना गुण व कर्मावर केली आहे. अर्थात जसे ज्याचे गुण व कर्मे त्याप्रमाणे तो जाणावे अशी आधुनिक मान्य शिकवण गीतेत समाविष्ट आहे. मनू जो सर्वमान्य मूळ शास्त्रकर्ता आणि त्यानेही हे वर्ण कर्मावर आहेत हे स्पष्ट दर्शविले आहे."

तथापि ज्या ब्राह्मण वर्गाकडे अन्य समाजाच्या हिताच्या व कल्याणाच्या दृष्टीने सर्वाधिकार होते ते आपल्याच स्वार्थात मग्न झाल्याने ते अन्य समाजाचे शोषण करु लागले आणि त्यांना बौद्धिक, मानसिक, आर्थिक आणि सामाजिक गुलामगिरी अन्य समाजावर लादली. त्यांना विद्या शिकण्यास प्रतिबंध केला. देवाची व धर्माची भीती घालून त्यांनी उर्वरित समाज गुलामगिरीच्या व अज्ञानाच्या खाईत ठेवण्याचा प्रदीर्घ काळ प्रयत्न केला. यामुळेच आपला देश एकसंध होऊ शकला नाही. खंडप्राय असा हा देश शेकडो वर्षे मुस्लिमांच्या आणि इंग्रजांच्या गुलामगिरीत खितपत पडला.

ऋग्वेद, सामवेद, अथर्ववेद आणि यजुर्वेद या चार वेदांचाही त्यांनी उल्लेख केला आहे. सांप्रत ब्राह्मण भिक्षुकांनी आपले खरे कर्तव्य धाब्यावर बसवून धर्माच्या नावावर सर्वत्र अनागोंदी माजविली आहे. अन्याय व घोटाळा निर्माण केला आहे. रा. लोखंडे यांनी पेशवेकालीन शिस्तीचाही आढावा घेतला आहे. या काळात लाडू व केशरी भातांच्या पंक्तीच्या पंक्ती उठत राहिल्या, ब्राह्मणांना पेशव्यांकडून भरपूर दक्षिणा मिळू लागल्या. त्यामुळे अन्य समाज दुर्लक्षित व उपेक्षित राहिला. ब्राह्मण सोडून इतरांची अवस्था सर्वच दृष्टीने हीन, दीन अशी झाली. ऊस गोड लागला म्हणजे तो मुळासकट खाण्यामुळे शेवटी तोंडात माती जाते याचे भान या ब्राह्मण वर्गाला राहिले नाही. आतातरी त्यांच्या वंशजांनी हा इतिहास विचारात घेऊन शहाणे व्हावे असे लोखंडे यांचे प्रतिपादन आहे. भटास दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी या उक्तीप्रमाणे सर्व वेदशास्त्र ब्राह्मणांच्या हाती गेल्यावर त्यांनी आपले हातपाय यथेच्छ पसरले आणि मन मानेल त्याप्रमाणे सर्व प्रकारचा उपभोग घेतला. त्यासाठी लोखंडे यांनी धूर्त वामनाचे उदाहरण दिले आहे. वामनाने बळीराजाकडे प्रथम एका पावलापुरती जमीन मागितली आणि नंतर दुसरा पाय इतका रुंद केला की, त्यामुळे सर्व जमीनच त्याने व्यापली आणि बळीराजाला संपविले. तसाच प्रकार ब्राह्मणांचा आहे असे लोखंडे यांचे मत आहे. तेव्हा प्रजाजनांनी ब्राह्मण किंवा गुरुस पारखून घेण्याची नितांत गरज असल्याचे स्पष्ट केले आहे.

रा. लोखंडे यांनी पुढील विषयात सत्पात्री दान म्हणजे काय यासंबंधी चांगले विवेचन केले आहे. दान देण्यास पात्र असे तीन वर्ग त्यांनी सांगितले आहेत.-

(१) पंगू (२) दानास पात्र असे साधू व (३) दानास पात्र नसणारे नोकर-कामगार. सारासर विचार करुनच प्रत्येकाने दानास पात्र अशा व्यक्तींना दान द्यावे असे ते मानतात आणि ते योग्य आहे. श्रीमंत दानशूर व्यक्तींनी शाळा-महाविद्यालये सुरु करुन यासाठी पुरेसे दान देणे योग्य होय असेही त्यांनी म्हटले आहे.

यानंतर विषय दुसरा यामध्ये रा. लोखंडे यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत.-

(१) आमच्या लोकांच्या मनात धर्मवेड भरविण्यास पुढारी कोण ?

(२) आणि ते दूर होण्यास सुलभ उपाय कोणते ?

पहिल्या पश्नाचे उत्तर म्हणजे भटभिक्षुकांनी आपल्या स्वार्थासाठी लोकांच्या स्थितीकडे लक्ष न देता त्यांना फसवून व थापा देऊन लोकांमध्ये धर्मवेड निर्माण केले हे स्पष्ट आहे. लोखंडे यांनी म्हटले आहे, 'ह्या भटांनी नीतीचा व खऱ्या धर्माचा उपदेश न करता शिधा, दान, दक्षिणावर्धक ग्रंथ वाढविल्यामुळे सत्य शास्त्राकडे अर्थात वेद व स्मृति याकडे लोकांचे दुर्लक्ष झाले.' या लोकांनी असा काही व्यूह रचला आहे की सर्व लोक मोहित होऊन मेंढराप्रमाणे एकामागून एक खड्ड्यात पडतात. उदाहरण देताना सत्यनारायण पूजेचे दिलेले आहे. काही वर्षापूर्वी सत्यनारायण पूजा ऐकूनही माहीत नव्हती. परंतु आता घरोघरी सत्यनारायण पूजेचे प्रस्थ वाढतच चालल्याचे दिसते. असे दुसरे उदाहरण म्हणजे बालविवाहाचे. शंभर-सव्वाशे वर्षापूर्वी काशिनाथ पंडितांने हे ग्रंथ तयार करुन बालविवाहाचे समर्थन केले आहे. मुलीला दहा वर्षे झाली की तिचे लग्न झालेच पाहिजे अशी त्यांनी एका श्लोकाद्वारे आज्ञा केली आहे. नाहीतर त्या मुलीचे माता-पिता, ज्येष्ठ बंधू नरकात जातील. तेंव्हापासून बालविवाहाचे प्रस्थ देशभर पसरल्याचे दिसून येईल. अशा भोंदू शास्त्राने सर्व हिंदुस्थान देश नपुंसक करुन सोडला आहे असे लोखंडे यांनी म्हटले आहे. म्हणून अशी बनावट पुस्तके लिहून लोकांच्या मनात वेड निर्माण करुन, त्यांना भीती घालून त्यांच्याकडून मन मानेल तसे दान उपटणाऱ्या भटजी व शास्त्रींना कटाक्षाने टाळावे असा त्यांनी सल्ला दिला आहे. तसेच समाजातील तरुणांनी आता अशा भटजींच्या लबाड्या विचारात घेऊन आपण सावध राहावे आणि पहिल्या भागात आपल्या घरातल्या व समाजातील सत्यशोधक मंडळींना सूचना केलेली आहे त्यामध्ये हा निबंध हिंदू धर्म शास्त्र आधारे व सारासार विचार पाहून लिहिलेला आहे असे म्हटले आहे. शेवटी कालमानाप्रमाणे सर्वांनी वागले पाहिजे. यालाच जन्माचे सार्थक केल्याचे श्रेय मिळणार आहे असे म्हटले आहे. या सर्व विवेचनावरुन आपल्या लक्षात येते की, महात्मा फुले यांच्या प्रमाणेच रा. लोखंडे यांनीही उपलब्ध असलेल्या सर्व धर्मग्रंथाचा अभ्यास केला होता हे स्पष्ट होते.

●●●


THE LIBRARY
UNIVERSITY
OF BOMBAY
1857
शीलवृत्तफला विद्या

# सत्यशोधक निबंधमाला

अथवा

# हिंदू धर्माचे खरे ज्ञान

भाग २ रा

डी माला

रा. रा. नारायणराव मेघाजी लोखंडे यांनी सत्यशोधकांचे हितास्तव "दिनबंधु" छापखान्यात छापून प्रसिध्द केला.

मुंबई.

माहे सप्टेंबर सन १८८७

किंमत १।। आणा

## प्रस्तावना

सत्यशोधक निबंधमालेचा भाग १ ला जो पूर्वी छापून प्रसिद्ध झाला आहे त्यांत 'आपले धर्मगुरु (ब्राह्मण) आमच्या हिंदुशास्त्राप्रमाणे वर्तन करितात काय ? त्याप्रमाणे त्यांची वर्तणूक आहे किंवा नाही नसेल तर आपण जाणून इष्ट मानितो त्यांची सेवा करितो सबब आपण व धर्मगुरु दोषास पात्र आहो किंवा नाही ?' या विषयासंबंधाने त्याचप्रमाणे दुसरा विषय 'आमच्या लोकांच्या मनात धर्मवेड भरविण्यास पुढारी कोण ? आणि ते दूर होण्यास उपाय कोणते ' ह्या उभय विषयावर उत्तम प्रकारे खुलासा केला आहे आणि हा खुलासा वाचून वाचकांची सहजी खात्री होते की, आमचे कर्तव्य कर्म काय व आम्ही आता काय केले पाहिजे आणि ह्या २ऱ्या भागात 'ब्राह्मण आपणा लोकांस यजमान, धनी, पालनकर्ते वगैरे विशेषणे देऊन हक्काने दान- धर्म घेतात व त्यावेळी मोठमोठाले आशीर्वाद देतात, तेव्हा आम्हा इतर लोकांबरोबर एकंदर ब्राह्मण जातीचे वर्तन कसे असले पाहिजे ? हल्ली त्यांचे वर्तन कसे आहे व ते त्यांचे उभय पक्षास श्रेयस्कर आहे काय ?' हा विषय घेतला आहे आणि तो उत्तम प्रकारे वाचकांचे मनात ठसेल असा करण्याकडे निबंधकाराने व सभेने यत्न केला आहे. करिता सत्यशोधक निबंधमालेचे दोन्ही भाग सुज्ञानी संग्रहास ठेवावेत अशी आम्ही शिफारस करितो.

**नारायण मेघाजी लोखंडे**

यामध्ये "ब्राह्मण आपल्या लोकांस यजमान, धनी, पालनकर्ते वगैरे विशेषणे देऊन हक्काने दानधर्म घेतात व त्यावेळी मोठमोठाले आशीर्वाद देतात, तेंव्हा आम्हा इतर लोकांबरोबर एकंदर ब्राह्मण जातीचे वर्तन कसे असले पाहिजे ? हल्ली त्यांचे वर्तन कसे आहे व ते त्यांचे उभय पक्षास श्रेयस्कर आहे काय ?" हा विषय घेतला आहे. सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदू धर्माचे खरे ज्ञान- भाग- २ हे पुस्तक रा. लोखंडे यांनी सत्यशोधकांचे हितास्तव "दीनबंधू" छापखान्यात छापून माहे मे सन १८८७ मध्ये प्रसिद्ध केले असून त्याची किंमत दीड आणा आहे.

भिक्षुक ब्राह्मण शेतकरी व अन्य समाजाकडून दानधर्म घेतात. त्याच्या बदलात ते मोठाला आशीर्वाद देतात. तेव्हा दानधर्म करणारा तो यजमान ठरतो तर दानधर्म स्वीकारणारा तो चाकर ठरतो. चाकर ठेवताना त्यास द्यावयाचा मोबदला आणि त्याच्या कामाचे स्वरुप ठरविण्यात येते, तोपर्यंत तो चाकरी करतो. अन्यथ: ती चाकरी तो सोडून देतो. तसेच यजमानास जोपर्यंत चाकराची गरज असते तोपर्यंतच चाकरास ठेवतो. तसे भिक्षुक ब्राह्मणांचे नसते, दानधर्मापुरते ते यजमान म्हणतात अन्यथा दान देणाऱ्यांनाच ते कमी प्रतीचे मानतात. 'सर्वलोकी श्रेष्ठ' ही आपली खोटी पदवी ते कदापी सोडत नाहीत. दान देणाऱ्या धन्याशी त्याचे वर्तन नम्रतेचे नसते. यासाठी लोखंडे यांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग दिला आहे. :-

बाह्मण तो एक चोखाही महार ।
स्वर्गीचे पीतर जेवविले ।। १।।
ब्राह्मण तो एक सज्जन कसाई ।
ज्यांचे शेषशाई मांस विकी ।। २।।
ब्राह्मण तो एक नरहरी सोनार ।
ज्याचा सर्वेश्वर भारवाही ।। ३।।
ब्राह्मण तो एक विष्णुदास नामा ।
भजनी प्रेमा विठ्ठलाच्या ।। ४ ।।
तुका म्हणे ब्रह्म जाणे तो ब्राह्मण ।
येराते नमन नाही माझें ।। ५।।

(पृ.४)

दानधर्माची अपेक्षा करणारे जे यजमान यांची ते दिशाभूल करुन नको त्या गोष्टी त्यांना करावयास लावतात. मालकापेक्षा चाकर शिरजोर अशी ब्राह्मणांची वागणूक आहे असे रा. लोखंडे यांनी दाखवून दिले आहे. ब्राह्मण गरीब-श्रीमंत असा भेद करत नाहीत. या सगळ्यांनाच नादी लावतात. व त्यांना कधी बोलून तर कधी धर्माची, देवाची किंवा नरकाची भीती घालून लुबाडतात. त्यांना हजारो प्रकारच्या पूजा करावयास लावतात. सत्यनारायण, वास्तुशांती अशा अनेक प्रकारच्या पूजा करावयास लावतात आणि त्यांचेकडून भरमसाट दक्षिणा उपटतात. माणूस मेल्यानंतर तेरावा दिवस जेवून यमपुरीस जाण्यास निघतो. त्या प्रवासात सोळा टप्पे केले आहेत. वाटेल त्यास दूत दगड मारतात. सबब हे चुकविण्याकरिता मृत्युलोकी ब्राह्मणास छत्री दान द्यावी. यामुळे मृतात्म्यास दगड लागणार नाहीत ! मेघापासून मृतात्म्याचा बचाव करण्यासाठी वस्त्रे द्यावीत म्हणजे प्रेतास थंडीचा त्रास होणार नाही. या ना त्या निमित्ताने आपल्याला हव्या त्या वस्तू हे मृतात्म्यांना ते कोणत्या यंत्राने पाठवतात हे फक्त ब्राह्मणांनाच ठाऊक. गोरगरीब यजमान आपल्या मेंदूचा वापर न करता मेंढराप्रमाणे ते जे सांगतील तसे करत असतात, त्यासाठी कर्जबाजारीही होतात. अशा या लुबाडणुकीची आणि फसवणुकीची रा. लोखंडे यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत.

इंग्रजांच्या आगमनानंतर त्यांनी शाळा महाविद्यालये सुरु केली आणि जनतेस विद्या मिळू लागली. ते जागृत झाले. त्यामुळे भटांच्या फसव्या लबाड्या जनतेला कळू लागल्या त्यांनी या ब्राह्मण लीलांना पायबंद घातला. यामुळे भटजी मंडळी डोळे वटारु लागली. शिव्याशाप देऊ लागली. तथापि दान देणाऱ्या यजमानांनी त्यांना दाद दिली नाही किंवा घेत असलेल्या लोकांना हे शक्य झाले. तथापि जे असंख्य लोक विद्येपासून वंचित आहेत, जे अज्ञानरुपी अंधारात आहेत ते कधी जागे होणार हा प्रश्न आहे. कारण सध्याच्या २१ व्या शतकात आपण असूनसुद्धा अद्याप अज्ञानी आणि ज्ञानी लोकसुद्धा भटजीरुपी या देवांच्या दलालांचे जणू चाकरच बनले आहेत असे दिसून येते. कारण पावलोपावली या लोकाना भटजी लागतो. त्यांच्याशिवाय

कोणताही विधी होत नाही अशी परिस्थिती बळावतच आहे, याचे आश्चर्य वाटते, याची चिंता वाटते. यामुळे आज भटजींना सुगीचे दिवस आहेत. भरपूर दक्षिणा उपटणे हा आमचा जन्मसिद्ध हक्कच आहे या अविर्भावात ते जनतेमध्ये एक प्रकारची दहशत माजवतात. या मंडळींचे निरीक्षण केल्यास हे आता बहुतेकजण श्रीमंत झाले आहेत. त्यांना वैभव अनायसे मिळाले आहे. त्यांचा रुबाब व त्यांची ऐट पाहण्यासारखी असते. याउलट त्यांना दान देणारे यजमान गोरगरीब मात्र खंगत चालले आहेत. 'बुडत्याचा पाय खोलात' अशी त्यांची अवस्था झाली आहे. यजमान शेतकरी तर कर्जबाजारी होऊन आत्महत्या करत आहेत. एखाद्या पुरोहिताने किंवा भटजीने कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याचे एकही उदाहरण सापडणार नाही. सध्याच्या परिस्थितीस अनुसरुन मी हे वेडेवाकडे विवेचन केले आहे.

रा. लोखंडे यांनी याच पुस्तकात आजवर ब्राह्मण समाजाने इतरांना विद्या कशी नाकारली, देवाधर्माची भीती घालून ग्रंथ वाचण्यास कशी मनाई केली हे स्पष्ट करुन विद्या घेणे हा फक्त आमचाच अधिकार आहे असे का सांगितले हे ही स्पष्ट केले आहे. त्यांनी गायत्री मंत्राचे उदाहरणे दिले आहे. हा मंत्र ब्राह्मणांशिवाय कुणी वाचू , लिहू किंवा ऐकू नये असे दरडावून सांगितले गेले. तो मंत्र व त्याचा अर्थही रा. लोखंडे यांनी दिला आहे, तो पुढीलप्रमाणे :--

" ॐ भुर्भु:स्व: तत्स वितुर्वरिण्यं भर्गो देवस्यं धीमहि ।।
धियोयोन: प्रचोदयात् ।।"

अर्थ :- (स्पष्ट) हे भगवन, तुझे शुद्ध रूप ग्रहण करण्यास योग्य जे विज्ञानानंदमय स्वरुप त्याप्रत आम्ही लोक धारण करु व ध्यान करुन त्यावर विश्वास ठेऊ अशी कृपा तू आम्हां सर्व लोकांवर कर की, तुझ्याच ध्यान व जोपासनात आम्ही समर्थ व निरंतर निष्णांत व अत्यंत श्रद्धाळू होऊ आणि जो तू आम्हां लोकांची बुद्धी, धर्म, विद्या, मुक्ती आणि तुझी प्रार्थना होईन अशी तू प्रेरणा कर. ।। (पृ.१३)



वाय १४२-८

अशा या गायत्री मंत्राबद्दल एवढा बाऊ हे भटजी कशासाठी करतात हे कळत नाही ! यजमानपदी असलेल्या गोरगरीब बहुजन समाजासाठी या भिक्षुकांनी वेगळ्या व सामान्य अशा दैवतांच्या भक्तीस लावून दिले. हे देव म्हणजे म्हसोबा, चाळोबा, मरगाई अशाच नावांच्या अनेक देवदेवतांच्या भजनी लावण्यात आले. अशा प्रकारची भक्ती ही सर्वस्वी त्याज्य व टाकाऊ आहे असे संत तुकारामांनी सांगितले आहे. हिंदू धर्माचा खरा अर्थ बहुजन समाजाला किंवा क्षुद्रांना या ब्राह्मण भिक्षुकांनी कधी सांगितलाच नाही. वेद वाचण्यास बंदी केली. विद्या घेण्यास बंदी केली. स्वच्छ राहून चांगले वर्तन करु लागलो तर भटजींचे पित्त खवळते. त्यांच्या घरातील स्त्रिया व आचारीसुद्धा इतर लोकांना तुच्छ मानतात. ज्या ज्या काही हिताच्या योजना नव्याने निघतील त्या सर्वांवर भटजींचाच अधिकार. सत्यशोधक समाजाने हा कावा ओळखून त्यांना बजावले आहे की, ज्यांच्या जीवावर तुम्ही इतके दिवस फुकट मजा मारली त्यांचे उपकार फेडलेच पाहिजेत. कुत्र्या मांजराला स्पर्श केल्यास तुम्हाला विटाळ होत नाही परंतु एखाद्या ब्राह्मणेतराला स्पर्श केल्यास तुम्हाला कसा काय विटाळ होतो ? चामड्याच्या पखालीतून आणलेले पाणी तुम्हाला चालते मग ब्राह्मणेतरानी शिवलेले पाणी का चालत नाही. ईश्वराने प्राण्यास मनुष्यासारखाच जन्म दिला आहे. सर्वांना समान हक्क दिले आहेत. मग ब्राह्मण तेवढे श्रेष्ठ असे कसे होऊ शकते ? ही शुद्ध ठकबाजी आहे, लबाडी आहे आणि माणुसकीला न शोभणारे असे वर्तन आहे. म्हणूनच सत्यशोधक समाजाच्या शिकवणीप्रमाणे प्रत्येक बाबतीत प्रत्येकाने सत्य काय आहे हे शोधले पाहिजे आणि त्याप्रमाणे आपले वर्तन ठेवले पाहिजे. यामध्येच खरे हित आहे. असा त्यांनी या निबंधरुपी पुस्तकातून संदेश दिला आहे.

●●●

## परिशिष्ट — १

# रावबहादूर कै. नारायण मेघाजी लोखंडे यांचा चरित्रपट

| | घटना | वर्ष |
|---|---|---|
| १ | जन्म | १८४८ |
| २ | शिक्षण-मॅट्रिकपर्यंत ठाणे, येथे | १८५४ ते १८६५ |
| ३ | उदरनिर्वाहासाठी भायखळा, मुंबई येथे आगमन व वास्तव्य | १८६६-६७ |
| ४ | प्रथम रेल्वेत नोकरी | १८६८ |
| ५ | पोस्टात नव्याने नोकरी | १८६९ |
| ६ | कोठी कारकून (स्टोअर कीपर) म्हणून गिरणीत नोकरी | १८७० |
| ७ | 'दीनबंधू' या पत्राचे संपादकत्व स्वीकारले | ९ मे १८८० |
| ८ | ब्रिटिश सरकारने केलेला पहिला कारखाना कायदा अपुरा व असमाधानकारक म्हणून सुधारण्याची मागणी | १८८१ |
| ९ | गिरणीकामगारांच्या मागण्या मंजूर व्हाव्यात म्हणून प्रचंड सभांचे आयोजन | २३ व २६ सप्टेंबर १८८४ |
| १० | पुरोहितांच्या दांडगाव्याविरुद्ध महात्मा फुले यांचेबरोबर जुन्नर येथे मोठी सभा | १८८४ |
| ११ | गव्हर्नर जनरलना १७,००० कामगारांच्या सह्यांचे मागणी-निवेदन सादर | २४ एप्रिल १८८९ |

| | | |
|---|---|---|
| १२ | बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन, मुंबई यांचेकडे अर्ज व मागणीसाठी १०,००० कामगारांचा मेळावा | १८८९ |
| १३ | कामगारांना बॉम्बे मिल ओनर्स असो-सिएशनने प्रथमच साप्ताहिक सुटी मंजूर केली भारतातील कामगार चळवळीचा पहिला मोठा विजय | १० जून १८९० |
| १४ | बॉम्बे मिलहँडस् असोसिएशन ही कामगारांची भारतातील पहिली संघटना स्थापन केली. | १८९० |
| १५ | सरकारने नियुक्त केलेल्या फॅक्टरी किमशनवर सहकारी सदस्य म्हणून मोलाचे कार्य | १८९० |
| १६ | सरकारने 'जस्टीस ऑफ पीस' (जे. पी.) हे पद बहाल केले. | १८९० |
| १७ | मंजूर करण्यात आलेल्या फॅक्टरी ॲक्ट मध्ये सादर केलेल्या तक्रारींची विशेष नोंद | १८९१ |
| १८ | ब्रिटिश सरकारच्या शाही कमिशनला निवेदन सादर | १८९१ |
| १९ | थोर कार्याचा गौरव म्हणून सरकारने रावबहादूर हा बहुमानाचा किताब बहाल केला | १८९५ |
| २० | मराठा हॉस्पिटलची स्थापना | १८९६ |
| २१ | प्लेगच्या साथीत वयाच्या अवघ्या ४९ व्या वर्षी दुःखद निधन | ८ फेब्रुवारी १८९७ |

# परिशिष्ट – २

## बॉम्बे मिल हँडस् असोसिएशनचे एक पत्र

**BOMBAY MILL HANDS ASSOCIATION**

**No. 158 HAINES ROAD BYCULLA.**

**Bombay 3rd June 1889.**

To,

THE SECRETARY,
TO THE GOVERNMENT OF BOMBAY,
GENERAL DEPARTMENT BOMBAY

Sir,

As it is under contemplation to amend the existing Act relating to Indian Factories, I take the opportunity on behalf of the members of the Mill-hands Association, and in continuation of my letter of 31st January, 1887 disposed of under Government Resolution No. 587, 19th February, 1887. General Department to respectfully lay before the Government of Bombay the accompanying copy of representation addaressed by over 5,000 Mill-hands to the Factory Commission in October 1884.

2. The concessions prayed for in this letter were deemed reasonable by the Commission and the Government were graciously pleased to recommend the same to the Government of India.

3. This Association is somewhat concerned at this critical time to lay before government the real facts of the case as they affect the Mill-hands in order that Government may afford the relief sought for to such extent as to them may seem fit, and it is with this object that I have ventured to approach Government.

4. The Association will deem it a great favour if Government will kindly bring this humble representation to the notice of both the Government of India and the Home Government.

I have the honour
to be Sir
Your most obedient Servant
CHAIRMAN MILL-HANDS ASSOCIATION

## परिशिष्ट – ३

# फॅक्टरी कमिशनला सादर केलेले पिटीशन

To,

W. B. Mulock, Esq. C. S.

President of the Factory Commission, Bombay.

Sir,

On behalf of the operatives employed in the Spinning and Weaving Mills in this city, we have the honour respectfully to be that, you will be pleased to lay before the Commission now sitting to enquire into their condition, the following Resolutions adopted unanimously at the public meeting of Mill-hands held at Parel and Byculla on the 23rd and 26th ultimo respectively.

(I) The all Mill-hands be allowed one complete day of rest every Sunday.

(II) That half an hour races be allowed them at noon every working day.

(III) That work in Mills should commence at 6.30 a.m. and cease at sunset.

(IV) That payment of wages be made not later than the 15th of the month following that for which they have been earned.

(V) That a workman sustaining serious injury in the courses of his work at at the Mill, which may disable him for a time, should receive full wages until he recovers, and in case of his being maimed for life suitable provision be made for his livelihood ;

2. With regard to the foregoing Resolutions, we would beg leave to make a few observations, explanatory of the views entertained by the meeting respecting the concessions prayed for.

3. The concession for weekly rest asked for is a moderate demand, and will, we are sanguine, prove advantageous to both the employers and the employees. The employers would (1) benefit in securing a body of healthier operatives, who working with energy, would turnout work satisfactory both as to quantity and quality. (2) The prayer containded in the first Resolution if granted would further afford the workmen the much needed opportunity of attending to many domestic duties, which they cannot well perform and present and making purchases in the market which the present unseasonable hours of the attendence prevent them from doing. The result is that necessaries of life are bought from workers who charge exorbitant prices and supply inferior articles. The cost to Mill owners from over taxing the energies of their servants by the unnatural system of incessant work nearly 13 to 14 hours a day, is for greater than they are aware of.

4. With regard to the second resolution we would submit that although the so-called half an hours races at mid-day already obtains in the Mills, it is granted grudgingly, and when it comes to be closely looked at the grace is found to consist from 15 to 20 minutes only. Much of this scanty races is again taken up by the present system of delivering tickets at the time. This later inconvenience can be avoided by dispensing with the noon day delivery of tickets, and substituting for the checking of ticket numbers off the Muster-Roll by the Time-Keeper going the round among the operatives at work.

5. The uncertainty at present prevailing in regard to the hour for starting work is harrassing to a degree and is the source of great inconvenience and discomfort to the workmen. A fixed and uniform time of attendence is therefore greatly needed.

6. A fixed time for the payment of wages is suggested to obviate the great hardship felt by the operatives who as a rule save nothing and one {mostly involved is in debt. The great delay in the payment of wages re-adds largely to their embarrassments. We submit that if Mill Owners derive to have a sort of hold on their servants-to prevent, desetion-the necessities of the case would be fully met by their retaining in hand a fortnight's pay of the men in arrears.

7. Lastly in regard to accidensts, the claim is urged in the interest of humanity. The distress brought about by being mourned for life or even; for a few months is insufferable, and some relief to mitigate the sufferings and hardships seems, needed and we submit for consideration whether the amounts of monthly wages and forfeited wages cannot be advantageoulsy and with propriety, appropriated for this human purpose.

8. In laying thus briefly before you the wishes of a large body of Mill Operatives, we are conscious that we have far from adequately represented their wants. We have hopes that the commission with the large store of facts before them, will make allowances if this humble represantation fails in completeness. What we pray for especially is sympathy and fairness towards the poor workmen who are ill able to make themselves heard, and the kindness of Government in instituting the present enquiries as to our condition gives in confidence that our interest will carefully watched in the course of the investigation.

We have the honour to be
Sir,
Your most obedient servant, CHAIRMAN
Mill Hands Association.

*Bombay*
15th October, 1884
*Ref* : Govt. Archives, Bombay-G. D. 1889, Vol. 68 Page 309.

## परिशिष्ट — ४

# फॅक्टरी कमिशनला सादर केलेले पिटीशन

The Dinabandhu Office. No. 156, Haines Road, Byculla,
Bombay Castle, 20th November, 1889.

To,

The Chief Secretary to the Goverment of India, Calcutta.

Sir,

I have the honour to forward herewith a petition from the Bombay Mill Hands Association signed by upwards of six thousand and five hundred operatives and request that you will be so good as to place it before His Excellency the Government General in Council for his favourable consideration, as the provision of Factory Act are lying discussed in his excellency's Council at present, I request that owing to shortage of time, I have not been able to secure more signatures.

I may be permitted to take this opportunity to state that, it is not the intension of the Mill Hands Association that the Factory Act in India should be so ammended as to apimitate it to the case of factory labour in England. The Association is perfectly aware that for various reasons the adoption of such a course would cripple the Indian Mills Industry, in to very infancy. All that in desires is the removal by law of the grievances complained of in the petition and it secure the amelioration of the Mill hands condition and the association feel convinced that by acceding to its request the Mill owners will eventually be vastly benefitted.

In attaching to this printed copy of the petition marked 'A', I most respectfully beg to state for your information that certain individual inter-

ested in the Mill industry of Bombay are and canvassing to obtain the Mill operatives consent to a petition which from its terror you will find does not represent their real wants and grievances in their entirety. I can not however say how far they will succeed through using coeroion. Those interested individuals did not even succeed in calling a further meeting and I am aware that the mill hands have up to this times requested to give their signatures to the petition attached to.

I have the honour to be

**N. M. Lokhande**

## परिशिष्ट — ५

# न्हावी बांधवांस सूचना

स्त्रीजातीस उपजत जी भूषणे आहेत त्यांत केस हे त्यांचे मुख्य भूषण आहे, यावाचून त्यांच्या मुखचंद्रमास कधीही शोभा येणार नाही. असे त्यांचे ते केस तुम्ही बलात्काराने हरण करिता. तुम्ही मर्द म्हणवता आणि अबलांवर निर्दयपणे आपल्या हाताने वज्रप्रहार करीता. या अधोर कृत्याने तुमचे मन इतके कठोर झाले आहे की, या अनाथ गायीसारख्या सुकुमार स्त्रियांच्या आक्रोशानेदेखील तुम्हास त्यांची दया येत नाही. ज्यावेळी यावर पतीविरहाचा महत कठीण प्रसंग गुजरत असतो, त्यावेळी एखादा खाटीक जसा गायीचा गळा कापितो, त्याप्रमाणे तुम्ही त्यांचे सौभाग्य, सौंदर्य व अलंकार हिरावून घेऊन चालते होता. अशी अघोर कृत्ये दररोज तुमच्या हातून घडत असता तुम्हास तुमचे धंद्यात यश ते कसे मिळणार ? ज्या सुकुमार तरुण अबलांवर तुम्ही रामोशाप्रमाणे धाड घालता, त्यांच्या जिवास ह्यापासून किती दुःख होत असेल बरे ? आपले सर्व सौंदर्य एकाएकी जाऊन आपणास अशा छिन्नभिन्न झालेल्या पाहून त्यांचा देह जळत नाही काय ? त्या सजीव स्त्रीच्या ज्वालांचा प्रखर ताप तुम्हावर पडत नाही काय ? अहो न्हावी बांधवहो ! असे शेकडोशे शाप दररोज तुम्हावर पडत असता तुमची उन्नती ती कशी होणार !! तुमच्या वाडवडिलांस आपमतलबी ब्राह्मणांनी भूलथाप देऊन गरीब अबलांची तुमच्या हातून विटंबना करण्याचा प्रघात पाडला आहे ! तुम्हास सर्व पापांचे व शापाचे मालक केले आहे ! तर आता तरी सावध व्हा व विचार करा. महार-मांगदेखील आपल्या उन्नतीविषयी विचार करु लागले आहेत मग तुम्हीच का मागे राहता ? तुम्ही आमचे शूद्रवर्गातले असल्यामुळे आम्हास तुमची फार कीव येते व म्हणूनच या प्रसंगी हे उद्गार आमच्याकडून निघताहेत. द्रव्यलोभाने जर तुम्ही असे अघोर कृत्य करण्यास प्रवृत्त झाला असलात तर तुम्हास पैसा तो काय मिळतो ! दुधावरचे सर्व लोणी भटजीबुवा काढून घेतात व तुमच्या हाती काय ते ताक मिळते. आता या अल्प मिळकतीकडे लक्ष न देता

मनाचा धडा करुन भटजींच्या भूलथापीस न भुलता या अघोर पापकृत्यास पुन्हा प्रवृत्त न होण्याचा निश्चय करा, म्हणजे खरोखरीच तुम्हास बरकत येईल आणि तुमची उन्नती होईल. याकरता न्हावी बंधू हो ! तुम्ही तुमच्या जातीची सभा भरवा, व लायसन्सटॅक्सच्या वेळी ज्याप्रमाणे एकजुटीने, एका विचाराने हजामती न करण्याचा ठराव करुन आपली सुटका करुन घेतलीत त्याप्रमाणे आता पुन्हा अशा अघोर पातकांत कधीही न पडण्याचा निश्चय करुन आजपर्यंत घडलेल्या पापाच्या नरकवासातून मुक्त व्हा व उभयलोकी कीर्ती मिळवा.

वपनविधी काही शास्त्रोक्त नाही. कामसाधू भटोबांनी धन संपादन करण्याचे जे अनेक प्रकार शोधून काढले आहेत त्यापैकीच सुंदर स्त्रियांची विटंबना करणे हा एक होय. या भटजींस तुमची उन्नती नको आहे. त्यांनी देशकल्याणार्थ म्हणून राष्ट्रीय सभेसारखी जी बंडे माजविली आहेत, त्यात तुमच्या हितार्थ काही तरी आहे काय ? ही सर्व आपल्या पोळीवर तूप ओढण्याची सोंगे-ढोंगे आहेत. ब्राह्मणांस जर वपनविधीची गरज आहे तर खुशाल त्यांस स्वहस्ताने आपल्या बायकांचे केश भादरू द्या व निरंतर नरकवासांतील सुखोपभोग त्यांस घेत बसू द्या. परंतु तुम्ही त्यांचे वाटेकरी होऊ नका. पुणे मुक्कामी जेव्हा तुमच्या मंडळीने दरडोईपाठीमागे एक पैसा अधिक घेण्याचा करार केला तेव्हा या भट्टजींनी काखेची झोळी टाकून धोकटी पत्करली व तुमच्या पोटावर पाय देण्यास तयार झाले. मग इत:पर हे नीच कर्म त्यांच्याच हवाली का कराना ? व तसे केल्याने तुमची मंडळी या घोर पातकापासून मुक्त होईल.

देशस्थ व कोकणस्थ न्हावी मंडळींचे मानकरी हो ! तुम्ही या गोष्टीचा खोल विचार करा. ह्या आपलपोट्या भट्टांनी तुमच्या दृष्टीवर हे जे भुरळ घातले आहे ते झटकून टाका व डोळे नीट उघडा, आम्हास तुमची ही दीनावस्था पहावत नाही. तुमच्या धंद्यात तुम्हास चांगले यश यावे व तुमची सदा बढती व्हावी अशी आमची मनापासून इच्छा आहे. तुम्ही म्हटले म्हणजे जातीचे खांब, तुम्ही या गोष्टीचा चांगला विचार करावा व जातीची सभा भरवून सर्व मंडळींची समज घालून सक्त ठराव करावा की, आजदिनपासून तुमच्या मंडळीपैकी जो कोणी स्त्रियांचे केस काढील

अथवा या कामात साहाय्य करील तो जातीचा गुन्हेगार होईल व त्यास जातीतून बहिष्कृत केले जाईल व असे केल्याने तुम्ही तुमच्या मंडळीस पापसागरातून मुक्त कराल व पुण्याचा वाटा उचलाल.

तसेच सत्यशोधक समाज 'दीनबंधु' सार्वजनिक मंडळी व इतर गृहस्थ आणि पत्रकर्ते यांस आमची विनंतीपूर्वक सूचना आहे की प्रत्येकजण आपापल्या घरी येणाऱ्या न्हाव्यास या निषिद्ध कृत्याविषयी नीट समज घालून पापसागरातून गटांगळ्या खात पडलेल्या देशबंधूस आपल्या सदुपचाराचा टेंका देवून बाहेर काढण्याचे यश मिळवाल अशी आमची पूर्ण उमेद आहे.

**('दीनबंधु' - २३ फेब्रुवारी, १८९०)**

## परिशिष्ट — ६

# सत्काराला उत्तर म्हणून लोखंडे यांनी केलेले भाषण

अध्यक्ष व गृहस्थहो,

ममता व संतोष प्रकट करण्यासारखे जे आपण मानपत्र दिले त्याबद्दल मी आपले मनापासून फार उपकार मानतो. आपण माझे संबंधाने संतोषवृत्तीने जे काही बोललात त्यास अनुसरून विशेष बोलावे ; पण माझ्यात ज्या उणिवा आहेत त्या मी जाणतो म्हणून न बोलावे असे मला वाटते. माझे संबंधाने आपण जे मत प्रदर्शित केले तसा कोणताही गुण माझ्यात नाही. परंतु हे सर्व आपल्या सद्‌हेतूचे व मित्रत्त्वाचे लक्षण होय. तथापि, मी एका गोष्टीत सर्वस्वी आपल्या मतास अनुसरून सांगतो की, सरकारने संतुष्ट होऊन दयार्द्र बुद्धीने जो मला मान दिला आहे. त्याबद्दल मी जर स्वत: संतोष प्रदर्शित न केला तर माझेवर तुसडेपणाचा आरोप येणार आहे. परंतु ज्या सरकारच्या मनातून मराठे जातीची योग्यता व बढती व्हावी असे आहे त्या लोकांपैकी एका गरीब मनुष्याचा सन्मान करण्याविषयी जी निवडणूक झाली, त्यामुळे जो आनंद झाला आहे त्या वर्गाकरता माझेकडून जी अल्पशी सेवा घडली असेल ती एक प्रत्येक शहरवासी सद्‌गृहस्थाचे- मग तो कोणत्या का धंद्यातील असेना, त्याचे ते कर्तव्यकर्म आहे असे त्यांनी समजले पाहिजे. तथापि, आपले शब्द प्रोत्साहन देणारे असल्यामुळे गृहस्थहो, आपली खात्री असू द्या की, आपणासारख्या खऱ्या मित्रांच्या साहाय्याने मी माझ्या नादार योग्यतेस अनुसरून कामगार लोकांच्या बऱ्यास्तवर नेहमी झटण्याचा प्रयत्न करीत जाईन. मागच्या दंग्याच्या वेळी लोकांच्या मनातील भीती घालवण्यास व शांतता ठेवण्यास आपणा सर्वांस साहाय्य देण्याविषयी आगत्य पडले होते व तशा अल्पशा सेवेचा जो आपण संतोषपूर्वक उल्लेख केला आहे त्या संबंधात ज्यांच्या साहाय्याने आपण हाती घेतलेले काम सौम्य रीतीने पार पडले असे जे साहाय्यकारी मेहरबान पोलीस कमिशनर मि. व्हिन्सेन्टसाहेब व त्यांचे हिम्मतदार

असिस्टंट सरदार मीरअब्दुल अली खान बहादूर, मि. ब्रव्हिन आणि पोलीस फौजेतील इतर कामदार की, ज्यांचे युक्तीने, योग्यतेने आणि खऱ्या धैर्याने काम करण्यास शक्तिमान झाले त्या गृहस्थांचे या प्रसंगी आभार न मानल्यास मी आपले कर्तव्य करण्यास चुकलो असे होणार आहे. 'एकोपा करण्याचा मेळा' ज्याचे धोरण केवळ लोकांत शांतता ठेवण्याचे होते तो मेळा आपले पोलिसांचे मुख्याचे दक्षतेने पार पाडून लोकांत उत्तमप्रकारे शांतता करण्यात आली व अशा प्रकारचा एक उद्देशही होता आणि त्यात प्रत्येक राजनिष्ठ गृहस्थाने ते आपले कर्तव्यच आहे समजले पाहिजे. आपल्या मायाळू सरकारच्या बलिष्ठ परोपकारी आणि शांत अमलांत दुर्बल मनुष्य स्वार्थरहित आणि प्रामाणिकपणाने शांतता ठेवण्यास व करण्याचे कामी झटण्यास व देशसेवा करण्यास शक्तिमान आहे किंवा दुसऱ्या रीतीने विचार करिता ज्या सरकारच्या अमलाखाली आपण राहातो त्याची आपण राजनिष्ठपणाने सेवा करणे यासारखेही आहे. गृहस्थहो, माझेविषयी आपण प्रेमपूर्वक जे विचार प्रदर्शित केलेत व आज रोजी जो आपण माझा मोठा सन्मान केलात, त्याबद्दल मी पुन्हा एकदा आपले अंत:करणपूर्वक फार आभार मानतो.

**(संदर्भ - 'दीनबंधु' - २६/४/१८९६)**

## परिशिष्ट — ७

# टिळक आणि आगरकरांना लोखंडे यांनी दिलेले मानपत्र

## मानपत्र

रा. रा. बाळ गंगाधर टिळक व गोपाळ गणेश आगरकर 'मराठा' आणि 'केसरी' पत्रांचे एडिटर यांस, नारायण मेघाजी लोखंडे, 'दीनबंधु' पत्राचे मालक आणि त्यांची इतर मित्रमंडळी मराठे वगैरे जातींची पूर्ण अभिमानी यांजकडून हे मानपत्र देण्याची संधी आल्यामुळे तो वेळ न दवडिता देत आहोत. यात मुख्य हेतू हाच की आजदिनपर्यंत जी वर्तमानपत्रे प्रसिद्ध होत आहेत ती केवळ साधारण प्रतीचे शिक्षण मिळालेल्या गृहस्थांकडून चालत असल्यामुळे वर्तमानपत्रांचे खरे हेतू तडीस जाण्यास आणि त्यापासून फायदे होण्यास काही प्रकारे उणीव होती म्हणून अनेक वेळेस दूरदृष्टी व पोक्त विचारी लोकांचे म्हणणे होती की, वर्तमानपत्रे हल्लीच्या बी. ए., एम. ए. वगैरे पदवींच्या विद्वान मंडळीकडून चालू व्हावीत. तो हेतू आपण शेवटास नेण्यास कंबर बांधून पुढे सरसावलात. आता आपण सार्वजनिक हितास्तव कोल्हापूर प्रकरण हाती घेऊन आपली सेवा बजावली, परंतु आम्हा महाराष्ट्रदेशीय लोकांचे दुर्दैवामुळे आपण हाती धरलेल्या कामास यावी तशी बळकटी न आल्यामुळे आपणास नामदार सरकारचे कायद्याच्या चांगुलपणाने ४-४ महिन्याच्या साध्या सजा झाल्या. आपणाकरिता ठिकठिकाणाहून सरकारास अर्ज केले होते ; परंतु त्याचा उपयोग झाला नाही. परंतु आमचे कर्तव्यकर्म आहे की सार्वजनिक कामी पडलेल्या गृहस्थांस दु:ख प्राप्त झाले असल्यास त्यांचे सांत्वन करावे या हेतूने हे पुढील चार शब्द लिहित आहोत त्यांचा आदराने स्वीकार करावा.

सार्वजनिक कामी जे कोणी पुढे सरतील त्यास अनेक दु:खे व दुर्घट प्रसंग भोगावे लागतात. करता आपणांसही हा एक प्रथमचा प्रसंग (सरकारचे मताप्रमाणे) थोड्याशा हयगयीमुळे आला आहे. यास्तव भोगलेल्या सजेविषयी आपण तीळमात्र

मनात न ठेवता पूर्ववत आपला क्रम न्याय दृष्टीने व एकाच पक्षी विचार न ठेविता सर्व जातीचे लोक आपल्या कुटुंबातीलच आहेत असे समजून वर्तन ठेवीत जावे म्हणजे हल्लीपेक्षाही आपणास लोक जास्त मान देतील. अशी एक साधारण म्हण आहे की, कोणत्याही कार्यात मनुष्य निपुण असला तरी त्याचा अंत त्यातच होत असतो. याकरिता यापेक्षा दुर्घट प्रसंग आल्यास आपण डगमगू नये. त्याचप्रमाणे इतर लोकांचे निरर्थक नुकसान आपले करण्यापासून न होईल याविषयी निरंतर झटत असावे आणि ज्या ज्या सार्वजनिक हितास कोणाकडून व्यत्यय येत असेल त्यांची कानउघडणी करण्यात आपण कधीच मागे घेऊ नये.

कळावे,

ता. २६ गुरुवार माहे ऑक्टोबर सन १८८२ इसवी.

**(संदर्भ - 'दीनबंधु' २९/१०/१८८२)**

## परिशिष्ट — ८

# हिंदू व मुसलमान लोकांत सलोखा व्हावा आणि नूतनच्या दंग्यामुळे त्यांच्या मनात उत्पन्न झालेली भीती नाहीशी व्हावी म्हणून भायखळे येथील राणीच्या बागेत भरलेला प्रचंड मेळा

गेल्या अंकात प्रसिद्ध केल्याप्रमाणे हिंदू व मुसलमान लोकांत सलोखा इच्छू कमिटीने रविवार तारीख १ ली ऑक्टोबर रोजी राणीच्या बागेत प्रचंड मेळा भरवून मेळ्यांत येणाऱ्या लोकांच्या मनोरंजनार्थ नाना तऱ्हेचे खेळ व तमाशे करविले. या मेळ्यांत ६०,००० हजारांवर मनुष्ये हजर झाली होती. मोठी संख्या गिरण्यांतील मजुरांची होती. या मेळ्यासंबंधाने आमचा स्वत:चा अभिप्राय न देता येथील दररोज निघणाऱ्या इंग्रजी, गुजराथी व मराठी पत्रात जे मजकूर प्रसिद्ध झाले आहेत त्यावरुन मेळ्याच्या आवश्यकतेविषयी आम्हास विस्ताराने लिहिण्याचे प्रयोजन दिसत नाही. तथापि या मेळ्यासंबंधाने येथे नूतन दररोज प्रसिद्ध होत असलेले 'मुंबई वैभव' यात जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे तो आम्ही आमच्या वाचकांकरिता पुढे देतो-

"दोन-एक महिन्यांपूर्वी येथे हिंदू-मुसलमानांमध्ये जो बेबनाव झाला होता तो नाहीसा करण्याकरिता जे नाना उपाय करण्यात आले होते, त्यापैकीच वरील उपाय एक होय. आजपर्यंत जे उपाय झाले, त्यापेक्षा कालचा राणीच्या बागेत जाहीर यात्रा भरण्याचा उपाय इष्ट हेतू सिद्धीस नेण्यास बऱ्याच अंशी कारणीभूत झाला. कारण, काल रोजी यात्रेच्या ठिकाणी जी नाना जातींची व विशेषकरुन हिंदू-मुसलमान या जातींची हजारो मंडळी दृष्टीस पडली त्यांच्यामध्ये म्हणजे दोन-एक महिन्यापूर्वी एक भयंकर रण माजले असेल असे एखाद्या नवख्या माणसास तर काय पण खुद्द मुंबईकरांनाही वाटले नाही. फार तर काय पण यात्रेच्या ठिकाणी स्त्रिया व लहान मुले निर्भयपणे हिंडताना पाहून सर्व यात्रेकरूंना दंग्याचा अगदी विसर पडला असे दिसत होते. राणीचा बाग अवाढव्य असल्यामुळे यात्रेकरूंच्या रंजनार्थ जागोजाग नाना प्रकारचे नाच-तमाशे करावयास चांगली सवड सापडली होती. त्यामुळे यात्रेला

मुंबईच्या हौशी लोकांची एकच गर्दी लोटली होती. कोठे-कोठे चौघडे झडत होते, कोठे रासटिपऱ्या चालल्या होत्या, कोठे कोळी लोक बँडच्या सुरावर आनंदाने नाचत होते, कुठे मुरळ्यांचा नाच चालला होता, तसेच मुसलमान लोकांचे कुठे-कुठे तमाशे चालले होते. असा हा थाट पाहून कोणालाही जुबिली महोत्सवाची आठवण पडल्यावाचून राहिली नसेल. जेथे तेथे हिंदू-मुसलमान उपदेशक झालेल्या दंग्याबद्दल दु:ख प्रदर्शित करीत व अत:पर दंगा न होण्याच्या शाश्वतीबद्दल भाषण करीत होते. एका थोरल्या मंडपात पांढरपेशे लोकांकरिता कलावंतिणीचे गाणे चालले होते. तेथे गायन आटपल्यावर सुशिक्षित लोकांच्या रिवाजाला अनुसरून कमिशनर साहेबांचे व मिरझा हुसेन सॉलिसिटर यांचे अशी समयोचित भाषणे झाली. शेवटी महाराणी साहेबांच्या नावाचा गजर होऊन सभा विसर्जन झाली आणि येणेप्रमाणे ही अपूर्व यात्रा सहाच्या सुमारास खलास झाली."

या मेळ्यात ४-५ ठिकाणी हिंदू व मुसलमान लोकांस जे उपदेशपर सांगण्यात आले ते पुढे दर्शविल्याप्रमाणे होते-

"या आपल्या मुंबई शहरामध्ये दुर्दैवाने नुकताच जो भयंकर व हृदयद्रावक दंगा उद्‌भवून त्यापासून लोकांची मने अस्वस्थ व भयभीत झाली होती ती पूर्वीप्रमाणे निर्भय करण्यासाठी निरनिराळ्या मोहोल्ल्यातील सुज्ञ व वजनदार गृहस्थांनी सरघशी काढून हिंदू व मुसलमान यामधील आजपर्यंत वसत असलेल्या प्रेमाचे व बंधू प्रीतीचे पुनरुज्जीवन केले आहे हे तुम्ही ऐकिले असेलच."

या भयंकर दंग्यामध्ये ज्यांचे नुकसान झाले आहे असे लोक बहुतांशी तुमच्यापैकी असल्यामुळे तुमची मने स्वस्थ व निर्भय करण्याचा हा योग आज ज्या गृहस्थांकडून जमविण्यात आला त्यांचे उभय जातींच्या समाजावर मोठेच उपकार झाले आहेत असे प्रत्येक सुज्ञ व विचारी गृहस्थांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

ज्या सैतानाच्या दुष्ट फेऱ्याने आम्हा उभय धर्माच्या लोकांवर जो भयंकर प्रसंग आला होता, त्याचा आता समूळ नाश झाला आहे. ज्यासाठी आपण हिंदू व मुसलमान

लोकांनी मध्यंतरीच्या काळामध्ये घडलेल्या सर्व गोष्टी विसरुन जाऊन पूर्वीप्रमाणे स्नेहभावाने वागले पाहिजे. त्यामध्ये आम्हा सर्वांचे सर्व प्रकारचे कल्याण व हित साधणार आहे. परंतु जरकरिता हा योग्य व विचाराचा मार्ग स्वीकारण्यात आपण मागे पडू तर आपला रोजगार धंदा नेहमीप्रमाणे चालावयाचा नाही हे सध्याच्या स्थितीवरुन सर्वांच्या अनुभवास आलेच आहे.

आमचे दयाळू इंग्रज सरकार नि:पक्षपाती असल्याकारणाने ते कोणत्याही धर्माचा किंवा जातीच्या लोकांचा पक्ष धरणार नाहीत. यापुढे जो कोणी आगळीक करील त्याला एकदम तोफेच्या तोंडी दिल्याशिवाय ते राहणार नाहीत हे आम्ही सर्वांनी पक्के लक्षात ठेविले पाहिजे. याचे प्रत्यंतर परवाच्या दंग्यानंतर ज्या लोकांनी पुढे आगळीक केली त्यांची कशी काय स्थिती होऊन गेली हे बहुतेकांना विदित आहेच.

दंगा झाल्यानंतर काही विघ्नसंतोषी लोक वेळोवेळी अशा अफवा उठवीत की आज अमुक ठिकाणी दंगा होणार, अमक्या दिवशी होणार वगैरे मनास मानेल त्या रीतीने पोकळ गप्पा उठवीत. परंतु त्या अफवांप्रमाणे प्रकार घडून आला नाही हे तुम्ही सर्वांनी प्रत्यक्ष पाहिले आहे ; त्याप्रमाणे दंगा पुढेही होणार नाही अशी तुमची पूर्ण खात्री असू द्या. कारण आपले सांप्रतचे शूर व हुशार पोलीस कमिशनर मि. व्हिन्सेन्ट साहेब यांनी पोलीस फोर्समध्ये चांगली सुधारणा करण्याची खटपट चालविली आहे व ती पूर्णत्वास येईपर्यंत त्यांनी लष्करी खात्याची मदत घेतली आहे.

शेवटी तुम्हा लोकांस आमचे एवढेच सांगणे आहे की, झाली गोष्ट ती विसरून जा आणि हिंदू व मुसलमान लोकांमध्ये शेकडो वर्षांपासून चालत आलेले बंधुत्वाचे नाते व प्रेमभाव पूर्वीप्रमाणे वृद्धिंगत करून सुखाने नांदा. आजचा हा प्रीतिमेळा ज्यांनी भरवून आणला त्या परोपकारी गृहस्थांचे तसेच ज्या परमदयाळू चक्रवर्तिनीच्या न्यायी राजसत्ताखाली आपण नांदत आहोत तिचे व ज्या परमेश्वराने आम्हा सर्वांना हा आनंदाचा दिवस दाखविला त्याच्या नावाने तीन वेळा जयजयकार करून तुमच्यासाठी

भरवलेल्या या मेळ्याचे यथेच्छ अवलोकन करून सुप्रसन्न मनाने आनंद करीत आपापल्या घरी जा.

या मेळ्यात एक खास मंडप घालून त्यात प्रसिद्ध व सभ्य अशा गृहस्थांस कमिटीकडून खास आमंत्रणे गेली, त्यास बसण्याची व्यवस्था केली होती. त्या मंडळींच्या मनोरंजनार्थ कलावंतिणींचा नाच व गाणे ठेविले होते. मि. व्हिन्सेन्ट व त्यांच्या पत्नी या साडेचार वाजण्याचे सुमारास मंडपानजीक येऊन ठेपल्या. यांच्या स्वागतास्तव कमिटीचे हॉनररी सेक्रेटरी रा. रा. नारायणराव मेघाजी लोखंडे हे हजर होते. क्षेमकुशल झाल्यावर उभयतांस मंडपात आणून बसविले. यावेळी एका युरोपियन फोटोग्राफरने मंडपाचा फोटो घेतला. मेहेरबान व्हिन्सेन्ट साहेब आल्यावर बरीच मंडळी मागाहून आली. त्यानंतर दुसराही फोटो सदरच्या युरोपियनांनी व एका पार्शी फोटोग्राफरनी घेतला. काही वेळ नाच व गायन होऊन ५ वाजणेचे सुमारास कमिटीचे चेअरमन, मि. मिरझा हुसेन खान, बी. एम. हायकोर्टाचे सॉलिसिटर यांनी मि. व्हिन्सेन्ट व आमंत्रण केल्याप्रमाणे हजर झालेल्या इतर गृहस्थांचे कमिटीतर्फे फार फार आभार मानले. त्याचप्रमाणे नूतनच्या दंग्यांत मि. व्हिन्सेन्ट व त्यांच्या हाताखालील अंमलदार सरदार मीर अब्दुल आली वगैरे ऑफिसर लोकांनी फार मेहनत घेतली याविषयीची तारीफ केली. तसेच म्युनिसिपल कमिशनर मि. ऑकवर्थ यांनीही दंग्याचे वेळी चांगली मेहनत घेतली त्याचप्रमाणे डाक्टर बियेर यांच्याही कामाची तारीफ केली. तसेच गव्हर्नर साहेब आणि महाराणी साहेब यांनी या दंग्याचे शमनार्थ वेळीच उपाय केल्याबद्दल फार फार आभार मानून टाळ्यांच्या गजरांत त्यांनी आपले भाषण संपविले. नंतर मेहरबान व्हिन्सेन्ट साहेब यांनी समयोचित उत्तर दिल्यावर आलेल्या युरोपियन व नेटीव गृहस्थांस पुष्पहार व तुरे दिले. हा सन्मान झाल्यावर मंडळी बागेतील एकंदर रचना पाहण्यास गेली. काही मंडळी तेथेच नाच व गायन ऐकत बसली. मेळ्याचा वेळ ६ वाजता संपताच सर्व खेळ, तमाशे व आलेली दुकाने आटोपण्याची तयारी होऊन काळोख पडताच लोक आपापले घरोघर चालते झाले. असल्याप्रकारचा मेळा

होण्याची फारच आवश्यकता होती, ती खाली दर्शविलेल्या गृहस्थांच्या परिश्रमाने व द्रव्याने पार पडली. याबद्दल आम्ही लोकांच्या तर्फे त्या गृहस्थांचे फार फार आभारी आहोत.

रा. रा. धमाजी बाळाजी पा., रुकारे जे. पी., शेट रहमतुला खेराज जे. पी., रा. रा. धोंडीबा हनमंतराव बडवे, जे. पी., धोंडीबा कृष्णाजी पा. मेहेर, शेट फकीर महंमद बाबनभाई, रा. रा. सीताराम लक्ष्मण नाईक, जनार्दन हिराजी पा., बाळकृष्ण भिवाजी ता. नाखवा, कुशाबा चापाजी पाटील काळे, तुकाराम जावजी दादाजी, कोंडाजी हनमंतराव कडूसकर, रामचंद्रराव तुकाराम हेजीब, आप्पाजी सदाशिव डोंगरे, सदाशिवराव सखाराम हांडे-देशमुख, रघुनाथराव बाबासाहेब मालप, विठ्ठल नारायण नाखवा, मे. हाजी आदम साजन, जाफरभाई लध्धा चत्तू, दावूदभाई मुसाभाई जे. पी., रा. रा. बाळकृष्ण आणुजी, बाळकृष्ण नारायण पेवेकर, राणोजी रावजी आरु, भिमराव आत्माराम, विठ्ठलराव कृष्णाजी बंडेकर, जे. पी., नारायणराव मेघाजी लोखंडे जे. पी. आणि बाबूल जगन्नाथ.

या गृहस्थापैकी रा. रा. धोंडीबा हनमंतराव बडवे, शेट फकीर महंमद, रा. रा. जनार्दन हिराजी पा., बाळकृष्ण भिवाजी नाखवा, रघुनाथराव मालप, आप्पाजी सदाशिवराव डोंगरे, रामचंद्रराव तुकाराम हेजीब, विठ्ठलराव कृष्णाजी वंडेकर यांनी या मेळ्याची व्यवस्था करण्याचे कामी फार मेहनत घेतली याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत.

**('दीनबंध' रविवार ८ ऑक्टोबर, १८९३)**

## परिशिष्ट — ९

# रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे (जे. पी.) यांचे साहित्य

१. **पंचदर्पण अथवा सर्व जातींचे उपयोगी पडणारे नियम**

श्री. लोखंडे यांनी अँग्लो व्हर्नाक्युलर छापखान्यात छापून प्रसिद्ध केले.-मुंबई सन १८६५, किं. तीन आणे.

२. **सत्यशोधक निबंधमाला अथवा हिंदु धर्माचे खरे ज्ञान**

भाग १ ला, माहे मे, सन १८८६

प्रकाशक - श्री. लोखंडे - दीनबंधू छापखाना, मुंबई

किंमत ३ आणा

३. **सत्यशोधक निबंधमाला - अथवा हिंदु धर्माचे खरे ज्ञान**

भाग २ रा.

प्रकाशक - श्री. लोखंडे

मुद्रक - दीनबंधू छापखाना, (मुंबई १८८७)

किंमत १।। आणा.

## परिशिष्ट — १०

# संदर्भ ग्रंथ सूची


१. महात्मा फुले आणि परंपरा-प्रभाकर वैद्य. लोकवाङ्मय गृह प्र. लि., १९० बी, खेतवाडी मेन रोड, गिरगाव, मुंबई ४०० ००४, किंमत तीस रुपये. प्रकाशक लोकवाङ्मय गृह (१९७१).

२. महात्मा जोतीराव फुले-आमच्या समाजक्रांतीचे जनक-ले. धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई, ३४. प्रकाशक-पॉप्यूलर प्रकाशन (१९६८).

३. व्यक्ती आणि विचार-ले. य. दि. फडके. श्री विद्या प्रकाशन २५०, शनिवार, पुणे-३०.

४. सत्यशोधक समाज हीरक महोत्सव ग्रंथ-संपा. माधवराव खंडेराव बागल प्रकाशन- श्री. शाहू सत्यशोधक समाज, करवीर कोल्हापूर.

(साल छापलेले नाही).

५. क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले-ले. डॉ. मा. गो. माळी, आशा प्रकाशन, गारगोटी, जि. कोल्हापूर. किंमत रु. २० फक्त.

प्रकाशक-सौ. आशा मा. माळी (१९८०).

६. महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ -ले. मा. प. मंगुडकर. प्रकाशक- दे. श्री. जोशी व म. द. लोखंडे (१९६५)

७. महात्मा फुले समग्र वाङ्मय - संपादक : धनंजय कीर व स. गं. माळशे, प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. (नोव्हेंबर, २००६.)

८. महात्मा फुले गौरव ग्रंथ- संपादक : आमदार पी. बी. साळुंखे, डॉ. मा. गो. माळी, आमदार ग. प्र. प्रधान, आमदार एन. डी. पाटील प. बॅ. पी. जी. पाटील, प्रकाशक- महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई-३२. किंमत रु. २० फक्त. (सन १९८२).

९. महात्मा जोतीराव फुले चरित्र-लेखक-पंढरीनाथ सीताराम पाटील चिखली (१९८९) दुसरी आवृत्ती. प्रकाशक - अरविंद धनश्याम पाटकर.

१०. कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय-संपादक : सीताराम रायकर, म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, ७३, नाना पेठ पुणे ४११ ००२ [किं. रु. ५०.]

११. दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय -संपादक : य. दि. फडके, महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान ७३, नाना पेठ, पुणे.-३० [किंमत रु. ६०.]

१२. कामगार वैभव (मासिक) शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाचे गृहपत्र-जानेवारी १९७७. (श्री. रघुनाथ भागवत यांचा लेख).

१३. सन्मित्र (मासिक) म. जोतीबा फुले विशेषांक-संपादक : स. पा. जोशी व शं. ना. लाठोरे श्री. समर्थ प्रिंटिंग प्रेस ठाणे [किं. ४ रु.] (१ जानेवारी १९७८)

१४. 'बहुजनसमाज' (मासिक) संपादक : दादासाहेब जगताप १९७४ कोल्हापूर.

१५. युगांतर (मासिक) नोव्हेंबर १९७३, महात्मा जोतीराव फुले विशेषांक-संपादक : श्रीकांत लाड, ३१४ राजभुवन, सरदार पटेल रोड, मुंबई.

१६. राष्ट्रवीर सुवर्ण महोत्सवी विशेषांक - १९२१-७१. संपादक : दाजीबा देसाई, बेळगांव.

१७. 'गावगाडा' मासिकाचे जुने अंक-संपादक : द. स. झोडगे, ४५९ सोमवार पेठ, पुणे.

१८. सत्यशोधक कार्यकर्त्यांनी लिहिलेली अनेक छोटी दुर्मीळ पुस्तके.

१९. 'दीनबंधूचे' अंक १८९३, १८९४, १८९५, १८९६, १८९८, १९०६, १९०७.

२०. मराठी वृत्तपत्रांचा-इतिहास रा. को. लेले-कॉन्टीनेन्टल प्रकाश, पुणे-३०.

२१. भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे-ले. मनोहर कदम — महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, ८९ न्यू टिंबर मार्केट, पुणे-४११ ०४२. प्रकाशक डॉ. बाबा आढाव (१९९५).

22. Non-Brahmin Movement in Southern India (1873-1949) Bashinath Kavlekar Shivaji University Publications, Kolhapur, (Price Rs. 30/-.)

23. Cultural Revolt in a Colanial Society- The non-Brahmin Movement in Western India-1873 to 1930 by Gail Omvedt. Scientific Socialist Education Trust, Bombay-14, (Price Rs.40/-)

24. Cotton Mills in India by S. D. Mehta (1854 to 1854).

वाय-१४२-१,१०५ पु.-२-२०१४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर



**प्राचार्य डॉ. मा. गो. माळी**

**एम्. ए. एम्. एड्. पीएच्. डी.**

**परिचय**

डॉ. मा. गो. माळी, रा. गारगोटी, जि. कोल्हापूर हे महात्मा फुले विश्वभारती या संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष आणि पुणे व शिवाजी विद्यापीठाचे शिक्षणशास्त्र विषयातील पीएच्. डी. चे गाईड होते. यापूर्वी ते श्री मौनी विद्यापीठात २३ वर्षे प्राचार्य, ५ वर्षे संचालक आणि सहा वर्षे अन्य पदावर होते. याशिवाय इतर काही संस्थाचे ते पदाधिकारी आहेत. डॉ. माळी यांनी शिवाजी विद्यापीठाच्या सर्व अधिकारी मंडळावर सदस्य व पदाधिकारी म्हणून काम केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण मंडळ, नवी दिल्ली इ. राज्य व देश पातळीवरील मंडळांवर त्यांनी दीर्घकाळ महत्वाचे कार्य केले आहे. डॉ. माळी यांचे संशोधन व लेखनही विपुल आहे. आजवर त्यांची लहानमोठी तीस पुस्तके प्रसिद्ध झाली असून त्यापैकी सहा ग्रंथांना विविध पुरस्कार मिळाले आहेत. उत्कृष्ट ग्रंथ निर्मितीसाठी त्यांना तीन वेळा राज्य पुरस्कार मिळाले आहे. उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीसाठी त्यांनी तीन वेळा राज्य पुरस्कार मिळवून हॅटट्रीक केली आहे. त्यांच्या पीएच्. डी. च्या मौलिक संशोधनाबद्दल त्यांना देश पातळीवरील पुरस्कार बनारस (काशी) येथे देण्यात आला आहे. आजवर त्यांचे ३५ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. तीन वेळा जागतिक परिषदेत ते सहभागी झाले असून तीन शोध निबंध त्यांनी सादर केले आहेत. सध्या ते महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे पीएच्. डी. चे मार्गदर्शक आहेत.